म. ग्रं. सं. ठाणें.
विषय ...निबंध...
सं. क्र. 30603



REFBK-0024494

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

ूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, से न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे ादा वर्गणी भरावी लागेल.

23 JAN 1991

6 MAR 1985

2 OCT 1988


SEP 1989

1 JAN 1990

(क्र. मा. पहा)
५०००-३-८४

संदर्भ निबंध
3003
28868
23/9/84

स्त्री-विमुक्ती



स्त्री-विमुक्ती

छाया दातार



स्त्री-मुक्ती संघटना, मुंबई

प्रकाशिका
शारदा साठे,
स्त्री-मुक्ती संघटना,
३१, व्हिन्सेंट स्क्वेअर गल्ली नं. ३
दादर, मुंबई ४०००१६

नोव्हेंबर १९८४

सर्व हक्क स्त्री-मुक्ती
संघटनेच्या स्वाधीन

किंमत रुपये १५ फक्त

मुखपृष्ठ अच्युत पालव

मुखपृष्ठावरील उद्धृत
डॉ. राम मनोहर लोहिया
यांच्या पुस्तकामधून

मुद्रक
चिं. स. लाटकर,
कल्पना मुद्रणालय,
४६१/४, 'शिव-पार्वती',
पुणे ४११०३०

अनुक्रमणिका

मनोगत

प्रास्ताविक :

स्त्री-मुक्ती चळवळीची दिशा

'आधुनिक' स्त्री १

आजच्या स्त्रीचे समाजातील स्थान ७

स्त्रीच्या दुय्यम स्थानाचा

ऐतिहासिक शोध १३

कुटुंबसंस्थेचे प्रकार २७

कालची भारतीय स्त्री ३४

भारतीय संस्कृतीतील अविभक्त

व विभक्त कुटुंबसंस्था ४३

कुटुंबाचे कार्य–

मानसिक जडणघडण ४९

औद्योगिक समाजाचा उदय

व स्त्रीचे बदलते स्थान ६५

स्त्री-मुक्ती चळवळीची गरज ७८

स्त्रियांचा चळवळीतील सहभाग–

इतिहासाची नोंद ८५

पाश्चात्य देशांतील स्त्री-मुक्ती

चळवळीचा आढावा ९२

मनोगत

स्त्री-विमुक्ती आणि कुटुंबसंस्था या दोन पुस्तिकांचे लेखन मी अनुक्रमे १९७५ व १९७६ साली केले होते. स्वतःच्या जीवनातून आलेल्या अनुभवांनी स्त्रियांच्या खास प्रश्नांचा अभ्यास करण्यास मी प्रवृत्त झाले. तेव्हा ती सुरुवात होती. त्यावेळी फारसे लिखाणही उपलब्ध झाले नव्हते. अनेक लोकांशी चर्चा करून एकूण समाज परिवर्तनाशी असलेले स्त्री-मुक्तीचे नाते शोधण्याचा हा प्रयत्न होता. पुणे येथे १९७५ साली ऑक्टोबरमध्ये स्त्री-मुक्ती संघर्ष परिषद झाली. त्या परिषदेच्या वतीने स्त्री-विमुक्ती ही पुस्तिका प्रसिद्ध झाली होती.

त्यावेळी चळवळ बाल्यावस्थेत होती. महागाई प्रतिकार समितीच्या आंदोलनामुळे स्त्रिया मोठ्या प्रमाणात रस्त्यावर येऊ लागल्या होत्या. शेतमजुरांमध्ये स्त्रियांची संख्या मोठ्या प्रमाणात होती. त्यांची आंदोलने सुरू झाली होती. परंतु म्हणावे तितके स्त्रियांच्या खास प्रश्नांकडे लक्ष वेधले गेले नव्हते. स्त्री-विमुक्ती पुस्तिकेच्या दोन वर्षांमध्ये १५०० प्रती विकल्या गेल्या. पण त्याचा म्हणावा तसा प्रभाव जाणवला नाही. कार्यकर्त्यांनी पुस्तक विकत घेतले पण मध्यमवर्गीय स्त्रियांमध्ये ते पोचले नाही.

आज दहा वर्षांनी चित्र बरेच बदलले आहे. माझा स्वतःचा स्त्रियांमध्ये काम करण्याचा अनुभव वाढला आहे. स्त्रियांच्या प्रश्नांविषयी जाणिवा प्रखर झाल्या आहेत. १९८० व ८१ अशी दोन वर्षे स्वस्थ बसून स्त्रिया व विकास या विषयाचा सर्वांगीण अभ्यास करण्याची संधी मिळाली आहे. त्याचप्रमाणे स्त्रियांच्या चळवळीलाही गती आली आहे. छोटे छोटे स्वायत्त गट उभे राहिले आहेत आणि समाज-परिवर्तनाच्या सर्वंकष प्रयत्नांचा भाग म्हणून स्त्री-पुरुष संबंधांना मूलभूत पद्धतीने आव्हान देऊ लागले आहेत. त्याचा परिणाम होऊन राजकीय पक्षांनीही स्त्रियांच्या प्रश्नांना चालना द्यायला सुरुवात केली आहे. या सर्वांचा परिणाम होऊन माझा स्वतःचा स्त्री मुक्तीबाबतचा समज परिपक्व होत आहे. या समजावर आधारीत नवे लिखाण 'स्त्री-पुरुष' पुस्तकाच्या रूपाने ग्रंथाली वाचक-चळवळीमार्फत प्रसिद्ध झाले आहे.

असे असूनही जुन्या दोन पुस्तिकांमधील लिखाण एकत्र करून व थोडीशी भर टाकून स्त्री-विमुक्ती पुस्तिका पुन्हा प्रसिद्ध करण्याचा निर्णय स्त्री-मुक्ती संघटनेने घेतला आणि त्याला मी पाठिंबा दिला. याचे प्रमुख कारण या पुस्तिकेतील मतांशी स्त्री-मुक्ती संघटना सर्वसाधारणपणे सहमत आहे. हे लेखन बरेच व्यापक पातळीवर

केलेले आहे. स्त्री-मुक्ती संघर्ष परिषदेमध्ये एकत्र झालेल्या सर्व घटकांना मान्य होईल अशा पद्धतीने ते केलेले आहे. यातील अनेक प्रश्नांच्या तपशीलामध्ये सैद्धांतिक पातळीवर जाण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. तो प्रयत्न आम्ही सर्वांनी मिळून स्त्री-मुक्ती संघटनेच्या अंतर्गत केलेला नाही. परंतु अगदी प्राथमिक वाचनासाठी योग्य लिखाण म्हणून याचा उपयोग होऊ शकेल असे वाटल्यावरून मीही 'स्त्री-विमुक्ती'च्या पुनः प्रकाशनासाठी संमती दिली. मागील पुस्तकावर फारशी प्रतिक्रिया मिळाली नाही, कारण स्त्रियांच्या चळवळीला गती आलेली नव्हती. यावेळी मात्र या पुस्तिकेच्या निमित्ताने स्त्री-मुक्तीच्या राजकारणाची व सैद्धांतिक प्रश्नांची साधक बाधक चर्चा होईल अशी अपेक्षा आहे.

या पुस्तकाच्या निर्मितीसाठी ग्रंथाली वाचक-चळवळीच्या कार्यकर्त्यांनी संपूर्ण सहकार्य देऊ केले व स्त्री-मुक्ती यात्रेसाठी वेळेवर पुस्तक उपलब्ध करून दिले यासाठी त्यांचे हार्दिक आभार.

छाया दातार

प्रास्ताविक । स्त्री-मुक्ती चळवळीची दिशा

स्त्री-विमुक्ती ही पुस्तिका १९७५ साली संयुक्त स्त्री मुक्ती संघर्ष परिषदेने प्रथम प्रकाशित केली. 'मागोवा'ने १९७६ साली 'कुटुंबसंस्था' विशेषांक काढला. या दोन्ही पुस्तिकांचे लेखन छाया दातार यांनी केले होते. आजच्या परिस्थितीनुसार थोडे बदल करून या दोन्ही पुस्तिकांतील निवडक भाग आम्ही स्त्री मुक्ती यात्रेच्या निमित्ताने प्रकाशित करत आहोत.

गेली दहा वर्षे आम्ही अनेक पातळ्यांवर आणि अनेक माध्यमांद्वारा स्त्री-मुक्तीचा प्रचार करत आहोत. स्त्रियांचा दर्जा कसा दुय्यम आहे हे आज जवळ जवळ कोणालाही पटवून द्यावे लागत नाही. भारतातीलच नव्हे तर जगातील बहुतेक स्त्रिया हे दुय्यम स्थान अनुभवत असतात. ही परिस्थिती बदलायची म्हणजे नेमके काय करायचे याबद्दल लोकांच्या मनात वैचारिक आणि व्यावहारिक पातळीवर अनेक प्रश्न उभे राहतात. स्त्री-मुक्तीचा प्रचार करताना अनेक प्रश्नांची उकल करण्याचा, स्वतःचा, त्याबाबतीत समज वाढविण्याचा तसेच आमचा समज इतरांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न आम्ही करत आलो आहोत. ही पुस्तिका समजावून घेण्यासाठी काही मुद्दे आपल्यापुढे विचारार्थ मांडण्याचा उद्देश आहे.

स्त्री-मुक्ती म्हणजे आम्हाला नेमके काय अभिप्रेत आहे असा प्रश्न नेहमी विचारला जातो. स्त्री-मुक्ती म्हणजे स्त्री-पुरुष समानता हा ढोबळ अर्थ सर्वांनाच पटणारा आहे. पण हे विधान फारच अपुरे आहे. आपल्या वर्गबद्ध आणि वर्णबद्ध समाजरचनेमध्ये सर्व पुरुषही जिथे समान दर्जा व समान हक्कांचा उपभोग घेऊ शकत नाहीत तिथे स्त्रिया खऱ्या अर्थाने समानतेच्या पातळीवर कशा येऊ शकतील? स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व या शब्दांशी आपण आता चांगले परिचित आहोत. हा संदेश अठराव्या शतकाच्या फ्रेंच राज्यक्रांतीने दिला. जगातील जनतेने त्यापासून स्फूर्ती घेतली आणि गुलामीच्या साखळ्या तोडायला सुरुवात केली. गेल्या दोनशे वर्षांतील निरनिराळ्या देशांमधील सरंजामशाही हक्कदारीविरुद्ध आणि परकीय साम्राज्यशाही गुलामीविरुद्ध स्वातंत्र्यलढे याची साक्ष आहेत. या स्वातंत्र्यलढ्यातून पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांनी भागीदारी केली. या भागीदारीमुळे स्त्री-पुरुष दोघांनाही जुन्या रूढी, परंपरा आणि संस्कारांचे बोजे काही प्रमाणात बाजूला सारणे सुकर झाले. म्हणूनच आपण आज काही हक्कांचा उपभोग घेऊ शकतो. या लढ्यातील उच्चांक म्हणजे जनतेने मिळवलेला सार्वत्रिक मतदानाचा हक्क होय. आपल्या देशामध्ये

स्वातंत्र्य मिळताक्षणीच पुरुषांबरोबर स्त्रियांनासुद्धा मतदानाच्या हक्काचा लाभ होऊ शकला. काही लष्करशाही देशांतील जनतेला हा प्राथमिक राजकीय हक्कदेखील अजून मिळालेला नाही.

देशोदेशीच्या जनतेने लढ्यातून जी कमाई केली ती स्त्री-पुरुषांची समाईक कमाई आहे. सोविएट रशियामध्ये समाजसत्तावादी क्रांती झाल्यावर स्त्रियांना समानतेची वागणूक मिळण्याचा क्रम झपाट्याने वाढला. चीनचा जपानी साम्राज्यशाहीविरोधी सशस्त्र लढा; भारताचा ब्रिटिश साम्राज्यशाहीविरोधी स्वातंत्र्यलढा, जगातील जनतेचा फॅसिझमविरोधी लढा; लॅटिन अमेरिकेतील जनतेचे अमेरिकन वर्चस्वाविरुद्ध सतत चालू असलेले सशस्त्र उठाव, आफ्रिकेतील मुक्तीलढे, व्हिएटनामने अमेरिकन साम्राज्यशाहीचा केलेला पराभव, पाकिस्तानमधील लष्करशाहीविरोधी चळवळ हे सर्व कमीअधिक अव्वल दर्जाचे, लोकशाही प्रस्थापनेसाठी झालेले किंवा चाललेले राजकीय लढे आहेत. या लढ्यात भागीदारी केल्यामुळे स्त्रियांचा आत्मविश्वास वाढला, त्यांनाही आत्मसामर्थ्याची जाणीव होऊ लागली. त्याचबरोबर त्यांच्या हेही लक्षात येऊ लागले की प्रस्थापित चौकटीमध्ये जो राष्ट्रीय विकास होतो तो मूठभरांच्याच कारणी लागतो, सर्वसामान्य स्त्री-पुरुष वंचित रहातात आणि स्त्रिया जास्त वंचित रहातात. पुरुषांच्या मनात स्त्रियांबद्दल सन्मानाची किंवा समानतेची पूर्वसंस्कारामुळे सहज भावना जागी होत नाही. आज स्त्रियांमध्ये व्यक्तिस्वातंत्र्याच्या ऊर्मी प्रकर्षाने उसळू लागल्या आहेत. चळवळीमधून प्राप्त झालेले समानतेचे हक्क प्रत्यक्षात आणण्यासाठी त्या आपले व्यक्तिमत्व जोपासण्याचा प्रयत्न करत आहेत. त्याबरोबरच स्त्रियांच्या प्रश्नावर संघटित होण्याची गरज त्यांना जाणवू लागली आहे. देशोदेशीचे स्वातंत्र्य लढे व मुक्ती लढे स्त्री-मुक्ती चळवळ पुढे नेणारे आहेत असा आमचा ठाम विश्वास आहे. त्याचबरोबर या स्वातंत्र्य व मुक्ती लढ्यांनी स्त्रियांच्या प्रश्नाकडे लक्ष दिले नाही तर हे लढे कमकुवत राहतील याची जाणीव आम्हाला आहे. तशीच या लढ्यातील पुरोगामी विचारधारा मानणाऱ्या पुरुष कार्यकर्त्यांनासुद्धा ही जाणीव आहे. किमान वैचारिक रुखरुख तरी असतेच. म्हणूनच श्रम करणाऱ्यांच्या व्यापक प्रश्नांवर होणाऱ्या चळवळींमधील स्त्रियांची भागीदारी अधिक जाणीवपूर्वक वाढवणे आणि आणि चळवळीमध्ये स्त्री-पुरुष समानतेच्या पायावर भक्कम एकजूट उभारणे हे स्त्री-मुक्ती संघटनेचे काम आहे असे आम्ही मानतो.

स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करण्याची चळवळ पुरुषविरोधी आहे असा एक समज आहे. आहे हीच चौकट टिकविण्यासाठी धडपडणारे आणि चळवळीचे विरोधक या समजाचा सतत प्रचार करत असतात. स्त्री-मुक्ती चळवळ पुरुषविरोधी नाही. पण ती पुरुषप्रधान समाजरचनेविरुद्ध आहे. मानवी समाजाच्या विकासाच्या क्रमात आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय अशा सर्व अंगांवर पुरुषांचे वर्चस्व

प्रस्थापित झाले, आणि स्त्रिया दुय्यम स्थानावर ढकलल्या गेल्या. शेकडो वर्षांपासून या पुरुषप्रधान समाजरचनेने स्त्रियांच्या गौण स्थानाला पायाभूत करून समाजाचा वैचारिक डोलारा उभा केला आहे. मानवी समाजाच्या प्राथमिक अवस्थेत उत्पादन साधने प्राथमिक होती म्हणजे मनुष्य शरीर हेच मुख्य साधन होते. आजच्या सारखे विज्ञान, यंत्रसामर्थ्य उपलब्ध नव्हते. अशा काळात मानवी समाजाची वृद्धी करणे हे स्त्री-पुरुषांचे प्रमुख उद्दिष्ट होते. जननाची जबाबदारी नैसर्गिक रीत्याच स्त्रीवर होती. त्यामुळे त्याबद्दल आदरही होता. स्त्रीच्या जननक्षमतेचा समाजात गौरवही होत होता. हळूहळू मनुष्य–समाज स्थिर होऊ लागला. श्रमविभागणी होण्याइतपत उत्पादनतंत्र विकसित झाले. वर्गविभागणीला सुरुवात झाली. समाजाची संपत्ती वाढली. क्रमात जननक्रियेच्या अनुषंगाने करावी लागणारी सर्व कामे ही स्त्रियांची आणि संपत्ती, संचय, उत्पादन व संरक्षण ही पुरुषांची कामे अशी गरजेपोटी विभागणी झाली. घरकाम स्त्रीने करावे आणि उत्पादनातील मुख्य काम पुरुषाने करावे आणि अनुषंगाने परिवाराची जबाबदारी मुख्यतः पुरुषाने शिरावर घ्यावी अशी प्रथा रूढ झाली. या विभागणीला लिंगभेदावर आधारीत श्रमविभागणी असे सहजरीत्या समजले जाते. या श्रमविभागणीच्या पायावर लग्नसंस्था, कुटुंबसंस्था इ. ची पुनर्रचना घडत आली आहे. आज आपण असे पाहतो की पुरुषांची मानली गेलेली कामे स्त्रियांनी केली तर कधी कौतुक होते तर कधी उपहास किंवा कुचेष्टा होते. पण स्त्रियांची मानली गेलेली कामे जर पुरुषांनी केली तर हमखास कुचेष्टाच होते. खरे पहाता जननक्रिया सोडली तर स्त्री आणि पुरुष यांच्या नैसर्गिक घडणीमध्ये दुसरा कोणताही फरक नाही ही गोष्ट आता विज्ञानाने सिद्ध झाली आहे. इतर सर्व भेदाभेद, इतिहास-क्रमात मानवी समाजाने निर्माण केलेले आहेत. तत्वतः लिंगभेदावर आधारीत श्रम-विभागणी हा स्त्री-मुक्तीच्या मार्गातील एक फार महत्वाचा अडथळा आहे. म्हणून आम्ही लिंगभेदावर आधारीत श्रमविभागणीच्या विरुद्ध आहोत. स्त्रियांची समजली जाणारी सर्व कामे सार्वजनिक क्षेत्रात सेवा व्यवसाय म्हणून केली जातात– मग ती स्त्री करो वा पुरुष करो, तेव्हा त्या कामाबद्दल इतर कामाप्रमाणेच मोबदला मिळतो हे आपण पाहतोच. उदाहरणार्थ–धुलाई केंद्रे, दवाखाने, उपहारगृहे. इ. पण स्त्रिया जेव्हा ही कामे परंपरागत पद्धतीने घरी करतात तेव्हा त्याला कौटुंबिक कर्तव्याचे वलय दिले जाते आणि ते करणे ही सहज गोष्ट मानली जाते. स्वाभाविक रीत्याच त्याचा मोबदला देण्याघेण्याचा प्रश्नच येत नाही. चालू पुरुषप्रधान कौटुंबिक रचनेत परि-वाराचा प्रमुख म्हणून पुरुष स्त्रीकडून बव्हंशी स्वामित्वाच्या भावनेने ही कामे करून घेत असतो. म्हणून आमचे असे स्पष्ट मत आहे की लिंगभेदावर आधारीत श्रम-विभागणीचे व्यावहारिक आणि वैचारिक अधिष्ठान नष्ट करण्यानेच स्त्री-पुरुष समान-तेच्या दिशेने वाटचाल सुकर होऊ शकते. स्त्रीच्या माथी मारण्यात आलेल्या घरगुती

कामाचे सामाजीकरण होणे आणि अपरिहार्य घरगुती कामांची जबाबदारी ही स्त्री पुरुषांची उभयतांची समान जबाबदारी आहे अशी जाणीव स्वाभाविक होणे हे त्यावरचे उपाय आहेत. उदाहरणार्थ व्यापक प्रमाणावर स्वच्छ आणि सार्वजनिक जेवण, घरे, पाळणाघरे, सामुदायिक धुलाईकेंद्रे, शुश्रूषा केंद्रे इ. उपलब्ध झाली तर स्त्रिया त्यांच्या कौटुंबिक कामाच्या ओझ्यातून मुक्त होऊ शकतील आणि सर्वांगीण सामाजिक जीवनात मोकळेपणाने व बरोबरीने भागीदारी करू शकतील.

आम्ही लिंगभेदावर आधारीत श्रमविभागणीविरुद्ध बोलतो आणि पुरुषांनीही घरातील कामे न लाजता केली पाहिजेत असे म्हणतो, म्हणून आमचे आंदोलन पुरुषविरोधी आहे असे कुचेष्टेने म्हटले जाते. आज समाजात झपाट्याने बदल होत आहेत. विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या विकासामुळे स्त्रियाही सर्व प्रकारची कामे करण्याची शक्यता निर्माण झाली आहे. एवढेच नव्हे तर तशी क्षमता स्त्रियांनी प्रत्यक्षात दाखवून दिली आहे. आज स्त्रिया विविध प्रकारची यंत्रे चालवतात, ट्रॅक्टर चालवतात, विमान चालवतात; इंजिनिअर, वैज्ञानिक, डॉक्टर सर्व प्रकारचे व्यवसाय करतात. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की स्त्रिया आकलन-क्षमतेच्या व कौशल्याच्या बाबतीत कमी आहेत व म्हणून त्यानी घरकामाला गुंतवून घेतले पाहिजे या प्रचलित समजाला कुठलाही पाया नाही. वर्षानुवर्षे चालत आलेल्या, रूढी, परंपरा आणि सामाजिक चौकट टिकवून धरण्याचा तो एक प्रयत्न आहे. एकीकडे स्त्रिया घराबाहेर पडून विविध क्षेत्रांत काम करू लागल्यामुळे लिंगभेदावर आधारीत श्रमविभागणीची तटबंदी कोसळायला सुरुवात झालेलीच आहे. समाजातील प्रत्येक कार्यक्षम स्त्री-पुरुषास उत्पादनाच्या व सामाजिक संचलनाच्या क्रियेत सहभागी होण्याची संधी मिळू लागली की ही श्रमविभागणी नष्ट होणार आहे. परंतु हे आपसूक होणार नाही. त्यासाठी काही मागण्या घेऊन स्त्रियाना संघटित लढा करावा लागेल. त्या सर्व मागण्यांच्या चर्चेत जाण्याची येथे जरुरी नाही. पुस्तकाच्या मलपृष्ठावर या मागण्या बऱ्याच तपशिलात दिल्या आहेत.

लिंगभेदावर आधारीत श्रमविभागणी ही कुटुंबसंस्था आणि लग्नसंस्था यांचा आत्माच आहे असे म्हटले तर ते अप्रस्तुत होणार नाही. त्यामुळे स्त्री-मुक्ती चळवळ म्हणजे कुटुंबसंस्थेवर प्रहार अशीच सर्वांची समजूत होते. ती एका अर्थाने रास्तही आहे. स्त्री-मुक्ती चळवळीचे या विषयीचे म्हणणे गंभीरपणे समजावून घेण्याची वेळ आली आहे. कुटुंबसंस्था अनादी नाही आणि परिवर्तनशील आहे असे इतिहासावरून स्पष्ट होते. आजची कुटुंबसंस्थाही काही स्त्री-मुक्ती चळवळीने मोडकळीस आणलेली नाही. मानवी समाजाच्या विकासाच्या क्रमात कुटुंबसंस्था निरनिराळ्या अवस्थांतून विकसित व विघटित होत गेली आहे. आणि हा विकास– विघटनाचा क्रम सुरू आहे. आज जी कुटुंबसंस्था आपण पहातो तिचा विकास होण्यासाठी शेकडो वर्षांचा काळ

जावा लागला आहे. आपल्याला माहीत असलेली संयुक्त कुटुंबपद्धती किंवा आताची विभक्त कुटुंबपद्धती ही अनादी काळापासून चालत आलेली नाही आणि अनंत काळ पर्यंत अबाधित रहाणार आहे असे नाही. ती कशी बदलत आली आहे याचा डोळसपणे अभ्यास करणे आवश्यक आहे. आपल्याकडे शेतकरी कुटुंबे एकत्र रहाताना दिसतात, पण ती खऱ्या अर्थाने संयुक्त कुटुंबपद्धतीत मोडत नाहीत. औद्योगीकरणाने त्या व्यवस्थेला केव्हाच निकाली काढले आहे. युरोपात संयुक्त कुटुंब पद्धतीचे उच्चाटन केव्हाच झाले. पण त्याची जागा घेणारी विभक्त कुटुंबपद्धती ही आदर्श कुटुंबपद्धती असेही म्हणता येणार नाही. आपल्याकडे अलीकडेच विभक्त कुटुंबपद्धती, ज्याला शिक्षित विभाग 'जोडप्याने रहाणे' म्हणून संबोधतात ती मूळ धरू लागली आहे. औद्योगीकरण हा त्याचा पाया आहे आणि खाजगी मालमत्ता आपल्याकडील औद्योगीकरणाचा पाया आहे. कुटुंब हे प्रस्थापित भांडवली समाजातील आर्थिक परिमाण बनले आहे. त्यामुळे समाजातील सर्व प्रकारचे सूक्ष्म आणि ठळक संघर्ष कुटुंबव्यवस्थेमध्ये चाललेले आपल्याला दिसतात. त्याबद्दलचा तपशील पुस्तिकेत आहेच. विभक्त कुटुंबातील स्त्री-पुरुष दोघेही वारसा हक्क आणि व्यक्तिगत मालमत्ता यांच्या भांडवली विचारांच्या दुष्ट चक्रात अडकलेले आहेत. "मी, माझी माणसे, माझे स्वातंत्र्य आणि माझ्या मालमत्तेचे रक्षण" हे या विभक्त कुटुंबाचे घोषवाक्य आहे. त्यामुळे अशा कुटुंबातील स्त्री स्वतःच्या अस्मितेसाठी कुटुंबांतर्गत झगडा देत असली तरी कुटुंबाच्या मालमत्तेवर (स्थावर, जंगम आणि मुलेसुद्धा) जराही आक्रमण झालेले तिला खपत नाही. एकीकडे सर्व प्रकारच्या नात्यागोत्यांचे उदात्तीकरण चालू असते. तर दुसरीकडे त्यात सतत संघर्ष चालू असलेला आपण पहातो. कुटुंबात पदोपदी व्यक्ती-व्यक्तींमध्ये संघर्ष होत असतात. पण त्याची वाच्यता बाहेर झाली तर अब्रू जाईल अशी भीती प्रत्येकाला वाटत असते. कुटुंबातील भांडणाचे बाहेर प्रदर्शन नको, वाटते. त्याचवेळी आपण हे ही ओळखून असतो की प्रत्येक कुटुंबात काही ना काही कुरबुरी चाललेल्या असतात. आजची कुटुंबव्यवस्था म्हणजे व्यक्तिवाद, व्यक्तिवर्चस्व, स्वातंत्र्याच्या ठिसूळ कल्पना आणि त्याचबरोबर अहंकारी व्यक्ति स्वातंत्र्याचा परमोच्च बिंदू आहे. जीवन मात्र माणसाला सतत सामुदायिकत्वाच्या दिशेने लोटत असते. म्हणून आम्ही प्रस्थापित कुटुंबव्यवस्थेविरुद्ध आहोत.

प्रस्थापित कुटुंबव्यवस्था मोडली पाहिजे. आम्ही म्हणतो म्हणून नव्हे तर इतिहासक्रमात ही कुटुंबव्यवस्था मोडणारच आहे. त्या जागी येणारे नवीन कुटुंब कसे असेल हे आम्ही आज सांगू शकत नाही. पण ते नक्कीच नव्या पायावर समानता आणि स्वातंत्र्य याचा आविष्कार करणारे असेल असा आमचा विश्वास आहे. आम्ही प्रचलित कुटुंबव्यवस्थेविरुद्ध आहोत. कारण ही कुटुंबव्यवस्था पुरुषप्रधान दुष्ट प्रथांचा अर्क आहे; व्यक्तिवादी विचारसरणीला खतपाणी घालणारी आहे. समाजविघातक

विचारांना जन्म देणारी आहे, स्त्रियाना स्त्री म्हणून अवमानित जिणे जगायला लावणारी आहे. शेकडो वर्षे स्त्रियांनी सहन केलेले अवमानित जीवन सहजासहजी आणि केवळ व्यक्तिगत संघर्षातून झटकून टाकता येणार नाही याची आम्हाला कल्पना आहे. त्याबरोबरच व्यक्तिगत संघर्ष करावे लागतात, त्यातून मार्ग काढत एकजुटीच्या लढ्याची उभारणी करावी लागते. असे आम्ही मानतो.

स्त्री-मुक्ती चळवळ ही पाश्चात्य देशांतून आपल्या देशात आयात केली गेली आहे, नाही तर आपल्या देशातील स्त्रियांना काही अशा चळवळीची गरज नाही असा एक गैरसमज फार मोठ्या प्रमाणावर आहे. कोणती उत्पादन विषयक अथवा वैचारिक गोष्ट मानवी समूहांनी घेतलेली नाही असा विचार केल्यास या समाजाचा पोचटपणा सहज ध्यानात येईल. आपल्याला सर्वांना एक गोष्ट माहीत आहे–प्रत्येक देशाची भौगोलिक रचना, आर्थिक, राजकीय तसेच सांस्कृतिक परंपरा एकमेकांहून भिन्न आहेत, भाषा वेगळ्या आहेत, समाजाची घडण वेगळी आहे. त्यामुळे प्रत्येक ठिकाणी एका साचेबंद पद्धतीने जाता येणार नाही. तसे कोणी जातही नाहीत. मग सर्व जगाला एकत्र बांधणारे सूत्र कोणते? मानवी समाजाचा विकासाचा जो क्रम आहे तो सर्वसाधारणपणे सर्व ठिकाणी सारखा आहे. त्यामुळे व्यापक पातळीवरील प्रश्नही समान असू शकतात. त्यांची सोडवणूक करण्याचे मार्ग, त्यासंबंधीची समाजाची तयारी, त्यासाठी लागणारी संघटना यांची पातळी निरनिराळी असू शकते. याचाच अर्थ असा की कोणताही मनुष्य-समाज स्वतःच्या गतीने होणाऱ्या कोंडीतून वाट काढण्याचा प्रयत्न करीत असतो. अन्य ठिकाणी झालेले प्रयत्न दिशा दाखविण्याच्या दृष्टीने उपयोगी पडू शकतात.

आपल्या देशाच्या विकासाच्या क्रमातच इथली स्त्री-मुक्ती चळवळ उदयाला आली आणि वाढली हे निर्विवाद आहे. पण आम्ही जागतिक पातळीवर सर्व कष्टकरी समुदायांच्या एकजुटीचा पुरस्कार करतो. इतर देशात होणाऱ्या प्रतिगामित्वाविरुद्धच्या चळवळी आपल्या देशातील चळवळीला मारक नसून पूरक आहेत असा आम्हाला विश्वास आहे. स्त्री-मुक्तीचा विचार एतद्देशीय आहे आणि तो येथूनच वाढणार आहे.

आणखी एका प्रश्नाचा उल्लेख करणे आवश्यक आहे असे आम्हाला वाटते. स्त्री-मुक्ती चळवळीला निरुत्तर करावे म्हणून एक प्रश्न नेहमी विचारला जातो. अगदी हुकमी एक्का काढल्यासारखा. रशिया–चीनमध्ये तरी कुठे स्त्रियांना स्वातंत्र्य आणि समानता आहे? प्रश्न विचारणाऱ्यांच्या दृष्टीने तेथील समाजच बंधनात आहे. ते सोयिस्कर रीत्या एक गोष्ट विसरतात की समाजसत्तावादी देशामध्ये अन्न, वस्त्र आणि निवारा या तीन मूलभूत गरजा भागविण्याचा कार्यक्रम जवळ जवळ पूर्ण झाला आहे. तिथे बेकारी नाही. स्त्रिया नोकरी करतात. त्यांना बऱ्याचशा सुविधा

उपलब्ध होत आहेत. तेथील स्त्रियांना पोट जाळण्यासाठी शरीरविक्रय करावा लागत नाही. पुरुषाप्रमाणेच त्या निर्भयपणे फिरू शकतात. रशिया, चीन आदि समाजसत्तावादी देशांतून क्रांती झाल्यावर स्त्रियांच्या परिस्थितीत आमूलाग्र बदल करण्याच्या कार्यक्रमाला स्वाभाविक रीत्याच महत्व प्राप्त झाले. अर्थात त्यात अडचणी खूपच होत्या. पण तेथील कष्टकरी जनतेने पिळवणुकीवर आधारीत समाजव्यवस्थेचे आर्थिक, राजकीय, आणि सामाजिक दृष्ट्या कंबरडेच मोडून टाकले आणि स्त्री पुरुष समानतेच्या प्रस्थापनेच्या दृष्टीने भौतिक परिसर तयार केला. क्रांतीकाळात स्त्री-मुक्तीसाठी लढा कसा दिला गेला, याचा अभ्यास वास्तवाची नोंद घेऊन व्हायला हवा. समाजसत्तावादी देशांमध्ये मानसिक आणि सांस्कृतिक पातळीवर अजून हे काम पुरे व्हावयाचे आहे, असे म्हणणे निराळे आणि तेथील जनतेने केलेल्या कमाईची योग्य नोंद न घेता हेटाळणीयुक्त उद्‌गार काढणे निराळे. आपण एक गोष्ट नेहमी लक्षात ठेवली पाहिजे. समाज नेहमी व्यवहारातून पुढे जात असतो. पण जुन्या चालीरीती आणि वैचारिक बैठक मागे रेंगाळत राहतात. आज व्यवहारात मनुस्मृती लागू होत नाही. पण तिने दिलेली वैचारिक बैठक पूर्णपणे नष्ट झाली असे म्हणता येईल काय? आपल्याला तसा भौतिक परिसर अजून निर्माण करावयाचा आहे. स्त्रियांमध्ये काम करणाऱ्या निरनिराळ्या संघटनांना किमान कार्यक्रमाच्या पातळीवर एकत्र येऊन स्त्रियांच्या प्रश्नावर एकजुटीचे आंदोलन उभे करण्याचा क्रम सुरू करावा लागेल आणि असे हे एकजुटीचे आंदोलन कष्टकऱ्यांच्या चळवळीच्या मुख्य स्रोतात एकत्व पावेल असे आपण पाहिले पाहिजे.

सदर पुस्तिका आपल्याला या प्रश्नाचा विचार करण्यास प्रवृत्त करील असा आम्हाला विश्वास आहे.

– स्त्री-मुक्ती संघटना

'आधुनिक' स्त्री

"स्त्रियांच्या एकजूटीचा विजय असो." अशी घोषणा मी दिल्याबरोबर शेजारचा पुरुष कार्यकर्ता म्हणाला, कशाला उगीच स्त्रियांच्या एकजुटीच्या गोष्टी बोलता. श्रीमंत स्त्री आणि गरीब स्त्री एकत्र येऊ शकेल काय? सुशिक्षित स्त्री आणि अशिक्षित स्त्री एकमेकांबरोबर संवाद साधू शकेल काय? शहरी स्त्री आणि ग्रामीण स्त्री, उच्चवर्णीय स्त्रिया आणि दलित स्त्रिया, या विभागणाऱ्या रेषा पुसून जाऊ शकतील का? एवढच काय, एका घरात सासू-सुना, नणंदा-भावजया, जावा-जावा ह्या नात्यांतून दिसणारा संघर्ष संपू शकेल काय?

एका अर्थाने फार विचार करायला लावणारा प्रश्न होता. पण दुसऱ्या बाजूने पहायला लागले की काही गोष्टी नजरेत ढळढळीत भरणाऱ्या होत्या. कित्येक प्रश्न खास स्त्रियांचे प्रश्न म्हणून उभे रहात होते. स्त्री म्हणून जगताना येणाऱ्या कित्येक अनुभवांची जातकुळी एकच होती. उघड्या डोळ्यांनी, चिकित्सक बुद्धीने या अनुभवाचे विश्लेषण करायला लागले, आणि या सगळ्या अन्यायाला सामोरे जायचे ठरविले तर, स्त्रियांमधील भिंती गळून पडतील आणि नवे समानतेचे जग उभारण्यासाठी एका व्यासपीठावर यावेच लागेल याचे भान प्रामाणिकपणे स्त्रियांच्या स्वातंत्र्यासाठी झगडणाऱ्या प्रत्येक स्त्रीला येऊ शकेल, असे माझ्या लक्षात आले.

फार लांब कशाला जायला हवे! मीच भोवतालच्या वेगवेगळ्या स्त्रियांच्या जीवनाचे जवळून, बारकाईने निरीक्षण करायला लागले.

शेजारच्या बंगल्यात रहाणारी सुरेखा. बंगल्याच्या खिडक्यांना झुळझुळीत पडदे. पोर्चमध्ये गाडी उभी. गाडीला ड्रायव्हर. राजबिंडा नवरा, नवऱ्याचा स्वतःचा कारखाना, हाताखाली नोकरचाकर. एवढे सगळे असून सुरेखा खूप दुःखी दिसते.

सुरेखाचे नाव नवऱ्याच्या कंपनीमध्ये भागीदार म्हणून लावलंय. पण तिला कोणत्याच व्यवहाराची माहिती नाही. तिच्या नावाने बँकेत खाते आहे, पण तिला सतत नवऱ्याकडे पैशांसाठी तोंड वेंगाडावे लागते. ती आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र नाही. नवऱ्याची 'आश्रित' आहे. हुंडा भरपूर दिला नाही म्हणून सासूचे बोल सतत खावे लागतात. पाठोपाठ तीन मुली झाल्याने तर सगळ्या परिस्थितीचा कळस गाठला गेला. एवढ्या मोठ्या संपत्तीला वारस हवाच. चौथ्या वेळी दिवस राहिले तेव्हा नवऱ्यासकट सर्वांनी आग्रह धरला की गर्भजल परीक्षा करून घेतली पाहिजे. परीक्षेमध्ये मुलीचा गर्भ म्हणून निदान झाले आणि गर्भपात करून घ्यावा लागला.

त्यातच तिच्या गर्भाशयाला धक्का लागला.

या सगळ्या दुःखावरोवरच आणखी एक दुःख सुरेखा मनात वाळगून असते, आणि कोणाला सांगू शकत नाही. तिला लैंगिक संबंधाचाच उबग आलाय. नवरा राजबिंडा असला तरी मृदू कोमलतेने तिच्या शरीराला जागवून सुखाची देवाण-घेवाण होण्याचे प्रसंग तिच्या जीवनात जवळ जवळ आलेच नाहीत. नफा कसा वाढेल आणि कर कसा चुकविता येईल याच्या विचाराने भारलेल्या तिच्या नवऱ्याला तिच्या मनाचा तळ गाठण्याची कधी गरज वाटलीच नाही. त्याच्या आक्रमकतेने ती धास्तावली आणि तिने शरीर मिटून घेतले.

आणि ही लक्ष्मीबाई. नवरा दारू पिऊन गटारात लोळत रहातो. वेळीअवेळी येऊन मारतो. चार मुले पदरात. शिक्षण नाही. धुणे-भांड्याची कामे करून खंबीरपणे उभी राहिली, आणि मुलांना मोठे केले. दोन मुलांनंतर ऑपेरेशन करण्याची इच्छा होती. पण नवरा अर्जावर सही देईना. "उंडरायला मोकळी होशील," ह्या शब्दात त्याने भीती व्यक्त केली. इतके सोसून नवऱ्याजवळ रहातेस का, विचारले तर म्हणते "बाई, एकाच्या नावे कुंकू लावलंय म्हणून दहा जण मागे लागत नाहीत. एक पैशाची कमाई न करता, नवरा कसा अधिकार सांगू शकतो? देवाधर्माने सांगितलंय, म्हणून!"

श्रीमंत सुरेखाला चार घास गोडधोड खायला मिळत असतील, झुळझुळीत पातळे ल्यायला मिळत असतील, पण तिचे तिच्या कुटुंबातील स्थान काय? स्वतःच्या जीवनावर, स्वतःच्या शरीरावर तिचा अधिकार काय? स्वतःच्या व्यक्तिमत्त्व विकासाची शक्यता काय?

गरीब लक्ष्मीला शिळेपाके खावे लागते. स्वतः चार पैसे कमावते, पण अधिकार काय? कुटुंबातही नाही आणि समाजातही नाही. बलात्काराच्या आणि वाईट नजरेच्या भीतीने नवऱ्याला सोडून जाताही येत नाही. गरिबीच्या पलीकडे अधिक काही तिला भोगावं लागतंय.

दोन्ही स्त्रियांमध्ये समान धागा आहे—स्त्री म्हणून झालेली कोंडी.

ही मंजुश्री कोरगावकर. वय वर्षे पंचवीस. एक लहान मुलगी पाच महिन्यांची. सचिवालयात नोकरी. राहणार डोंबिवली. सासू-सासरे गावी. मुलीला दिवसभर ठेवण्यासाठी "हिंदोळा"– एका बाईने खाजगीरीत्या चालविलेले बालसंगोपनगृह. खर्च महिना शंभर. शिवाय दुधाचा डबा आपलाच.

सकाळी पाच वाजता उठून मंजुश्री कामाला लागते. नवरा दूधकेंद्रावरून दूध आणून देतो. सबंध दिवसभरात नवऱ्याची तेवढीच मदत. मग त्याचे पेपर वाचन, दाढी, आरशात बघून भांग पाडणे वगैरे कार्यक्रम सुरू रहातात. मंजूला मात्र यांत्रिक-पणे कामे आवरत, छकुलीची तयारी करून तिला संगोपनगृहात ठेवून नऊची गाडी

गाठावी लागते. पावसाळ्यात तर फारच धांदल. एका हातात छत्री, पर्स, दुसऱ्या हातात छकुली. पाण्यातून रस्ता काढायचा.

साहेबही शिस्तीचा आहे. त्यामुळे माना मोडून काम करावे लागते. संध्याकाळी रेंगाळता येत नाही. कारण हिंदोळ्यातील मावशीबाईंचे टॉंट सुरू होतात. नोकरी करणाऱ्या मुली जणू टंगळमंगळ करत भटकत असतात असेच त्यांचे प्रामाणिक मत. येताना श्रीकांतने भाजी आणली तर बरे. कधी आमटीबरोबर ब्रेड खाऊ या म्हटले तर रागाचा भडका उडालाच.

या सगळ्या परिस्थितीतून कसाबसा मार्ग काढावा तर युनियनच्या पुढाऱ्याची बोलणी ऐकून घ्यावी लागतात. "फक्त पगारवाढ, बोनसच्या फायद्यात सहभागी होता, पण सभा, मिटींगांना गैरहजेरी." कार्यकारी मंडळाच्या मिटींग्ज होतात, ऑफिस सुटल्यावर, संध्याकाळी. स्त्रियांनी सहभागी व्हावे कसे? एका बाजूला स्त्रियांच्या अनेक मागण्या, शिशुकेंद्र हवे, स्वस्त दरात दुपारचे जेवण हवे, बाळंतपणाची रजा वारा आठवड्यांऐवजी सोळा आठवडे हवी, नवऱ्यालाही रजा हवी. पण या मागण्या पुढे येणार कशा?

या सगळ्या दैनंदिन चक्रात पिळून निघत असतानाच मंजुश्रीला विचारणा होते "दोन महिन्यांचा कोर्स आहे हैद्राबादला. जाणार का? प्रमोशनची संधी आहे. फारच थोड्यांची निवड केलीय." मंजुश्रीला आनंद होतो. मनाभध्ये दोन महिन्यांसाठी घरच्या कामांची कशी कशी सोय करायची याचा विचार करत ती घरी येते, आणि नवऱ्याला सगळा बेत सांगू लागते. पण नवऱ्याच्या चेहेऱ्याकडे बघितल्यावर हवा निघून गेल्यासारखे होते. तो थंडपणे "नाही" म्हणतो. "तुझी नोकरी ही घरखर्चाला हातभार म्हणून. प्रमोशनची तुला काय गरज?" त्याचा रोखठोक प्रश्न.

घरच्या कामात अडथळा नको म्हणून नोकरी सोडायला निघालेल्या मंजुश्रीला नवऱ्यानेच थोपविलेले असते. आणि आता स्वतःचे गृहिणीपण विसरून ती नोकरीमध्ये समरस होऊ लागल्यावरही तोच मध्ये आडवा येतो. त्याची परवानगी मिळत नाही.

मंजुश्रीच्या मनात अनेक प्रश्न उभे रहातात. मला "पाल्य" समजून परवानगी नाकारणारा हा कोण? घरची व दारची डबल पाळी मीच का करायची? माझी नोकरी कोणासाठी? माझ्यासाठी की केवळ घरासाठी? आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र असूनही माझ्या जीवनावर माझा अधिकार का नाही?

ही सुमन गायकवाड. माण तालुक्यातील म्हसवडची. दुष्काळी भाग. शेतमजूरी मिळत नाही म्हणून रोजगार हमी योजनेच्या कामावर सर्वस्वी अवलंबून. वर्षातून शंभर-दीडशे दिवससुद्धा काम मिळत नाही. कामाचा व्यवस्थित दाम मिळत नाही. मातीचे नीट मोजमाप होत नाही. एकाच कामाला बाप्याला जास्त पैसे, बाईला कमी पैसे मिळतात. दहा दहा मैल लांब चालत जावे लागते. कामाच्या ठिकाणी

पिण्याच्या पाण्याची सोय नाही. मुलांच्या पाळणाघराची सोय नाही. मुकादमाची आणि इंजिनीअरची वाईट नजर टाळता येत नाही.

सुमनबाईवर तिघे जण अवलंबून आहेत. नवऱ्याला सोडून आलीय ती. नवरा दुसऱ्या बाईच्या नादी लागला. जमीन कसेना. पदरी लेक पडली आणि तिने नालायक नवऱ्याला सोडायचे ठरविले. गावी आई, धाकटी बहीण यांच्याजवळ येऊन राहिली. भाऊ स्थलांतर करून निघून गेला होता. त्याची बायको आपले पोट भरीत होती. म्हाताऱ्या आईला सुमनचा आधार झाला. शेतीवाडी काही नाही. शिक्षणाचे नाव नाही. आजूबाजूच्या पंचक्रोशीत कारखान्यांचे धुराडे नाही. तेव्हा सर्व बाजूंनी अनाथ असलेली सुमनबाई रोजगार हमी योजनेखालील मजुरांच्या तांड्यात घुसली. एकट्या माण तालुक्यात २८००० कामगार रोजगार हमीवर काम करतात. त्यांपैकी ८० टक्के स्त्रिया आहेत.

बहुतेकींच्या कहाण्या अशाच; कोणी विधवा, कोणी परित्यक्ता, कोणी पळून आलेल्या, कोणाचा नवरा स्थलांतर करून नोकरीच्या शोधात गेलेला, पदरी पोरे, बापाने नाही विचारले तरी आईची माया आटत नाही. सगळे आकाश फाटले तरी ती पोराला सोडवत नाही.

मंजुश्री कोरगावकर शहरातील पांढरपेशा नोकरदार आणि सुमनबाई ग्रामीण दुष्काळी कामावरील मजूर, पण त्या दोघींचे प्रश्न सारखे नाहीत? मंजुश्रीचा नवरा तिला प्रमोशनची परवानगी नाकारतो तर सुमनबाईचा नवरा मुलाबाळांची जबाबदारी नाकारतो आणि तिला उघड्यावर टाकतो. एकीकडे मंजुश्रीवर नियंत्रण ठेवून तिला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न, दुसरीकडे तिला एकटे टाकल्यामुळे कोंडी झाल्याची अवस्था. स्त्रीला स्थलांतर करणे जड जाते. परक्या शहरी पुरुषांच्या वखवखलेल्या नजरांची भीती वाटते. नवऱ्याच्या नावाची शेती असून तो कसत नाही. आणि सुमनबाईला शेतीच नाही. कोर्टात दावा लावून मागितली तरी सासरचे लोक कसू देणार नाहीत. अशा परिस्थितीतील सुमनबाई ही असहाय्य असते. तितकेच असहाय्यपण मंजुश्री भोगत असते. त्यांची आर्थिक परिस्थिती वेगळी असली, वर्ग वेगळा असला तरी स्त्री म्हणून अनुभवास आलेल्या दुःखाचा गाभा समान आहे.

खेड्यातील श्रीमंत शेतकऱ्याच्या बायकोची परिस्थिती तर अधिकच गंभीर आहे. उच्च जातकुळीच्या नावाखाली तिला घराबाहेर जाण्याची बंदी. कोणामध्ये मिसळण्याची बंदी. शहरासारखी महिला मंडळे नाहीत की चित्रपटगृहे नाहीत. घराण्याच्या प्रतिष्ठेला बट्टा लागू नये म्हणून मन मारून चार भिंतींच्या आत पिचत रहाणे आणि देवधर्म, कुळाचार पाळत रहाणे हेच तिच्या नशिबी आहे.

या पाचही स्त्रिया कोणत्याही धर्माच्या असोत, जातीच्या असोत, वर्गाच्या असोत, पण त्यांच्यामध्ये एक गोष्ट समान आहे. पुरुषी वर्चस्वाच्या पुरुषप्रधान

रचनेच्या त्या बळी आहेत. त्यांचे श्रम, त्यांची जननक्षमता, त्यांची लैंगिकता, त्यांची मानसिकता या सर्वांवर पुरुषांचा ताबा आहे. केवळ कुटुंबाच्या अंतर्गत नव्हे तर समाजातही, जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात ह्या स्त्रियांना दडपण्याचा, त्यांचे शोषण करण्याचा प्रयत्न चाललेला आहे. स्त्रीचे दुबळेपण, तिचे 'मागासलेपण' हे या दडपणुकीचे फलित आहे. या दडपल्या गेलेल्या स्त्रियांच्या जोरावरच ही शोषण-व्यवस्था टिकून आहे. एवढेच नव्हे तर पुन्हा पुन्हा या व्यवस्थेची चक्रे चालू राहिली आहेत.

याच शोषणाविरुद्ध आजची स्त्री आवाज उठवीत आहे. ती 'आधुनिक' बनत आहे. आधुनिक बनणे म्हणजे फॅशनेबल पेहराव करणे नव्हे किंवा विद्यापीठात जाऊन डिग्र्यांची शेपटे मिळविणे नव्हे. आधुनिक होणे म्हणजे स्वत्व मिळविणे. स्वतःच्या मनात स्वसन्मानाची जाणीव जागृत करणे. निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य व कुवत, दोन्ही मिळविणे. विकासाची संधी शोधणे. स्त्रीचे मागासलेपण, तिची दुर्बलता ही नैसर्गिक नाही हे ठामपणे मनामध्ये ठसविणे. स्त्रीलाही स्वातंत्र्याचा अधिकार जन्मसिद्ध आहे हे तत्त्व स्वीकारणे. आणि ही तत्त्वे समाजाने स्वीकारावीत म्हणून झगडणे, वैयक्तिक पातळीवर व सामुदायिक पातळीवर.

याच ऊर्मींनी प्रेरीत होऊन आजची स्त्री जागी होऊ लागली आहे. सर्वसाधारण स्त्रीच्या मनात खळबळ उडू लागली आहे. हा झगडा शेवटपर्यंत न्यायचा असेल तर सर्व वर्गांतील व जातीतील स्त्रियांनी एकत्र येऊन काम करणे अपरिहार्य आहे. त्यांना दोन पातळ्यांवर हा झगडा सातत्याने द्यावा लागेल. पुरुषप्रधान रचनेशी सातत्याने संघर्ष करावा लागेल. ह्या दोन्ही पातळ्यांवरील झगडा खऱ्या अर्थाने सर्वंकष शोषण-व्यवस्थेविरोधी झगडा असू शकेल.

आणि म्हणूनच आज जरी स्त्रियांमध्ये अनेक भिंती दिसत असल्या तरी, नव्या आकांक्षा घेऊन उठणाऱ्या स्त्रीला या भिंतीना धडका मारत, एकजूट करण्याची प्रेरणा मिळू शकेल असा विश्वास वाटतो. सुरेखाला लक्ष्मीबाईंच्या दुःखाशी जवळीक वाटेल, मंजुश्रीचे सुमनबाईंच्या दुःखाशी नाते जुळेल, आणि या सगळ्या जणी मिळून जेव्हा आपल्या दुःखाचे तळ शोधू लागतील, आणि पुरुषप्रधान व्यवस्थेला जाऊन भिडतील तेव्हा या व्यवस्थेचे इतरही बळी त्यांच्या लक्षात येतील. उच्च कुळीतील शेतकऱ्याच्या बायकोचे पिचणे त्यांना दिसेल. दलालांच्या हाती शरीर-विक्रयाचे अधिकार सोपविलेल्या वेश्यांच्या कर्मकहाण्या त्यांच्या हृदयाचा वेध घेतील. शेजारच्या घरातील मारहाणीकडे नवराबायकोचा खाजगी मामला म्हणून पाहिले जाणार नाही. हुंड्याच्या हावेला बळी पडलेल्या, हजारो तरुणींमध्ये त्यांना आपल्याच असहायतेचा ठसा उमटलेला दिसेल. बलात्कारित स्त्रीला वाळीत टाकण्याची गरज त्यांना वाटणार नाही. 'स्त्री' म्हणून समदुःखी, समानधर्मी व्यक्ती म्हणून स्त्रिया स्वतःला

ओळखू लागतील तेव्हा सासू सुनेला समजावून घेईल, आई लेकीला ओळखेल, नणंद भावजया एकमेकींचा दुःस्वास करणार नाहीत. पुरुषकेन्द्री आयुष्यातून निर्माण झालेली ही नाती, त्यातील अंतर स्त्रिया विसरू लागतील. यातूनच 'आधुनिक' स्त्रीचा जन्म होईल.



आजच्या स्त्रीचे समाजातील स्थान

सुरेखा श्रीमंत नवऱ्याची पत्नी. लक्ष्मीबाई दारुडया कामगाराची पत्नी. मंजुश्री कमावती पत्नी आणि सुमनबाई दुष्काळी कामावरील मजूर. वेगवेगळ्या वर्गातील असूनही दुःखाचे काही समान धागे त्यांच्या परिस्थितीतून ओवले गेले आहेत. त्यांचा व्यक्तिमत्व विकास होऊ शकत नाही. अडथळे केवळ त्यांच्या मनात नाहीत, संस्कारात नाहीत. ते बाह्य परिस्थितीमध्येही आहेत.

याच परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी भारत सरकारने समिती नेमली होती. या समितीने 'भारतीय स्त्रीचे स्थान' या नावाने अहवाल प्रसिद्ध केला. त्यातील काही गोष्टींचे निरीक्षण केल्यास भारतीय स्त्रीचे सर्वसामान्य चित्र नजरेस पडेल.

स्त्रियांच्या मृत्यूचे प्रमाण

भारतातील लोकसंख्येमध्ये स्त्रियांचे प्रमाण पुरुषांच्या संख्येपेक्षा कमी आहे. दर हजार पुरुषांमागे स्त्रिया ९३६ असतात. याचे कारण काय ? समिती म्हणते, 'मुलांपेक्षा मुलींची जननसंख्या कमी आहे हे याचे कारण नसून लहानग्या मुलींना वेळच्या वेळी औषधोपचार होत नाही, अन्नाचा पुरवठा होत नाही, त्यामुळे चार वर्षांखालील मुलांमध्ये मुली मोठ्या प्रमाणावर मृत्युमुखी पडतात. भारतीय संस्कृतीमध्ये मुलींना सावत्रपणाची वागणूक दिली जाते. शिवाय स्त्रियांच्या आरोग्याकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही. रुग्णालयांच्या सोयी अपुऱ्या आहेत. त्यामुळे बाळंतपणातही मोठ्या प्रमाणावर स्त्रिया मरतात.' याचा अर्थ स्त्रीच्या जगण्याचाच हक्क येथे धोक्यात आलेला आहे. येथील संस्कृती स्त्रीचे जीवन महत्त्वाचे मानत नाही आणि येथील समाजव्यवस्थाही स्त्रीला नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षण देण्यास अपुरी पडत आहे.

शिक्षणाच्या नावे शून्य

१९७१ च्या जनगणनेप्रमाणे एकूण स्त्रियांच्या लोकसंख्येपैकी फक्त १८ टक्के स्त्रिया साक्षर आहेत. ग्रामीण भागामध्ये हेच प्रमाण १३ टक्के आहे. राजस्थानमध्ये हे प्रमाण सर्वांत कमी म्हणजे ४ टक्के आहे. केरळमध्ये हे प्रमाण सर्वांत जास्त आहे, म्हणजे तेथे एकूण स्त्रियांपैकी ५३ टक्के ग्रामीण स्त्रिया साक्षर आहेत. भारतातील पुरुषांमध्ये साक्षरतेचे प्रमाण ३९ टक्के आहे. येथे साक्षरता हा शब्द मुद्दाम वापरला आहे. यामध्ये शिक्षणाची पातळी कळू शकत नाही. नोकरीधंद्यासाठी आवश्यक शिक्षण,

घंदेशिक्षण याहूनही फारच कमी प्रमाणात स्त्रियांना मिळू शकते. त्यामुळे स्त्रीला व्यवसाय निवडण्याचे स्वातंत्र्य जवळजवळ नसतेच. बहुसंख्य स्त्रियांना नवऱ्यावर अवलंबून राहण्याखेरीज गत्यंतर नसते. विधवा स्त्रिया, नवऱ्याने सोडून दिलेल्या स्त्रिया यांची स्थिती तर फारच बिकट असते.

भारतात बालविवाहाचे प्रमाण फार मोठे आहे. त्यामुळे तरुण वयात वैधव्य येण्याचे प्रमाणही खूप आहे. भारतातील एकूण विवाहांपैकी एक तृतीयांश विवाहप्रसंगी मुलीचे वय पंधरा वर्षांहून कमी असते. त्यामुळे गर्भधारणाही लवकर होते व अकाली मातृत्वाचे परिणाम भोगावे लागतात.

आर्थिक जीवनातील स्थान

भारतातील स्त्रीचे आर्थिक जीवनातील स्थान काय आहे? कोणत्याही व्यक्तीचे समाजातले स्थान व प्रतिष्ठा पैशाने किंवा त्यांच्या आर्थिक जीवनातील स्थानावरून ठरते. आज सर्वसामान्य स्त्रीचे स्थान तिच्या नवऱ्याच्या प्राप्तीवरून ठरते. नवरा ज्या सामाजिक वर्गात असेल त्या सामाजिक वर्गामध्ये तिची गणना होते. मात्र त्याच वर्गातील तिच्या नवऱ्यापेक्षाही ती दुय्यम असते. तिला नवऱ्याच्या औदार्यावर अवलंबून राहावे लागते. नवरा चांगला असेल तर बागणूक चांगली देतो; पण म्हणून दुसऱ्यावर अवलंबून राहण्याची, आश्रिताची भूमिका संपत नाही.

ज्या स्त्रिया स्वतः कमाई करतात त्यांची स्थिती काय आहे ते पाहू. भारतातील एकूण काम करणाऱ्या माणसांमध्ये फक्त १७ टक्के स्त्रिया कामकरी आहेत. ही स्थिती १९७१ सालची आहे. याउलट १९११ साली एकूण काम करणाऱ्या माणसांपैकी ३४ टक्के स्त्रिया कामकरी होत्या. १९७१ च्या जनगणनेनुसार ग्रामीण भागात काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या २७० लक्ष तर शहरांमध्ये काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या फक्त ३३ लक्ष होती. काम करणाऱ्या एकूण स्त्रियांमध्ये शेतमजूर स्त्रियांचे प्रमाण ५० टक्के व स्वतःच्या शेतावर काम करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण ३० टक्के होते. म्हणजेच जेथे कौशल्य लागत नाही अशा क्षेत्रात स्त्रियांना रोजगार मुख्यतः उपलब्ध होऊ शकतो.

स्त्रियांना नोकऱ्या मिळणे कठिण जाते, त्याचप्रमाणे बेकारीची पहिली कुऱ्हाड स्त्रियांवर कोसळते. कारखान्यांमध्ये नवी यंत्रे आली. कामगारांना कमी करण्याचा प्रश्न आला तर स्त्री-कामगार प्रथम कमी होतात. स्त्रियांची नोकरी ही पूरक नोकरी असाच सर्व समाजाचा दृष्टिकोन असल्यामुळे स्त्रियांना नोकरीवरून काढताना विरोध कमी होतो. स्त्रिया स्वतःही विरोध कमी करतात. त्यांचे पुरुष सहकारीही विरोध करत नाहीत. याचाच अर्थ प्रत्येक स्त्रीला अर्थव्यवहारात भाग घेण्याचा हक्क आहे, हे तत्त्व अजून मान्य झालेले नाही. चूल व मूल हे स्त्रीचे प्रथम काम. कारखानदारांना गरज

पडेल तेव्हा ते तिला काम देतील. अशा प्रकारचे तत्त्व येथे गृहीत धरलेले आहे. त्याचप्रमाणे बाळंतपणाची रजा, तिच्या मुलांना सांभाळण्याकरता सोयी करणे ह्यांसारख्या आवश्यक सोयी स्त्रीला आज अत्यल्प प्रमाणात मिळतात.

राजकीय व सामाजिक क्षेत्रातील स्थान

आपल्या देशाच्या आजच्या राजकीय जीवनात स्त्रीचे स्थान काय? समिती म्हणते की, सरसहा मतदानाचा अधिकार दिल्यामुळे स्त्रियांची राजकीय भागीदारी वाढल्यासारखी दिसते, तरी ती अतिशय तकलादू व वरवरची आहे. एकंदर देशाच्या राजकीय परिस्थितीवर त्याचा काहीही ठसा उमटू शकत नाही. हे सर्वच दुबळ्या व शोषित घटकांबद्दल खरे आहे. शोषित वर्गाच्या पुरुषांनाही राजकारणात स्थान नाही. त्यांच्या मागण्यांचे प्रतिबिंब आर्थिक धोरणात पडत नाही, ते स्त्रियांच्या बाबतीत अधिकच खरे ठरते. या वर्गातील पुरुषांपेक्षा स्त्रिया अधिक दडपल्या गेल्या आहेत. काही थोड्या उच्चवर्गीय स्त्रियांना शिक्षणाची व राजकारणाची संधी थोडीफार मिळते. मनात आले तर त्या राजकारणामध्ये आपले स्थान निर्माण करू शकतात; पण सर्व स्त्रियांच्या मागण्यांसाठी म्हणून त्यांचा 'दबावगट' निर्माण होऊ शकत नाही.

सामाजिक सुधारणांबाबत समितीने म्हटले आहे की, समाजामध्ये बहुपत्नीत्वाचा अधिकार मान्य केला जातो त्या समाजामध्ये स्त्री-पुरुषांना समान हक्क व समान वागणूक शक्य नाही. मुस्लिम समाजातील बहुपत्नीत्वाची चाल कायद्याने बंद व्हावी अशी शिफारस समिती करते. त्याचप्रमाणे हुंडा, बालविवाह, वारसा हक्क, पोटगी, मुलांची तावेदारी या विषयीच्या कायद्यांची अंमलबजावणी योग्य ती होत नाही. कायदे मोडले जातात आणि समाज उदासीन राहतो.

यावरून आपल्याला स्त्रीच्या विकासात येणाऱ्या बाह्य अडथळ्यांचे, तिला दडपून-वेढून टाकणाऱ्या आर्थिक, सामाजिक, राजकीय व शैक्षणिक परिस्थितीचे दर्शन झाले. अशा परिस्थितीमध्ये स्त्रीमध्ये होऊ पाहणारा बदल थोपविला जातो.

पण त्याचबरोबर खुद्द स्त्रीच्या मनावरच्या जुन्या संस्कारांचाही अडथळा तिला होत असतो. हे जुने संस्कार कोणते? स्त्रीचे व्यक्तिमत्त्व आज कसे आहे? पुष्कळ लोक असे म्हणतात की, स्त्रीलाच स्वातंत्र्य नको असते. तिला शिक्षण दिले तर नको असते. नोकरी मिळत असली तरी तिला घरात बसून राहावेसे वाटते. ती आपल्या कौटुंबिक जीवनात सुखी आहे. हे चित्र वरवर खरे दिसते; पण मुळातच तिची मनोधारणा अशी का बनते?

एका फ्रेंच लेखिकेने एके ठिकाणी लिहिले आहे, 'स्त्री ही स्त्री म्हणून जन्माला येत नाही ती संस्कारामुळे स्त्री बनते.' या वाक्यातील अर्थ समजावून घेतला पाहिजे.

स्त्री व पुरुष यांच्यामध्ये शारीरिक फरक जन्मजात असतो; पण त्यांची भिन्न व्यक्तिमत्वे मात्र आपण त्यांच्यावर संस्कार करून, संस्कृती, मूल्ये, रूढी, चालीरीती यांच्याद्वारे नंतर घडवतो.

मुलगा होऊ दे ग, बाई

अगदी पहिल्यापासून मुलीच्या आयुष्याला सुरुवात कशी होते पाहू. एखादी स्त्री गर्भवती झाली की घरची, दारची सगळी माणसे 'मुलगा होऊ दे ग, बाई' असा आशीर्वाद देतात. 'वंशाचा दिवा' उजळावा म्हणून नवस करतात. पहिलटकरणीलाही वाटत राहते, मुलगा होणे म्हणजे जीवनातील मोठ्यात मोठी सार्थकता. समजा, पहिल्या चार मुली झाल्या तरी बाईला मुलगा होईतोवर वीण वाढवावी लागते. पुढच्या प्रत्येक मुलीला तुझा जन्म कसा नकोसा होता हे पुन्हा पुन्हा दाखविले जाते. लगेच पाठीवर भाऊ असेल तर छोट्या भावाचे कौतुक व तिचा राग असा पक्षपात मुलीला अनुभवायला येतो.

मुलीला आणि मुलाला खेळणी आणण्यापासून दोघांना वागवण्याच्या पद्धतीत फरक पडतो. मुलीला भातुकलीची बुडकुली नि बाहुली आणली जाते. पोराला मात्र महागडी बॅटबॉल, मोटारगाडी हे सर्व पुरुषी खेळ. पोरगी जरा पाचसहा वर्षांची झाली की, 'अग, पाच वर्षांची घोडी झालीस नि पोरात विटीदांडू कसली खेळतेस ?' असे रागाचे उद्‌गार कानी पडतात.

मुलगी वयात येताना होणारे शारीरिक बदल हे शास्त्रीय पद्धतीने समजावून न सांगता फार धक्कादायक पद्धतीने तिला सत्याचा स्वीकार करावा लागतो. अजूनही पुष्कळ घरांतून स्त्रियांना मासिक पाळीच्या काळात अस्पृश्य समजले जाते. अमंगल समजले जाते. वस्तुतः त्यामध्ये अमंगल असे काही नाही ही शास्त्रीय कल्पना त्यांच्या गावीही नसते. 'बाईचा जन्म ग बाई, आता जन्मभर हाच भोग !' असे उद्‌गार सतत ऐकवून बाईचा जन्म फार वाईट असे तिच्या मनावर बिंबवले जाते. स्त्री अबला हे ऐकून ऐकून स्वतःच्या 'दुबळे'पणाची कल्पना प्रथमपासूनच तिच्या मनात ठसते. स्त्रीजन्म हा पूर्वपापांचे फळ आहे असे ती आपसूक मानू लागते.

लग्न हीच इतिकर्तव्यता

'एकदा मुलीचे लग्न झाले की सुटलो' हे आपल्या परमप्रिय पित्याच्या तोंडचे शब्द तिला विवाह हीच आपल्या आयुष्यातील परमोच्च घटना आहे, अशी सतत जाणीव करून देत असतात. मध्यम वर्गीयांमध्ये मुलगी मॅट्रिक झाली की लगेच भोवतालचे चौकशीला लागतात. कष्टकरी वर्गामध्ये मुलगी वयात आली की मुलांकडून मागण्या यायला सुरुवात होते. गळ्यातील काळी पोत, कपाळावरचे कुंकू हे तिचे

आयुष्यभरचे दागिने. अगदी लहान लहान मुलीसुद्धा गळ्यात काळी पोत घालण्याचा हट्ट धरतात. या काळ्या पोतीचे पावित्र्य त्या मुलीच्या मनावर लहानपणापासून ठसत जाते. 'मनाजोगा नवरा' मिळावा म्हणून किती ती व्रतवैकल्ये ! कुमारी मुलीने करायची हरतालिका, पार्वतीला शंकर प्रसन्न झाला तसा तुम्हालाही होवो. स्त्रीच्या अंधश्रद्धेला येथूनच सुरूवात होते. पुरुषापेक्षाही ती अधिक भाविक, भित्री राहते. नवरा हाच देव, नवऱ्याला प्रसन्न ठेवणे हीच आयुष्यभराची इतिकर्तव्यता. वटपौर्णिमा मंगळागौर ही व्रते त्यासाठीच.

एखाद्या अविवाहित प्रौढ कुमारिकेला जगताना ही छोटी मुलगी बघत असते. तिचे एकाकी जीवन, लोकांमध्ये तिच्याबद्दल चालणारी कुजबूज, तिचे शील, वर्तणूक याबद्दल सतत चर्चा. म्हणजेच अर्थार्जन करून स्वावलंबी राहणारी मुलगी तिचा आदर्श ठरू शकत नाही. कुंकवाला धनी हा हवाच, याची तिच्या मनात खात्री होते. तिच्या शिक्षणाचा उद्देशसुद्धा चांगला नवरा मिळविणे हा असतो.

विधवा स्त्रियांचे जिणेही ही छोटी मुलगी बघत असते. नवऱ्याच्या मागे दिराच्या किंवा भावाच्या आधारावर शिळ्या भाकरीचा तुकडा खात ती जगत असते. तिची किंमत मोलकरणीएवढीच. स्त्रीजीवन हे परावलंबी ह्याची खूणगाठ तिच्या मनात पक्की बसते.

हुंडा हे परावलंबित्वाचे आणखी एक द्योतक. उच्च वर्गांयात हुंडा देऊन मुलीला पदरात घ्या अशी विनवणी करावी लागते. कनिष्ठ वर्गांय समाजात पैसे देऊन मुलगी विकत घेतली जाते. शेवटी मुलगी ही विकण्याची वस्तू. आश्चर्य म्हणजे 'कन्यादान' विधीला सुशिक्षितही आक्षेप घेत नाहीत. कन्येचे दान करणे ही जुनाट कल्पना कोणालाच चुकीची वाटत नाही.

साहित्य, चित्रपट, जाहिराती

या सर्व जुन्या रूढींचा प्रभाव नाटकांतून, सिनेमांतून व कादंबऱ्यांतून अधिकाधिक पक्का केला जातो. मराठी नाटके घ्या. स्त्रीचा सेवाभाव, शालीनता, प्रेमळपणा, आज्ञाधारकपणा याचे कौतुक केले जाते. बाळ कोल्हटकर, कानेटकर यांची नाटके याची साक्ष देतात. मराठी विनोदी लेखक स्त्रियांच्या अडाणीपणाची मंदबुद्धीची, भांडकुदळपणाची, नटवेपणाची पुरेपूर चेष्टा करतात. अनेक कादंबऱ्यांतून आदर्श स्त्री ही पारंपरिक गुणांची पुतळी म्हणून उभी केली जाते. चित्रपटांतूनही हेच आदर्श पोसले जातात. कपडे, लकबी, बोलणे यांतील बदलातून स्त्रीमधील वरवरचा बदल दाखविला जातो; पण स्त्री म्हणून जुनीच स्त्री समोर येते. त्याचबरोबर चित्रपट व जाहिराती या माध्यमांतून स्त्रीचे शरीर वापरले जाते. स्त्रीशरीराकडे एक उपभोग्य वस्तू म्हणून पाहण्याची व्यापारी दृष्टी निर्माण होते. पडद्यावरची झिनी बेबी आपणच

व्हावे असे वाटू लागते. तिचे चमचमणारे व्यक्तिमत्त्व भुरळ घालते. स्त्रीचा जन्म पुरुषाला आकर्षित करण्यासाठी स्त्रीत्वाची अशी प्रतिमा मुलींच्या मनात मूळ धरते. वेश्याव्यवसाय व बलात्कारासारख्या गुन्ह्यांमध्ये स्त्रीला एक व्यक्ती, माणूस न समजता एक उपभोग्य वस्तू उघडपणेच समजले जात असते; पण ह्या प्रवृत्तीची जास्त सौम्य व लहान रूपे समाजात सर्वत्र दिसतात. स्त्रीला सतत अत्याचाराची भीती वाटत राहते. रस्त्यावर देखील धक्क्यांपासून ती सुरक्षित नसते. या परिस्थितीमुळे ती अधिकाधिक पुरुषाच्या छत्राखाली, त्याच्या आधाराने सुरक्षितता मिळविण्यासाठी जाऊ लागते. असे हे दुष्टचक्र स्त्रीचे अबलत्व व पुरुषाचे वरिष्ठ स्थान वाढवतच नेत असते.

आजच्या स्त्रीचे समाजातील स्थान हे असे आहे; ते दुय्यम दर्जाचे आहे. आर्थिक जीवनातली व राजकीय जीवनातली सबंध रचनाच अशी बांधली गेलेली आहे की, स्त्री दुय्यम राहावी आणि ह्या रचनेला पूरक असे कौटुंबिक जीवन स्त्रीसाठी समाज बेतून देत असतो. विवाहपद्धती, पती पत्नीसंबंधामधील उच्च-नीच भाव इ. कौटुंबिक जीवनातील नियम पुन्हा एकदा स्त्रीच्या दुय्यमपणाचा खुंटा हलवून बळकट करतात. कारखान्यात, शेतात, ऑफिसात, रस्त्यावर आणि घरातसुद्धा स्त्रीचे सबंध जीवन दडपलेले व विकासाच्या शक्यता मारून टाकण्यात आलेले राहते.

याचबरोबर स्त्रीच्या स्वतःच्याच मनामध्ये या पुरुषी वर्चस्वावर आधारलेल्या समाजव्यवस्थेची पंचमस्तंभी तुकडी संस्कारांच्या रूपाने घुसलेली असते. सबंध सांस्कृतिक जीवनामध्ये स्त्री अबला, दासी, एक उपभोग्य शरीर आणि मोहवती, पापाची खाण या कल्पना पसरलेल्या असतात. तिच्या मातृत्वाच्या महानतेचा गौरव कागदावर अर्थातच होतो–पण प्रत्यक्षात बाळंतिणींपैकी अनेक जणी, कधी त्यांच्या अपत्यांसकट, मृत्युमुखी पडत असतात! तिला विज्ञानाची, कलांची, खेळांची कास धरण्याची संधी पुरुषांप्रमाणे मिळत नाही. कर्तबगारीला व खऱ्या सुसंस्कृत जीवनाच्या विकासाला वाव मिळत नाही. उलट दुबळी व असहाय स्त्री पुरुषापेक्षा जास्त धार्मिक, अंधश्रद्धाळू व संकुचित दृष्टिकोनाची बनते. सामर्थ्य, स्वातंत्र्य आणि खरीखुरी सुसंस्कृतता एकत्रच नांदू शकतात. याउलट स्त्री तिला स्वतःला जखडून टाकणाऱ्या साखळ्यांचीच मनोभावे पूजा करायला शिकते. स्त्री मुक्तीचा विचार करत असताना तिच्या पायांतल्या आर्थिक, कायदेविषयक, शैक्षणिक व राजकीय विषमतेच्या बेड्यांबरोबरच तिच्या सांस्कृतिक गुलामगिरीचाही विचार करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

स्त्रीच्या दुय्यम स्थानाचा ऐतिहासिक शोध

आजची स्त्री कशी आहे, कशी जगते हे आपण आतापर्यंत बघितले; पण आजची स्त्री अस्वस्थही आहे. कारण तिच्या भोवतालचे वातावरण झपाट्याने बदलत आहे. तिच्या मनावरचे पूर्वीचे संस्कार हळूहळू डळमळीत व्हायला लागले आहेत. पूर्वी तिच्या वाट्याला आलेली 'चूल आणि मूल' ही भूमिका तिने स्वीकारली होती. 'पती हाच देव' ही श्रद्धा मनात जोपासली होती. एकत्र कुटुंबपद्धतीमध्ये सासू, सासरा, थोरले दीर, जाऊ, नणंद यांचा मान राखणे हे तिच्या सवयीचे झाले होते. नवऱ्याच्या लाथा खाणे, सासूच्या हातचा मार खाणे, गरीब शेतकऱ्याची बायको असेल तर जमीनदाराच्या वासनेचा बळी होणे, प्रसंगी वेश्या होऊन पोटासाठी शरीरविक्रय करणे हेच सगळे तिच्या नशिबी होते. कथा-कीर्तनातून ती हेच ऐकत आली होती. 'बाईने खस्ता खाणे, सर्वांची सेवा करणे म्हणजे कुटुंबाला सुखी ठेवणे कुटुंबामध्ये शांतिसमाधान नांदणे.' वर्षानुवर्षे स्त्रीने हे मान्य केले. आज मात्र तिच्यामध्ये बदलाला सुरुवात झाली आहे.

आणि तरीदेखील हे बदल पुरेसे नाहीत. अजून तथाकथित विचारवंतांचे परिसंवाद होतात. 'स्त्रीने नोकरी करावी की नाही?', 'ज्या घरातील स्त्री नोकरी करीत नाही तेथे सुखाचा वास असतो.' नोकरी करणारी स्त्रीही म्हणते, 'उद्या जर आमच्या ह्यांचा पगार वाढला तर मी नक्कीच घरी बसून राहीन!', 'स्त्री-पुरुषातील फरक हा नैसर्गिक आहे. निसर्गानेच स्त्रीला दुबळे केले आहे. तिच्यावर संततीची जबाबदारी सोपविली आहे. पुरुषावर तिच्या संरक्षणाची व पोषणाची जबाबदारी आहे. स्त्री-पुरुषांमध्ये समानता आणायचा हट्ट धरणे हे निसर्गाविरुद्ध जाण्यासारखे आहे.' असे भाषण देऊन टाळ्यांचा कटकडाट मिळविणारे महाभाग आपल्याकडे आहेत. त्यांचे म्हणणे बरोबर आहे का? त्यांचे म्हणणे कोणत्याही शहाण्या डोळस माणसाला पटू शकेल का?

स्त्री व पुरुष यांच्यामध्ये नैसर्गिक, शारीरिक फरक आहे; परंतु बौद्धिक दृष्ट्या स्त्री-पुरुष यांची कुवत समान असल्याचे शास्त्रसिद्ध आहे. पुरुषांमध्ये स्नायूची शक्ती जास्त आहे. स्त्रीकडे लवचिकता व चिवटपणा अधिक आहे; पण या फरकाला आज किती महत्त्व आहे? पूर्वीची परिस्थिती वेगळी होती. त्या वेळी शारीरिक बळाला अधिक महत्त्व होते; पण आज यंत्राच्या वाढत्या वापराबरोबर शारीरिक शक्तीचे महत्त्व कमी कमी होत चालले आहे. त्यामुळे व्यवसायाची अधिकाधिक क्षेत्रे स्त्रियांना खुली होत आहेत. त्याप्रमाणे आधुनिक वैद्यकशास्त्रा-

मुळे, संततिनियमन व संगोपन याबाबत उपलब्ध झालेल्या नव्या तंत्रामुळे स्त्रीवरची मातृत्वाची जबाबदारी ही तिच्या दुय्यम स्थानाचे कारण होण्याचे काही कारण नाही. स्त्री व पुरुष यांच्यातील नैसर्गिक फरक हा त्यांच्या सामाजिक उच्चनीचतेचा पाया म्हणून १९८४ सालात धरण्याचे काही एक कारण नाही ! नैसर्गिक फरकाचा बागुल-बोवा करून नव्या अस्वस्थ जाणिवा वाढू नयेत यासाठी निव्वळ धूळफेक केली जात आहे.

नैसर्गिक फरकाच्या नावाखाली अजूनही स्त्री व पुरुष यांच्यामध्ये सामाजिक भेदभाव केला जातो. पुरुष श्रेष्ठ व बाई कनिष्ठ ही भावना सर्व थरांतील, सर्व वर्गांतील लोकांमध्ये आढळते. स्त्रिया या वेगवेगळ्या वर्गांत विभागलेल्या आहेत. भांडवलदार व व्यापारी यांच्या बायका, मध्यमवर्ग-पांढरपेशांच्या बायका, कामगारांच्या बायका, शेतकरी व शेतमजुरांच्या बायका, हे स्त्रियांमधील चार ढोबळ थर झाले. प्रत्येक वर्गातील स्त्री ही त्याच वर्गातील पुरुषांच्या तुलनेने दुय्यम राहिलेली आहे. भांडवलदारापेक्षा त्याच्या बायकोचे स्थान कनिष्ठ आहे. ती पुष्कळदा प्रतिष्ठा मिरवणारी बाहुली म्हणूनच वावरते. मध्यमवर्गीय नोकरदार माणसापेक्षा त्याची गृहिणी खालच्या दर्जाची असते. मध्यमवर्गीय बाईने जरी नोकरी करून घरात पैसे आणले तरी तिला बहुतेक बाबतीत स्वतःचे पैसे खर्च करतानाही नवऱ्याची परवानगी घ्यावी लागते हे आपण पाहतो. कायद्यानेही तिचे पालकत्व तिच्या नवऱ्याकडे असते ! कामगार आपल्या पत्नीला जरबेत ठेवून असतो. कामगार-स्त्रीचे हाल तर भयंकर असतात. कारखान्यात आणि घरी अशा दोन पाळ्या काम करून तिचा जीव मेटाकुटीस येतो. तिचा कामगार नवरा मात्र कारखाना सुटल्यावर दारूच्या गुत्त्यावर जाऊ शकतो किंवा बिडी फुंकत पत्ते खेळत बसतो. शेतकऱ्याची बायको शेतात काम करते. पण पैशावर अधिकार नवऱ्याचा. जमीन त्याच्या मालकीची. शेतमजुरीला जाते; घरी येऊन भाकरी भाजते आणि नवरा दारू पिऊन आला तर त्याच्या हातचा मारही खाते. यावरून लक्षात येते की, आज समाजात जी श्रमविभागणी आढळते ती केवळ नैसर्गिक नाही. नैसर्गिक फरकास समाजात विशिष्ट प्रकारे रूप येऊन स्त्रीला आज आर्थिक व सांस्कृतिक गुलामी पत्कारावी लागली आहे. ती आज दडपली गेली आहे, याला कारण केवळ जीवशास्त्रीय कारणाहून काहीतरी वेगळे असले पाहिजे आणि ते कारण इतिहासात शोधले पाहिजे. स्त्रीला आज जे दुय्यम स्थान प्राप्त झाले आहे ते मानवी समाजाचा विकास होत असताना घडत गेलेल्या सामाजिक व्यवहारातून प्राप्त झाले आहे.

मानवी समाजाचा विकास कसा होतो ?

जगातल्या प्रत्येक वस्तूमध्ये सतत बदल घडत असतो. ती जन्मते, स्वतःच्या

वैशिष्ट्यपूर्ण स्वभावानुसार किंवा गतीनुसार विकास पावते आणि अखेर नष्ट पावते. दगडधोंड्यांपासून माणसाच्या जीवनापर्यंत व विचारांपर्यंत काहीही घ्या. काहीच शाश्वत, अपरिवर्तनीय असे नसते. त्याचप्रमाणे माणसाचा समाजसुद्धा बदलत असतो. म्हणजेच माणसाला काहीतरी इतिहास असतो. वर्तमानकाळात तो अमुक एक स्वरूपाचा माणूस असतो. तर स्त्रीच्या दुय्यम स्थानाच्या कारणांचा आपल्याला छडा लावायचा असेल तर शास्त्रीय दृष्टीने इतिहासाचा आपण अभ्यास केला पाहिजे. इतिहासाचा अभ्यास करायचा म्हणजेच मानवाच्या ह्या सतत बदलत्या सामाजिक व्यवहाराचा अभ्यास करायचा. त्यातून मानवी विकासाचे सूत्र आपल्याला गवसते. समाजातील बदल कसे घडून येतात त्याचे कारण आपल्याला समजते. बदलांमागील प्रेरक शक्ती निश्चित करता येते. समाजातील बदलांचे नियम आपल्या लक्षात येतात आणि या नियमांच्या ज्ञानाचा फायदा घेऊन आपण स्वतः समाजाच्या विकासाच्या गतीला वळण लावू शकतो, चालना देऊ शकतो. समाजातील बदल आपल्या इच्छेनुसार व अधिक वेगाने घडवू शकतो. स्त्रीचे समाजातील स्थान बदलायचे असेल तर आपण सर्वांनी ही सामाजिक बदलाची प्रक्रिया समजून घेणे आवश्यक आहे. याच अभ्यासातून स्त्रीला स्वातंत्र्य मिळणे शक्य आहे की नाही, स्त्री-पुरुषांना समान संधी व समान अधिकार मिळणे शक्य आहे किंवा नाही, शक्य असेल तर कसे इत्यादी प्रश्नांना उत्तरे मिळतील. त्याचबरोबर स्त्री-मुक्तीची व्याख्याही आपोआप तयार होईल. स्त्री-मुक्तीचा अर्थ सर्वांच्याच मनात स्पष्टपणे उभा राहील व मार्गही सापडेल.

मानवी समाजाचा विकास कसा होत गेला या प्रश्नाचे उत्तर मिळविण्यासाठी आपल्याला प्रथम निसर्गाकडे वळावे लागते. मानव हा निसर्गाचाच एक घटक आहे. निसर्गातील दुसरा एक घटक म्हणजे प्राणिजगत. आज आपल्याला असे चित्र दिसते की, जिवंतपणा, चैतन्यशीलता हे प्राणी व मानव या दोघांचेही गुणधर्म. तरीसुद्धा आज हजारो वर्षांनंतर मानवी समाज कितीतरी विकसित झाला आहे. आणि प्राणिजगत मात्र त्याच स्थितीमध्ये वर्षानुवर्षे जगत आले आहे. याचा अर्थ या दोघांमध्ये काही महत्त्वाचा फरक आहे. या फरकामुळेच निसर्ग आणि मानव यांचे नाते व निसर्ग व प्राणी यांचे नाते वेगवेगळ्या स्वरूपाचे असते आणि म्हणूनच इतर प्राणी व मानव यांची तुलना एका मर्यादेपर्यंतच करता येते. नैसर्गिक गुण, नैसर्गिक प्रवृत्ती हे शब्द प्राण्यांच्या बाबतीत खरे असतात. पण मानवाच्या बाबतीत मात्र नैसर्गिक गुण, प्रवृत्ती या गोष्टी कायम स्वरूपाच्या व सर्वाधिक महत्त्वाच्या नसतात. कारण निसर्गामध्ये बदल करीत असता मानव स्वतःही बदलत असतो.

हे माणसाचे वेगळेपण तपशिलात तपासून पाहू. प्राणी व माणूस दोघेही निसर्गावर अवलंबून आहेत. प्राणी सर्वस्वी निसर्गाच्या नियमांनुसार चालतात. काही वेळा निसर्गाच्या लहरींना बळी पडतात. निसर्गात आयते मिळेल ते अन्न खातात. गवत

झाडपाला, दुसऱ्या प्राण्यांची शिकार यावर त्यांचा उदरनिर्वाह चालतो. मात्र ते निसर्गाला वाकवू शकत नाहीत. आपल्या गरजांसाठी निसर्गाला अनुकूल करून घेऊ शकत नाहीत. निसर्गामध्ये फारसा बदल करू शकत नाहीत. त्यांची कृती जाणीवपूर्वक नसते.

मानवाचे वैशिष्ट्य म्हणजे मानव निसर्गावर प्रक्रिया करून निसर्ग आपल्या गरजांसाठी वापरू शकतो. आपल्या बुद्धीमुळे तो निसर्गापासून अनेक गोष्टी शिकतो आणि त्या ज्ञानाच्या आधारे निसर्गावर विजय मिळवत जातो. निसर्गाच्या नियमांचे आकलन करून ते नियम वापरूनच तो आपली प्रगती करतो. आपल्या मानवी शक्तींचा म्हणजेच नैसर्गिक शक्तींचा जास्त जास्त विकास करत जातो. तो बोट करायला शिकतो व पाण्यावर तरंगतो. विमान करायला शिकतो व हवेमध्ये संचार करतो. सुसाट वाहणारे पाणी अडवून त्याच्या प्रचंड शक्तीचा उपयोग करून वीज तयार करतो. तो निसर्गाच्याच साहाय्याने, निसर्गात राहूनच, निसर्गापासून जास्त जास्त स्वातंत्र्य मिळवतो.

पण एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, निसर्गावर प्रक्रिया करताना मानव एकेकटा नसतो. प्राणी जसे कळप करून राहतात तसे मानवालाही टोळीमध्ये राहावे लागते. कळप व टोळी यामध्ये महत्त्वाचा फरक आहे. कळप हा नैसर्गिक प्रेरणेनुसार बनलेला समूह असतो. मानवाच्या टोळीची अंतर्गत संघटना वेगळी असते. माणूस एकटा निसर्गावर प्रक्रिया करून आपली प्रगती करू शकत नाही. त्याला सामूहिक रीत्याच काम करावे लागते. या समाजाशिवाय तो माणूस म्हणून अस्तित्वातच राहू शकत नाही. म्हणूनच मानवी श्रम हे नेहमी सामाजिक श्रम असतात आणि मानव हा नेहमीच सामाजिक असतो.

मानवी अस्तित्वासाठी या दोन मूलभूत गोष्टी आवश्यक असतात. निसर्गावर प्रक्रिया करून म्हणजेच श्रम करून पोट भरणे व त्यासाठी संघटित समाजात राहणे. सामाजिक रीत्या निसर्गावर श्रम प्रक्रिया करणे यालाच माणसाचे उत्पादनकार्य म्हणता येईल. म्हणूनच सामाजिक उत्पादन-प्रक्रिया हा मानवी समाजाचा गाभा आहे. प्राण्यांना आपण संग्राहक व मानवाला उत्पादक म्हणू शकू.

उत्पादन केवळ दोन हात व दोन पाय यांच्या मदतीने होते का ? अगदी आदिमानवाचे उदाहरण घेऊ. तो झाडावरचे फळ पाडण्यासाठी दगड मारायला शिकला ही फार महत्त्वाची घटना होती. निसर्गातीलच एका घटकाचा वापर करून तो आपल्याला हवी ती वस्तू हस्तगत करायला शिकला. म्हणजेच त्याने आपल्या हातांची कार्यक्षमता वाढविली. त्याने साधन शोधून काढले. हत्यार शोधून काढले. पुढे शिकार करण्यासाठी तो अणकुचीदार दगड वापरू लागला. शेती करण्यासाठी अशा प्रकारच्या दगडी व लाकडी हत्यारांचा तो उपयोग करू लागला. आगीचा शोध, चाकाचा शोध

लागला. याचाच अर्थ त्याने उत्पादनाची साधने शोधून काढली. मानवी प्रगतीची गुरुकिल्ली आपल्याला येथे सापडते. इतिहासाकडे नजर टाकली तर आपल्याला आढळते की सर्वसाधारणपणे उत्पादनसाधनातील व त्याचा वापर करण्याच्या समाजाच्या पद्धतीतील बदल व एकंदर मानवी जीवनपद्धतीतील बदल हे समांतरपद्धतीने जातात.

जीवनपद्धतीत बदल : उत्पादनव्यवस्थेत बदल

जीवनपद्धतीत बदल होणे म्हणजे काय ? नुसत्या कपड्यांमध्ये, भाषेमध्ये, अन्नाच्या विविध प्रकारांमध्ये बदल होणे एवढा मर्यादित अर्थ घेऊन चालेल का ? नाही. हे बदलही महत्त्वाचे असतात, पण ते तसे वरवरचे असतात. जीवनपद्धती या शब्दात बराच सखोल अर्थ सामावलेला आहे. मघाशी आपण पाहिले की, मानव उत्पादन करतो. अन्न, कपडे, हत्यारे व भाषा, कला सर्व काही निर्माण करतो. पण हे उत्पादन सामाजिक असते. हा समाज संघटित असतो. जेव्हा आपण जीवनपद्धतीत बदल होतो हा शब्दप्रयोग वापरतो तेव्हा राहणीमानात बदल होतो, त्याचबरोबर सामाजिक संघटनेमध्ये बदल होतो, असा अर्थ आपल्याला अभिप्रेत असतो. सामाजिक संघटनेत बदल होतो म्हणजेच मानवांच्या परस्पर संबंधात बदल होतो. हे संबंध ज्या नियमांनुसार घडले जातात त्या नियमांमध्ये बदल होतो. उदाहरणार्थ, प्रथम अणकुचीदार दगड, हाडे यांच्या साहाय्याने शिकार करून राहणारा मानव टोळी करून राही. टोळीतील सर्व समान असत. सर्व मिळून शिकार करीत व सर्व मिळून वाटून खात. दुबळ्यांना संरक्षण दिले जाई. पुढे नांगराचा शोध लागून समाज स्थिर झाल्यावर माणसांचे परस्परांशी संबंध बदलले. जमिनीचे मालक व जमिनीवर कष्ट करणारे शेतकरी असे संबंध प्रस्थापित होऊन उच्चनीचता आली. उत्पादनसाधनांवर मालकी असणारे व नसणारे अशी समाजाची विभागणी झाली.

थोडक्यात आपल्याला असे म्हणता येईल की, मानव निसर्गावर सामाजिक रीत्या प्रक्रिया करतो, म्हणजेच उत्पादन करतो, हे उत्पादन त्यासाठी उपलब्ध असणारी उत्पादनसाधने, तंत्र व श्रमशक्ती वापरून तो करतो. तसेच विशिष्ट समाजसंघटनेच्या चौकटीत ते होते. ही संघटना म्हणजेच माणसांचे परस्परांशी असलेले नियमबद्ध संबंध. यांनाच 'उत्पादन संबंध' म्हणतात. आणि या संबंधांनी बनलेल्या समग्र व्यवस्थेला 'उत्पादन व्यवस्था' असे शास्त्रीय नाव आहे.

जेव्हा आपण जीवनपद्धतीमध्ये बदल घडतो म्हणतो तेव्हा या सर्वांमध्ये बदल होत असतो. हा सर्व बदल कोणत्याही आकाशातील दैवी शक्तीच्या इच्छेनुसार होत नसून हा बदल केवळ मानवी व्यवहारातून होत असतो, हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. नवे नवे शोध लागतात. उत्पादनाची नवी साधने, हत्यारे, यंत्रे शोधली जातात ती

मानवाच्या उत्पादनाच्या प्रक्रियेतूनच. ज्ञान साठत जाते व मानवी बुद्धी अधिक प्रगल्भ होते. ह्या उत्पादन साधनांच्या बदलांमुळे उत्पादनशक्ती वाढतात. उत्पादन-व्यवस्था ज्या उत्पादन संबंधांच्या चौकटीत काम करते त्या चौकटीत त्या शक्ती मावत नाहीत व ती चौकट मोडून पडते. नवे उत्पादन संघटन तयार होते. मानवांचे परस्परांशी संबंध बदलतात. त्याचबरोबर जीवनाच्या इतर क्षेत्रांतील संघटन, राजकीय, सांस्कृतिक जीवनपद्धतीदेखील आमूलाग्र बदलून जाते. मानवी समाज विकासाच्या वरच्या अवस्थेत जातो.

प्राथमिक श्रमविभागणीला लिंगभेदाचा आधार

हे जरा सविस्तर सांगण्याचे कारण स्त्रीच्या समाजातील स्थानाचा शोध आपल्याला शास्त्रीय दृष्टिकोनातून या चौकटीत घ्यावा लागतो. उत्पादन प्रक्रियेमध्ये स्त्रीचे स्थान काय होते व काय राहिले आहे, हे आपल्याला पाहावे लागेल. उत्दादन प्रक्रियेतच मानवाचे आर्थिक परस्पर संबंध निश्चित होतात. त्याचप्रमाणे इतर प्रकारचे संबंध, उदा. स्त्री-पुरुष संबंध सामाजिक व्यवहारांतूनच घडले जातात. मानव जेव्हा टोळी करून राहत होता आणि टोळीचे सर्व सभासद मिळून शिकार करून उदरनिर्वाह करत होते त्या वेळी सर्व स्त्री-पुरुष समान असल्याचे इतिहास सांगतो. टोळीतील शक्तिशाली माणूस बहुधा टोळीचा नायक बने; पण त्यालाही विशेष अधिकार नसत. सर्वांच्या सोयीने टोळीचा कारभार चाले. अपंगांना संरक्षण मिळे. त्याचबरोबर स्त्रीच्या मातृत्वालाही खास संरक्षण मिळे. मातृत्व ही नैसर्गिक घटना होती. एवढेच नव्हे तर नवा मानव जन्माला घालणे म्हणजे नवी उत्पादकशक्ती जन्माला घालणे असा त्याचा व्यावहारिक अर्थ होता. ह्या सर्जनशीलतेचे त्या आदिमानवाला अतिशय अप्रूप होते. स्त्रीकडे निर्मितिशक्तीचा मूलस्त्रोत म्हणून पाहिले जाई. मात्र मातृत्वाच्या या जबाबदारीमुळे स्त्रीला नैसर्गिक रीत्याच उत्पादनकार्यासाठी कमी वेळ देता येई. उत्पादनामध्ये पुरुष जितका भाग घेऊ शके तेवढा भाग स्त्रीला घेता येणे शक्य नव्हते. लहान मुलांची देखभाल, घराभोवतालच्या गवताचे बी जमा करणे हे काम प्रामुख्याने ती करी. या सुमारास टोळीच्या संघटनेमध्ये आपल्याला पहिली श्रमविभागणी झालेली आढळते. ही श्रमविभागणी लिंगभेदावर आधारित होती : पुरुषाकडे मुख्यतः उत्पादनाचे काम व स्त्रीकडे अपत्य संगोपनाचे काम व घरकाम. एक गोष्ट येथे लक्षात येते की, या श्रमविभागणीमुळे स्त्रीला समाजात दुय्यम स्थान आले नव्हते. हा मुद्दा खास लक्षात ठेवणे आवश्यक आहे. कारण पारंपरिक पद्धतीने विचार करणारे लोक या नैसर्गिक कारणांना आजही अवास्तव महत्त्व देतात.

जोपर्यंत अणकुचीदार दगडी हत्यारे होती, तोपर्यंत हा टोळीसमाज याच पद्धतीने राहत होता; पण त्यानंतर नवे नवे शोध लागत गेले. त्यांपैकी दोन महत्त्वाचे शोध

म्हणजे– (१) शेतीचा शोध, (२) पशुसंवर्धन वा गुरे पाळणे. या शोधांमुळे फार महत्त्वाची गोष्ट घडली. मानवी समाजाची उत्पादनशक्ती वाढली. पूर्वी जेमतेम शिकार करून, फळे गोळा करून आपले पोट भरणाऱ्या टोळ्या आता अन्नसंग्रह करुन ठेवू शकत. पूर्वी शिकार मिळाली नाही तर उपास पडत. आता गुरे पाळणे सुरू झाल्यामुळे गरज पडेल तेव्हा त्यांचे मांस उपयोगी पडू लागले. अणकुचीदार दगड किंवा धारदार हत्यार यांच्या साहाय्याने जमीन खणून, बी पेरून धान्य पिकविणे ही क्रिया सुरू झाल्यामुळे धान्याचा संग्रह करता येऊ लागला. पुढे नांगराचा शोध लागल्यामुळे तर एक माणूस शेतीमध्ये श्रम करून स्वतःचे पोट भरून उरेल एवढे निर्माण करू लागला आणि मानवाच्या तीक्ष्ण बुद्धीला एक नवे सत्य गवसले. पूर्वी टोळ्यांमध्ये युद्धे झाली की विजयी टोळी दुसऱ्या टोळीला आमच्या जंगलातून निघून जा म्हणून आज्ञा देई किंवा मारून टाकी. कारण जंगलातील अन्न सर्वांना पुरेल की नाही याची शाश्वती नसे. आता श्रमांची उत्पादकता वाढली होती. एका मानवाच्या श्रमातून त्याला पुरून उरेल असे बरकड धान्य तयार होऊ लागले होते. पराभूत टोळीला आपल्या दास्यात ठेवून त्यांच्याकडून काम करून घेणे शक्य होते. विजयी टोळीतील काही लोक बसून राहिले, त्यांनी श्रम केले नाहीत तरी चालणार होते. पराभूत टोळीतील लोकांनी जमिनीत श्रम केले तर जे धान्य निर्माण होईल ते धान्य कष्ट करणाऱ्या लोकांच्या भुकेला पुरून शिवाय उरणार होते. त्या अन्नावर जेत्या टोळीतील लोक आपली पोटे भरू शकत होते. येथे दुसरी महत्त्वाची श्रमविभागणी सुरू झाली. ही श्रमविभागणी कष्ट करणारे व कष्ट न करणारे यांवर आधारित होती. यातूनच शारीरिक श्रम व बौद्धिक श्रम अशी विभागणी आली. नवी उत्पादसाधने निर्माण झाली. उत्पादनशक्ती वाढली. आणि त्यासाठी आवश्यक त्याप्रकारे समाजसंघटना बदलली. समान पातळीवर राहून उत्पादन प्रक्रियेत भाग घेणारा मानव आता दोन पातळ्यांमध्ये विभागला गेला. उत्पादन-संबंध बदलले. समाजामध्ये वर्ग पडले. उत्पादन साधने व जमीन यांचा मालक वर्ग व त्यासाठी काम करणारा कष्टकरी, गुलाम वर्ग यातूनच वर्गसमाजाची निर्मिती झाली.

वर्गसमाज

ह्या वर्गसमाजाचा पाया काय होता? आता आपण पाहिले त्याप्रमाणे मानवी श्रमातून जी अतिरिक्त उत्पादन काढण्याची 'किमया' आहे, त्या किमयेतून हा वर्गसमाज जन्माला आला. जोपर्यंत प्रत्येकाला आपापले पोट भरेल एवढीच शिकार मिळत होती, फळे मिळत होती तोपर्यंत सर्व समान होते. गुलाम बाळगणे शक्य नव्हते. गुलामाला खायला दिले नाही तर गुलाम मरणार आणि गुलामाकडून त्याचे स्वतःचे पोट भरून उरू शकेल इतके धान्य उत्पादन होणे शक्य नव्हते. त्यानंतर मात्र

अतिरिक्त उत्पादन आणि त्या उत्पादनाचे अपहरण हा वर्गसमाजाचा पाया बनला. म्हणजेच एका माणसाने दुसऱ्याची पिळवणूक करणे हा या समाजाचा नियम होता आणि जोपर्यंत वर्गसमाज कायम आहे तोपर्यंत हा नियम कायम राहील.

आजही निसर्गाच्या कच्च्या मालावर कामगार श्रम ओततो. त्यातून यंत्रे तयार होतात. यंत्रे म्हणजे काय ? कामगाराचे गोठवलेले श्रम. खाणीतून लोखंड काढण्यापासून ते यंत्रे तयार होईपर्यंत त्यात कामगाराचे श्रम ओतले जातात. म्हणून त्याला आज बाजारात मूल्य लाभते. त्याच यंत्रावर काम करून पुन्हा तो उपभोग्य वस्तू बनवतो; पण त्या वस्तूंवर मालकी मात्र कारखानदारांची. कामगारांना जीवनावश्यक वेतन देऊन बाकी सर्व पैशांवर कारखानदारांचा हक्क. ह्याच शोषणातून आणि पिळवणुकीतून कारखानदारांकडे भांडवलसंचय होतो. कामगाराला त्याच्या संपूर्ण श्रमांचा मोबदला मिळत नाही.

या वर्गसमाजातच अधिकाधिक श्रमविभागणी होत गेली. टोळीतील लोकांमध्ये वेगवेगळ्या गरजांनुसार लोक आपले कार्यक्षेत्र निश्चित करू लागले. शेतीसाठी पावसाचे ऋतुचक्र शोधणे आवश्यक होते. त्यासाठी नक्षत्रांचे गणित मांडायचे प्रयत्न सुरू झाले. धान्य मोजण्याचे गणित, संवादासाठी चिन्हांची जरुरी, भाषा असे मानवी व्यवहाराचे क्षेत्र वाढत चालले. पुढे निसर्ग व मानव यांच्या संबंधांच्या शोधात तत्त्वज्ञानाच्या मांडणीचा प्रयत्न, दैवी शक्तीची कल्पना, धर्म वगैरे अमूर्त कल्पनांचा विस्तार होऊ लागला. प्राचीन भारतात अनेक टोळ्या, जमाती, त्यांचे संकर, व्यवसायानुसार त्यांची श्रमविभागणी व उत्पादनपद्धतीतील बदल यांतूनच पुढे जातिव्यवस्था तयार होत गेली. तिला पावित्र्याच्या व श्रेष्ठतेच्या कल्पनांचा व सांस्कृतिक मूल्यांचा आधार दिला गेला. वर्गसमाजातच शेती प्रगत होऊन जीवन स्थिरावू लागले व ग्रामसंस्था निर्माण झाली. या गावांच्या संरक्षणाची गरज तयार झाली. लढवय्या वर्गाचा उदय झाला. त्यांच्यातून राज्यसंस्था तयार झाली. अशा तऱ्हेने हळूहळू सुव्यवस्थित, सुसंघटित, उतरंडीवर आधारित समाज तयार होत गेला. मात्र ही श्रमविभागणी कष्ट करणारे व कष्ट न करणारे या वर्गाच्या मोठ्या चौकटीच्या आतच होती हे विसरता कामा नये. वर्गसमाजाच्या घडणीत स्त्रियांचीही विभागणी दोन ढोबळ वर्गांमध्ये झाली. कष्ट करणाऱ्या समाजातील स्त्रिया कष्ट करीत राहिल्या. कष्ट न करणाऱ्या समाजातील स्त्रिया पिळवणुकीत सहभागी झाल्या. त्या राज्यकर्त्या वर्गाचा भाग बनल्या. पश्चिमी जगात आदिम टोळीप्रधान साम्यवाद, गुलामगिरी, सरंजामशाही अशा सामाजिक अवस्था ढोबळ मानाने भांडवलशाहीपूर्व काळात दिसतात. भारतात वा इतर ठिकाणी समाजाचा विकास थोड्या वेगळ्या प्रकारे झाला. परंतु इतिहासाकडे पाहण्याची वरील शास्त्रीय दृष्टी आपण सगळीकडे वापरून अभ्यास करू शकतो. या तपशिलात येथे शिरण्याचे आपल्याला कारण नाही.

कुटुंबसंस्था व स्त्रीची गुलामी

मग स्त्रीच्या दास्याला सुरुवात कशी झाली ? त्या पुरुषांच्या अंकित कधी झाल्या ? पुरुषांच्या अंकित जाणे हे सर्व थरांतील स्त्रियांचे समान वैशिष्ट्य आढळून येते. उच्च वर्गातील स्त्री कनिष्ठ वर्गातील स्त्रीची पिळवणूक करते; पण त्याच वेळी ती स्वतःसुद्धा दासी असते, गुलाम असते, तिचीही पिळवणूक होते. याचे कारण काय ?

वर आपण पाहिलेल्या अतिरिक्त उत्पादनावर आधारलेल्या वर्गसमाजाच्या विविध अवस्थांच्या संदर्भातच आपल्याला कुटुंबसंस्था जन्माला आलेली व विकासलेली आढळते. अतिरिक्त उत्पादनाचे ते फळ आहे. स्त्रीने अपत्यसंगोपन व घरकाम करायचे व पुरुषाने उत्पादन करायचे ही अगदी पहिली श्रमविभागणी आपण पाहिली. त्यावेळी स्त्रीचे स्थान दुय्यम नव्हते. मात्र अतिरिक्त उत्पादन सुरू झाले. अन्नाचा, संपत्तीचा संग्रह करता येणे शक्य झाले. उत्पादनसाधनांवरील मालकी हक्काला सुरुवात झाली. खाजगी मालकी ही कल्पना उदयाला आली. मानवी शक्ती हाही संपत्तीचा मूलस्त्रोत. ह्या मानवी शक्तीला जन्म देणारी स्त्री. तिच्यावरही हक्क गाजविला जाऊ लागला. उत्पादनाचे संबंध, मालकी हक्क आणि लैंगिक संबंधांची व्यवस्था या परस्पर पोषक असणे आवश्यक होते. मेल्यानंतर संग्रहीत संपत्ती कोणाकडे जायची ? जमिनीची मालकी, गुरांची मालकी कोणाकडे जायची ? स्त्रीच्या पोटी जन्माला येणाऱ्या मुलांकडे. हे मूल माझे असले पाहिजे. ही खात्री होण्यासाठी ह्या स्त्रीचा इतरांशी संबंध येता कामा नये, ती सर्वस्वी माझ्या अंकित पाहिजे ही कल्पना तयार झाली. त्यातूनच विवाहसंस्था निर्माण झाली. नंतर स्त्रिया, त्यांची मुले, त्यांच्या शेतावर काम करणारी कुटुंबे व त्यांचा स्वामी पुरुष अशी सर्व माणसे मिळून एक पुरुषप्रधान 'गृहसंस्था' इतिहासाच्या क्रमात उदयाला आली. या कुटुंबव्यवस्थेचा जर अभ्यास केला तर आपल्याला स्त्रीचे समाजातील आजचे स्थान असे का याचे उत्तर मिळेल. या कुटुंबव्यवस्थेचा पाया त्या वेळच्या इतर सर्व संस्थांप्रमाणे पिळवणुकीवरच आधारित होता. ही पिळवणूक कशा प्रकारे अंमलात येई हे पाहण्यासाठी आपल्याला कुटुंबाची जडणघडण, त्यातील नात्यांचे संबंध तपासून पाहावे लागतील. वरवर पाहता आपल्याला ती साधी श्रमविभागणी वाटते. तसेच प्रेमाचे आवरणही घट्ट लपेटलेले असते. त्यामुळे कुटुंबातील पुरुष श्रेष्ठ व बायका कनिष्ठ हे कसे ते उघडपणे दिसू शकत नाही. त्यातही पुन्हा अधिकारांची उतरंड तयार झालेली असते. त्यामुळे सासू सुनेचा छळ करते, असेही चित्र दिसते. त्यामुळे अधिक गुंतागुंत तयार होते.

सर्वसाधारणपणे पाहिले तर कुटुंबसंस्था हा उत्पादनाचा सर्वांत प्राथमिक पातळीवरचा घटक तयार झाला. आता पुरुष व स्त्रिया यांचे संबंध रूढींनी निश्चित झाले.

संतती ही समाजाची न राहता वैयक्तिक मालकीची झाली. जमीन, गुरे, धनदौलत ही पुरुषाच्या मालकीची असे. त्याच्या मृत्यूनंतर ती पुढील पुरुषाकडेच जाई. ह्या कुटुंबाच्या शेतात पिकलेले धान्य त्या कुटुंबाला मिळू शके. सामाजिक मालकी असताना गरजेप्रमाणे प्रत्येकाला धान्य मिळे. आता मालकी हक्काप्रमाणे मिळू लागले. स्त्रिया शेतात काम करीत. शिवाय घरातील सर्व कामे त्यांना करावी लागत. स्वयंपाक, कापड विणणे, कोंबड्या पाळणे, लहान मुलांचे संगोपन, म्हाताऱ्यांची, आजाऱ्याची सेवा; परंतु मालकी हक्क पुरुषाकडे असल्यामुळे शेतातून पिकलेल्या धान्यावर तिचा हक्क नसे. तिला ते कोणालाही उचलून देता येत नसे. खूप श्रीमंत घरांमध्ये कामाला दासदासी असल्यामुळे स्त्रियांना काम करावे लागत नसे. मात्र अशी संख्या फारच कमी होती. स्त्रियांकडे संपत्ती व जमीन नसल्याने त्यांना पुरुषाबरोबर राज्यकारभारात भाग घेता येत नसे. शिक्षण मिळत नसे. अशी सर्व तऱ्हेने तिची कोंडी होई. उत्पादनकार्यात भाग घेऊन सुद्धा ती सामाजिक व्यवहारातून बाहेर फेकली गेली. जाति-संस्था, ग्रामसंस्था, राज्यसंस्था यांत तिला स्थान मिळाले नाही. तिचा समाजापासून प्रत्यक्ष संबंध सुटला आणि घरातील सर्व कामांची जबाबदारी तिच्यावर टाकून पुरुष तिचा मालक बनला. स्वतंत्र बनला.

कष्टकरी समाजातील पुरुषांची पिळवणूक होत होतीच. त्यांचे अतिरिक्त उत्पादन मालक वर्ग काढून घेत होता. पण हा कष्टकरी पुरुषसुद्धा त्याच्या घरामध्ये श्रेष्ठ होता. आणि पत्नीकडून सेवा करून घेत होता. मालक वर्गामध्ये चालत आलेली पुरुषश्रेष्ठ-त्वाची कल्पना त्यानेही स्वीकारली होती. मालक वर्गाची विचारसरणी अनुसरत तोही पत्नीवर अधिकार गाजवू लागला. मात्र या वर्गातील स्त्रियांची स्थिती व मालक-वर्गातील स्त्रियांची स्थिती यामध्ये फरक होता. मालकवर्गातील स्त्रियांकडे प्रजो-त्पादन करणे, संपत्तीला वारस तयार करणे हे काम प्रामुख्याने होते. घरातील बऱ्याच कामांसाठी दासदासी असत. तिचा उत्पादनकार्यात अजिबात भाग नसे. संपत्तीवर तिचा अधिकार नसे. विवाहापूर्वी बापाची मुलगी, विवाहानंतर पतीची पत्नी व पतीच्या मागे मुलाची माता या संदर्भातच तिला अस्तित्व असे. ती या ना त्या स्वरूपात पुरुषावर अवलंबून असे. तिच्या उदरभरणासाठी तिला पुरुषाकडे पाहावे लागे.

या उलट कष्टकरी समाजातील स्त्रीला नवऱ्याच्या बरोबरीने शेतामध्ये किंवा त्याच्या व्यवसायात काम करावे लागे. त्यामुळे संबंध समाजव्यवस्थेतील पिळवणूक तर तिला सहन करावी लागेच. त्याचबरोबर प्रजोत्पादनाची जबाबदारी असे आणि घरकामही तिलाच करावे लागे. म्हणजे शारीरिक कष्ट नवऱ्यापेक्षाही काकणभर जास्त आणि सामाजिक रूढी म्हणून नवऱ्याची ताबेदारी. तसेच मानसिक गुलामी. एक गोष्ट मात्र आढळते की मालक वर्गातील स्त्रीच्या मानसिक गुलामीपेक्षा या कष्टकरी वर्गातील स्त्रीची मानसिक गुलामी कमी प्रमाणात होती. उत्पादनकार्याशी, कामाचे संबंध

असल्यामुळे ती थोडीफार 'स्वतंत्र' होती.

कुटुंबामध्ये पुरुषाला किती मान असतो याचे उदाहरण उच्चवर्गीय कुटुंबात पाहायला मिळते. सर्वांत श्रेष्ठ सासरा, मग त्याचे मुलगे, आईपेक्षाही मुलांना मान अधिक. थोरल्या बहिणीने धाकट्या भावाचे ऐकले पाहिजे. मुलांची लग्ने झाल्यावर पुन्हा थोरल्या भावाच्या बायकोपेक्षा धाकट्या भावाचा मान मोठा. एखादा भाऊ वारला व त्याची बायको निपुत्रिक विधवा झाली तर तिचे स्थान घरात सगळ्यांत कनिष्ठ. तिने सगळ्यांची बोलणी खायची व कष्ट उपसायचे. तिचा दूरान्वयेसुद्धा संपत्तीवर हक्क पोचत नाही. त्यामुळे तिला जेवूखाऊ घालणे हा तिच्यावर उपकार असे. या उतरंडीमध्ये सासू सुनेचा छळ करी. तेथे स्त्रीने स्त्रीचा छळ करणे असे स्वरूप नसे. सून ही कुटुंबातील सर्वांत खालच्या पायरीवरील मनुष्यप्राणी. सर्वांना आपले काम खालच्या कोणावर ना कोणावर ढकलता येई. तिला मात्र ढकलण्याची संधी नव्हती आणि या सुनेकडून काम करवून घेणे हे सासूचे काम. मुकादमासारखे. कारण घरातील काम तर झालेच पाहिजे. कुटुंबातील व्यवहार सुरळीत चालू राहणे आवश्यक होते. कुटुंबामध्ये शांती नांदणे आवश्यक होते. कुटुंब भक्कम पायावर उभे राहिले तर सबंध समाज व्यवस्थित संघटित राहील आणि म्हणूनच या कुटुंबपद्धतीचे, त्यातील माणसामाणसांच्या आदर्श संबंधांचे गोडवे गाइलेले आढळतात. त्यालाच आपण रूढी म्हणतो, चालीरीती म्हणतो. संस्कृती व धर्म याच रूढींना पोषक असा असतो. कुटुंबसंस्था पक्की राहावी, मजबूत राहावी म्हणून माणसांच्या मनावर विशिष्ट मूल्ये व कल्पना यांचा प्रभाव धर्म टाकीत राहतो.

धर्माचे कार्य

धर्म म्हणजे काय? जो समाजाची धारणा करतो, समाजाची संघटना जाणीवपूर्वक नियमबद्ध करतो तो धर्म. धर्म कसा जन्माला येतो, त्याचा विकास कसा होतो, मानवाच्या मानसिक जडणघडणीत त्याचा कसा महत्त्वाचा वाटा असतो हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. कारण आजची स्त्री मनाने दुबळी झाली आहे. मनुष्यप्राणी म्हणून स्वतःचे अस्तित्व ती विसरली आहे. ती सर्वांत दडपली गेली आहे. यासाठी आपण एक कारण देतो, तिच्या मनावरचे संस्कार. हे संस्कार कसे निर्माण झाले याचा अभ्यास करताना धर्माचे कार्य तपासणे आवश्यक आहे.

धर्माचा उगम हा मानवी व्यवहारातून झालेला आहे. धर्म आकाशातून पडलेला नाही आणि म्हणूनच धर्माचा शेवटही मानवी व्यवहारातूनच होऊ शकेल. मानवी गरजा पूर्ण करण्याच्या व्यवहारातून, उत्पादनकार्यातून समाजसंघटना उभी राहते. मानवाचे परस्परांशी संबंध निश्चित होतात. यातूनच वर्गसमाज तयार होतो. याचबरोबर मानवाची जाणीवही विकसित होत असते. विश्व, समाज व मानव याबद्दल

काही कल्पना हळूहळू त्याच्या मनात तयार होत असतात. त्या समाजाला पोषक व संवर्धक अशा श्रद्धा व विचार पक्के होतात. म्हणजेच उच्च वर्गातील लोक आपले स्थान कायम रहावे म्हणून प्रयत्न करीत रहातात; त्यासाठी ते प्रत्यक्षपणे कष्ट करणाऱ्यांना बळ वापरून बंधनात ठेवतात, जुलूम करतात. पण ते कष्टकऱ्यांना फक्त शारीरिक बंधनात ठेवून थांबत नाहीत. मानवाला जाणीव असल्याने ते परिस्थितीचे समर्थन करण्यासाठी तत्त्वज्ञान निर्माण करतात. हे अतिशय जाणीवपूर्वक कावेबाजपणे होत नसते. ते ज्या जागी उभे राहून जगाकडे व सर्व व्यवहारांकडे बघत असतात. त्या जागेवर उभे राहून त्यांना तेच चित्र दिसते. त्या चित्राची ते सुसंगतवार मांडणी करतात व त्यातून काही तर्कबद्ध सूत्रे तयार होतात. तीच समाजात मान्यता पावतात. त्यांनाच आपण मूल्ये म्हणतो. या मूल्यांवर आधारित चालीरीती व रूढी प्रस्थापित होतात. किंबहुना चालीरीती, रूढी या व्यवहारातून रूढ होत आलेल्या असतात. त्यांना मूल्यांमुळे तात्त्विक समर्थन लाभते. उदा. जमीनदाराच्या मालकीची जमीन असते व गरीब शेतकरी जमीन कसायला घेतो आणि जमीनदाराला खंड घालतो. ह व्यवहार रूढ झाल्यावर मग 'जन्मानेच माणसाचे समाजातील स्थान ठरते' असे मूल्य या व्यवहारांना पोषक ठरते. वर्षानुवर्षे गरीब शेतकरी कनिष्ठ स्थान स्वीकारतो. जमीनदाराविरुद्ध बंड करावे असे त्याला वाटत नाही.

कुटुंबसंस्थेच्या बाबतीतही धर्माचे कार्य असेच घडले. मानवी व्यवहारांतून, उत्पादन प्रक्रियेतून ही संस्था जन्माला आली. स्त्रियांनी पुरुषांच्या अंकित जाण्याला शेकडो वर्षांची प्रक्रिया लागली असे इतिहासात आढळते. हळूहळू पुरुष श्रेष्ठत्वाचे तत्त्वज्ञान तयार होऊ लागले. पातिव्रत्याचे आदर्श तयार झाले. सौभाग्याच्या कल्पनेचे गोडवे तयार झाले. विधवेला अशुभ समजून समाजातून तिचे स्थान हद्दपार केले गेले. निपुत्रिक स्त्रीला वाळीत टाकण्यात आले. नवऱ्याच्या प्राप्तीसाठी व दीर्घायुष्यासाठी व्रतवैकल्ये निर्माण झाली. त्यातच अंधश्रद्धांमुळे विकृती घुसल्या आणि हळूहळू स्त्रीची बंधने अधिकाधिक पक्की होत गेली. या संस्कारांच्या प्रभावाखाली हळूहळू स्त्रीही स्वतःकडे स्वतंत्र मानवी व्यक्ती म्हणून पहाण्याचे विसरून गेली. तिनेसुद्धा स्वतःला दुय्यम स्थान स्वीकारले. मानवी मन अतिशय शक्तिमान असते; पण, मानवी मन हे नुसते पोकळीत बनत नाही. ते बाह्य परिस्थितीच्या कोंदणामध्ये घडले जात असते. पिळवणूकप्रधान व्यवस्थेने अंधश्रद्धाळू तत्त्वज्ञानावर आधारित जो धर्म उभा केला त्या धर्माच्याच प्रचंड ओझ्याखाली स्त्रीच्या जाणिवांचे पंख कापले गेले. तिची बुद्धी विकृत झाली. पण त्याचबरोबर हेही लक्षात ठेवले पाहिजे की स्त्रीची ही स्थिती सनातन काळापासून चालत आलेली नाही व पुढेही टिकणार नाही. परिस्थितीमध्ये फरक पडला, उत्पादनशक्ती वाढल्या, संपन्नता आली, समाज बदलला की पुन्हा एकदा स्त्रीच्या मनाच्या जडणघडणीमध्ये बदल होईल. ती बंड करून उठेल. ह्याच

मनाच्या शक्ती तिला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी प्रेरणा देतील.

पाश्चात्त्य समाजाच्या अवस्था

आपण सर्वसाधारणपणे मानवी समाजाच्या विकासाचे सूत्र बघितले. या विकासाच्या प्रक्रियेतील मानवी सामाजिक व्यवहाराचे स्थान बघितले. कोणतीही गोष्ट आकाशातून पडत नाही किंवा दैवी शक्तींनी नियंत्रित होत नाही. जगातील धर्म, तत्त्वज्ञान, मूल्ये या अमूर्त गोष्टीही मानवी व्यवहारातून निर्माण होतात. या व्यवहारातूनच एक समाज-व्यवस्था बदलून दुसरी जन्मते.

जागतिक पातळीवर पाहिल्यास काही ठिकाणी मानवी समाज चार प्रकारच्या वेगवेगळ्या उत्पादनअवस्थांमधून गेलेला आढळतो. (१) आदिम साम्यवाद : ज्या वेळी खाजगी मालकी अस्तित्वात नव्हती, टोळी-समाज होता, प्राथमिक स्वरूपाची लोकशाही होती, विवाहसंस्था व व्यक्तिगत कुटुंबव्यवस्था नव्हती, टोळी हेच कुटुंब असे. (२) गुलामगिरी : रोम, ग्रीस वगैरे राज्ये ही गुलाममालकांची राज्ये होती. गुलामांनी जमीन कसायची, श्रम करायचे आणि गुलाममालकांनी राज्ययंत्रणा चालवायची. लढाया करून नवीन प्रदेश जिंकायचा. बौद्धिक श्रमांना या काळी महत्त्व येऊ लागले होते. कुटुंबव्यवस्था याच सुमारास निर्माण झाली व पक्की होत गेली. (३) सरंजामशाही : राजा हा देवाचा अवतार मानला जाई. तसेच धर्मपीठांना अतिशय महत्त्व असे. बऱ्याच जमिनींचे उत्पन्न त्यांच्यासाठी राखून ठेवले जाई. उरलेली जमीन सरदार, जमीनदार यांच्या अधिकाराखाली असे. सरदार, उमराव आपल्या पदरी सैन्य बाळगीत व राजाच्या वतीने संरक्षणाचे काम करीत. राजा, धर्मपीठे, सरदार, जमीनदार यांचा मिळून राज्यकर्ता वर्ग तयार होई. बाकी सर्व कष्टकरी जनता शेतामध्ये घाम गाळून पिके काढी. इतर छोटे हस्तव्यवसाय करीत. सरंजामशाहीचा काळ घट्ट बांधणीच्या मोठ्या अविभक्त पितृसत्ताक कुटुंबपद्धतीचा काळ म्हणता येईल. शेती कसण्यासाठी अनेक माणसे लागत आणि मोठ्या कुटुंबांतून शेतीच्या अनुषंगिक कामे करणे शक्य असे. याच व्यवस्थेत पुढे व्यापारी वर्ग वाढत गेला, त्यांनी लघु-उद्योग काढायला सुरुवात केली. त्यामध्ये तांत्रिक प्रगती होत उद्योगधंद्यांचे क्षेत्र रुंदावत गेले आणि युरोपमध्ये सरंजामशाही उलथून भांडवलशाही प्रस्थापित झाली. (४) भांडवलशाही : ही आज बऱ्याच देशांत चालू असलेली व्यवस्था. भांडवलदार व त्यांच्या मालकीच्या यंत्रांवर काम करणारे कामगार हे दोन प्रमुख वर्ग या व्यवस्थेत तयार होतात. उत्पादनसाधने खूप प्रगत होतात. नवीन यंत्रे येत राहतात. उत्पादन-शक्ती वाढते. भांडवलदार व कामगार हे उत्पादनसंबंध या उत्पादनशक्तींना अडथळा आणत राहतात. सामाजिक तऱ्हेचे मोठ्या प्रमाणावरील उत्पादन व खाजगी मालकी व उत्पादित वस्तूंचे अपहरण यांत विसंवाद निर्माण होतो. उत्पादन खूप होते पण

कामगाराच्या हाती क्रयशक्ती नसल्यामुळे माल पडून राहतो. अर्थव्यवस्थेमध्ये अरिष्टे निर्माण होतात. यातूनच कामगारवर्गाच्या क्रांतिकारी जाणिवा वाढतात व कामगारवर्ग उत्पादनसाधने आपल्या हाती घ्यायला तयार होतो. समाजवादी क्रांतीची शक्यता तयार होते. या उत्पादनव्यवस्थेचा परिणाम होऊन सरंजामशाहीतील अविभक्त कुटुंब-व्यवस्था बदलते. विभक्त कुटुंबपद्धती, एक पुरुष-एक स्त्री यांचे वैवाहिक संबंध व कुटुंब असे नवे चित्र तयार होते. स्त्री-पुरुष संबंध वेगळ्या पातळीवर जातात; पण स्त्रीचे दुय्यम स्थान संपत नाही. कारण याही समाजाचा पाया पिळवणूक असतो. स्त्रीची पिळवणूक या समाजामध्ये नष्ट होत नाही. मात्र स्त्रीमध्ये स्वातंत्र्याच्या आकांक्षा जागृत होतात. स्वतःच्या नैसर्गिक जबाबदाऱ्यांना योग्य संरक्षण देऊन त्यांचा विकास घडवून आणणारा नवा समाज तिला हवा असतो. नव्या यांत्रिक शोधांमुळे, संपन्नतेमुळे हा पाया तयार होतो.



मराठी ग्रंथ संग्रहालय शाखे
3063
दा. क्र.
जबध
शाखा (स्थळ

कुटुंबसंस्थेचे प्रकार

प्राथमिक अवस्थेतील मानव तीन टप्प्यांतून विकसित होत गेला. (१) रानटी (२) असंस्कृत (३) सुसंस्कृत. संस्कृतीच्या उगम काळापर्यंत कुटुंबव्यवस्था मुख्यतः चार टप्प्यांमधून विकसित होत गेली. (१) रक्तसंबंधित कुटुंब, (२) पुनालुआन कुटुंब, (३) युगुल कुटुंब, (४) 'एक पत्नी विवाह' कुटुंब. यातूनच पुढे आज दिसणारे एक पुरुष व एक स्त्री यांचे एकनिष्ठ संबंध पायाभूत असणारे कुटुंब विकसित झाले.

रक्तसंबंधित कुटुंब

ही 'गट विवाह' काळातील पहिली अवस्था आहे. याच्यापूर्वी टोळीमध्ये केवळ नर-मादी एवढेच संबंध असत, ते एका पिढीतील व्यक्तीचे दुसऱ्या पिढीतील व्यक्तीशी, भावंडांचे एकमेकांशी, अशा तऱ्हेने अनिर्बंध शरीरसंबंध होते. पहिले बंधन निर्माण झाले ते पिढ्यांच्यामध्ये. एका पिढीतील आजोबा व आजी हे सर्वजण एकमेकांशी नवरा व पत्नी अशा तऱ्हेचे संबंध राखीत. सर्व पुरुष सर्व स्त्रियांचे नवरे, व सर्व स्त्रिया त्यांच्या बायका असत. या आजोबा व आजी यांचे मिळून एक वर्तुळ पूर्ण होई. त्यानंतर त्यांच्या मुलांमुलींचे मिळून एक वर्तुळ तयार होई. तेथेही सर्व स्त्री-पुरुषांचे एक दुसऱ्याशी संबंध असत. यानंतर या स्त्री-पुरुषांच्या मुलांमुलींचे तिसरे वर्तुळ निर्माण होई. त्या सर्वांचे लैंगिक संबंध रहात. सर्वच एकमेकांचे भाऊ-बहीण व नवरा-बायको दोन्ही असत. या वेळेपर्यंत मुलाचा-बाप ओळखण्याइतके मानवी ज्ञान प्रगल्भ झाले नव्हते हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

पुनालुआन कुटुंब

यामध्ये दोन पिढ्यांमधील लैंगिक संबंधाबरोबर सख्ख्या बहीण-भावंडांचेही लैंगिक संबंध नष्ट झालेले आढळतात. हळूहळू सख्ख्या मावसभावंडांतील संबंधही नष्ट होत गेले. यातून 'नैसर्गिक निवड' हे तत्त्व प्रामुख्याने आढळते. डार्विनच्या उत्क्रांतिवादातील हे महत्त्वाचे तत्त्व आहे. आपापसात लग्न केल्यामुळे व शरीरसंबंध आल्यामुळे त्या टोळीतील मानवांच्या 'जीन्स'चा गुणाकार होऊ शकत नसे. त्याचप्रमाणे चांगली निकोप, सुदृढ मुले जन्माला येऊ शकत नसत. हे त्या काळच्या मानवाच्या लक्षात आले पाहिजे. म्हणूनच भावंडांचे आपापसात लैंगिक संबंध निषिद्ध समजले

गेले. याचा फायदा असा झाला की शरीरसंबंधासाठी दुसऱ्या टोळीतील स्त्री पुरुषांना गाठण्याची गरज भासू लागली. त्याचे दोन फायदे झाले. टोळीचे मनुष्यबळ वाढू लागले. टोळ्यांचा संकर होऊ लागला, व त्याचा फायदा होऊन जन्माला येणारी मुले ही विविध गुणांनी समृद्ध होऊ लागली. मनुष्यस्वभाव ज्यामुळे निश्चित होतो त्या जीन्सचा गुणाकार होऊ लागला. विविध जीन्सच्या परम्युटेशन्स–कॉम्बिनेशन्समुळे अधिक बुद्धिमान, सशक्त मानव जन्माला येण्याची शक्यता तयार झाली.

या कुटुंबव्यवस्थेमध्ये सख्ख्या बहिणी व मावस बहिणी यांचा मिळून एक गट बनत असे व त्यांचे पुरुषांच्या दुसऱ्या अशाच गटाशी संबंध रहात. मात्र त्यांचे हे नवरे त्यांचे भाऊ असता कामा नयेत अशी रूढी निर्माण झाली होती. त्यांच्या भावांचा गट असाच दुसऱ्या एखाद्या स्त्रियांच्या गटाशी लैंगिक संबंधाने बांधलेला असे. यामध्ये बहिणी-बहिणींची मुले ही भावंडे समजली जात. भावाभावांची मुले भावंडे असत. तसेच आई व मावशी यांच्या भावाच्या मुलांशी–मामेभावंडांशी नाते असे. वडील व काका यांच्या बहिणीच्या मुलांशी–आतेभावंडांशी नाते असे. रोमन साम्राज्य हे त्या काळी सुसंस्कृत अवस्थेला पोचले होते. ब्रिटन त्या वेळी असंस्कृत अवस्थेत होते. तेथील लोकांसंबंधी सीसेरो सांगतो, 'येथील पुरुषांना १०–१२ सामुदायिक बायका असतात.' याही अवस्थेत नेमका पिता कोण हे सांगणे मानवाला जमले नव्हते. म्हणूनच मातेच्या नावाने व मातेच्या बाजूने वंशावळ पुढे चालविली जात असे. गोत्र व्यवस्था ही नंतर सुरु झाली. गोत्र व्यवस्थेमध्ये पितृसत्ताक पद्धती अभिप्रेत आहे. पित्याकडून वंश पुढे चालू राहू लागला. दुसऱ्या टोळीतील मुलीला पळवून आणायची पद्धती याच सुमारास सुरू झाली. सर्व भाऊ मिळून मुलीला पळवून आणीत व ती सर्वांची पत्नी होई. अशा अनेक मुलींचा, बहुधा बहिणींचा मिळून गट तयार होई.

युगुल कुटुंब

पुढे पुढे लैंगिक संबंधांवर पडलेल्या बंधनांमुळे गट-विवाहाची शक्यता कमी कमी होत गेली. आईमुलाचे संबंध नाहीत, सख्ख्या बहीण-भावंडांचे संबंध नाहीत, या गुंता-गुंतीमुळे एक पुरुष व एक स्त्री यांचेच संबंध, निदान ते एकत्र रहात आहेत तोपर्यंत कायम रहाणे हेच तर्कशुद्ध ठरू लागले. यामध्ये स्त्रीकडून एकनिष्ठेची अधिक अपेक्षा असे. पुरुष अनेक स्त्रियांशी संबंध ठेवण्याच्या पूर्वीच्या पद्धतीतून संपूर्णपणे बाहेर पडू शकला नव्हता. मात्र हे लैंगिक संबंध तोडण्याची सुबी होती. त्याला सुसंस्कृत काळातील पावित्र्य आलेले नव्हते. फारकतीनंतर मुले मात्र आईजवळच जात. ती जबाबदारी आईची असे. रक्तसंबंधांची व लैंगिक संबंधाची फारकत झाल्यामुळे मुले मात्र अधिकाधिक बुद्धिमान व निकोप निर्माण होऊ लागली. वर्तुळ अधिकाधिक

लहान होऊ लागल्यामुळे 'पळवून आणून लग्न' किंवा 'विकत घेऊन लग्न' हे विवाहाचे दोन प्रकार जन्माला आले. त्याचा एक तोटा असा झाला की आतापर्यंत स्त्री-पुरुष एकमेकांना निवडत असत. आता त्यांच्या आईतर्फे हे खरेदीचे व्यवहार होण्याची शक्यता वाढली. त्याचप्रमाणे फारकत घेणे कायदेशीर रीत्या शक्य असले तरी त्याबाबत तीव्र भावना तयार होत चालल्या.

मात्र या कुटुंबव्यवस्थेतही स्त्रीचे प्रधान स्थान नष्ट झालेले नाही. नैसर्गिक आईचेच सामुदायिक गृहव्यवस्थेमध्ये प्रमुख स्थान असे. त्यामुळेच या रानटी व असंस्कृत समाजात स्त्रीचे स्थान मानाचे होते. समाजाचा धान्याचा साठा त्यांच्या ताब्यात असे. त्या, नवऱ्याला कधीही चालता हो म्हणू शकत होत्या. मुख्य म्हणजे स्त्रीच्याच नावे वंश किंवा नवीन कुल पुढे चालत असे. सगळ्या बहिणी एकत्र रहात असल्यामुळे भगिनीभाव असे. पुरुष परके, बाहेरून येत. यामुळेच त्याकाळी मातृसत्ताक पद्धत आढळते. श्रमविभागणीमध्ये श्रेष्ठ, कनिष्ठ कामे असे स्वरूप आलेले नव्हते. स्त्रीचे काम कनिष्ठ समजले जात नसे. या वेळच्या समाजातील लोकांमध्ये व्यक्तिवाद आलेला नव्हता. भ्रातृभाव, अपेक्षारहित प्रेम, सामुदायिकता हे त्या समाजाचे गुण होते. आज अनेक लोक हे गुण व स्त्री प्रधानता या दोन्हीमध्ये संबंध जोडतात व पुन्हा एकदा आदर्श समाज आला पाहिजे असा आग्रह धरतात, पण ते लक्षात घेत नाहीत की त्यावेळी स्त्रीसत्ताक व्यवस्था दोन तत्त्वांवर उभारली होती– (१) नैसर्गिक पिता ठरविण्याच्या ज्ञानाचा अभाव व (२) उत्पादनाच्या साधनावर खाजगी मालकीचा अभाव. म्हणूनच आजच्या नव्या परिस्थितीत पूर्वीची स्त्रीसत्ताक पद्धत येणे असंभवनीय आहे.

याचाच प्रभाव म्हणून त्या काळी स्त्रीचे लग्न झाल्यावर लग्नाला उपस्थित असलेले सर्व नातेवाईक स्त्रीशी लैंगिक सुख घेत व नवऱ्याची पाळी सर्वांत शेवटी येई. आजही काही जमातीमध्ये किंवा टोळ्यांमध्ये नवरीला लग्नाच्या दिवशी रात्री देवळात धर्मगुरूकडे पाठविण्याची प्रथा आहे. एंगल्स म्हणतो की पुढे या पद्धतींना जे विकृत रूप आले ह्यामुळे आधी अनेक पुरुषांबरोबर शरीरसंबंध ठेवण्याचे स्वातंत्र्य असणाऱ्या स्त्रीलासुद्धा एका पुरुषाबरोबर कायमचे संबंध ठेवण्याची कल्पना अधिक पसंत पडली असावी. रानटी अवस्थेतून असंस्कृत अवस्थेत प्रवेश करणाऱ्या मानवी समाजाची 'युगुल संबंध' ही गरज होती. यामुळे कुटुंबव्यवस्थेत महत्त्वाचा फरक झाला. आजपर्यंत आईचा अधिकार मुलांवर जास्त असे. आता मुलांवर अधिकार गाजविणारा पिता कुटुंबात आला. आणि यानंतर जसजशी उत्पादनाच्या साधनांची प्रगती होत गेली, मानवाकडे संपत्ती अधिकाधिक साठू लागली तसतसा या आदिम साम्यवादाचा, सामुदायिकतेचा लोप होत गेला व जोडीविवाहातूनच एक-विवाहाची कल्पना पुढे आली. "याचवेळी 'मातृसत्ताक' पद्धतीचा अंत होऊन जागतिक

पातळीवर स्त्री या लैंगिक जातीचा पराभव झाला होता." (एंगल्स)

एक पत्नी विवाहपद्धती म्हणजेच पितृसत्ताक पद्धती

रोमन कुटुंब हे या प्रकारच्या कुटुंबाचे शुद्ध व आदर्श उदाहरण म्हणून दाखविता येते. या पद्धतीमध्ये एक प्रधान पुरुष वा त्याच्या हाताखाली त्याचे गुलाम हे महत्त्वाचे उत्पादनसंबंध होते. इंग्लिश शब्द फॅमिली याचा मुळातील शब्द आहे फॅम्युलस. म्हणजेच घरगुती गुलाम. फॅमिलिया हा अनेकवचनी शब्द झाला. अर्थ–घरगुती गुलामांचा समूह. यातूनच फॅमिली हा शब्द पुढे आला. आणि या शब्दाला भावना व पावित्र्य लगडले गेले. मुळात फॅमिली किंवा कुटुंब या शब्दाने एका संस्थेचा निर्देश होई. जेथे एक पुरुष, त्याची पत्नी व त्याची मुले व त्यांचे दास व त्यांची कुटुंबे असे एकत्र रहात. हा प्रवास बहुतेक पुढारलेल्या व सुसंस्कृत समाजात या पद्धतीने झालेला दिसतो.

याही ठिकाणी 'एक पत्नी विवाह' पद्धती असा शब्दप्रयोग अशा अर्थाने येतो की पुरुषाला विवाह एकच करता येई. मात्र त्याचे संबंध अनेक स्त्रियांशी राहू शकत. एकनिष्ठा फक्त पत्नीकडून अपेक्षित असे. अर्थात अनेक स्त्रियांचा सांभाळ करणे फक्त गणनायक किंवा टोळीप्रमुखालाच शक्य असे. तो दासांच्या स्त्रियांशीही संबंध ठेवून असे. याचा अर्थ आज जे आपण प्रेमाच्या रज्जूनी बांधलेले एकनिष्ठ पती-पत्नी हा आदर्श लैंगिक संबंध व त्यावर आधारित आदर्श कुटुंबव्यवस्था मानतो ती आदर्श कल्पना त्या वेळच्या एकविवाह पद्धतीमध्ये रुजलेली नव्हती. पिता निश्चित करता यावा या सामाजिक गरजेतून या एकपत्नी विवाहपद्धतीचा जन्म झाला. पुढील काळात मुख्यत्वे करून पुरुषांमध्ये अनेकविध संबंधांची भूतकालीन पद्धत अवशेषांमध्ये राहिलेली आढळते. आणि हा अधिकार पुरुषाला प्राप्त झाला कारण अर्थार्जनाचा अधिकार त्याच्याकडे होता व स्त्रीला पोट भरण्यासाठी त्याच्यावर अवलंबून रहावे लागे. वेश्याव्यवसाय यामुळेच रुजला. अर्थात जगाच्या पाठीवरील वेगवेगळ्या समाजांमध्ये या एकपत्नी विवाहपद्धतीची अंमलबजावणी वेगवेगळ्या प्रकारे झाली. ग्रीक समाज फार सनातनी होता. तेथे उच्चवर्गीय स्त्रियांची रवानगी सात पडद्यांच्या आत झाली. रोमन समाज अधिक उदार दिसतो. प्रत्यक्ष शारीरिक बंधनात न ठेवता आर्थिक बंधनांच्या योगे आपण स्त्रीला एकनिष्ठा सांभाळायला लावू असा रोमन समाजाला विश्वास होता.

थोडक्यात, एकपत्नी विवाह पद्धती ही गरजेवर, सोयीवर आधारित पद्धती होती. ती अधिक उत्तम होती वगैरे नैतिक निकष आपण लावू शकणार नाही. उलट या पद्धतीमुळे स्त्री अधिक बंधनात पडली, चार भिंतींच्या आत कोंडली गेली व नव-ऱ्याला शरीरसुख देणे व त्याच्या वारसांना जन्म देणे अशी उच्चवर्गीय स्त्रीची

भूमिका मर्यादित झाली. समाजासाठी मुलांना जन्म न देता नवऱ्याची वैयक्तिक सेवा म्हणून ती मुलांना जन्म देऊ लागली. त्याची गुलाम झाली. सामाजिक उत्पादनातील तिचा सहभाग संपला.

सुसंस्कृत समाजात ह्या एकपत्नी विवाहपद्धतीचाच विकास होत होत स्त्री-पुरुष संबंधांच्या कल्पना बदलत गेलेल्या आढळतात. ही एकपत्नी विवाहपद्धती व पितृसत्ताक कुटुंब व्यवस्था सरंजामशाही समाजाचा कणा होती. त्यावेळी शेती हे प्रधान उत्पादनक्षेत्र असल्याने अविभक्त कुटुंबपद्धती आवश्यक होती. मनुष्यबळाची गरज होती. भांडवलशाहीमध्ये याच अविभक्त कुटुंबपद्धतीचे विभाजन विभक्त कुटुंबपद्धतीमध्ये झालेले आढळते. शेतीचे तुकडे होऊन होऊन ज्याची जमीन पूर्णपणे गेली आहे असा शेतमजूर कामाच्या शोधार्थ शहराकडे येत गेला. या कुटुंबव्यवस्थेचा पायाही एक पतीपत्नी हाच आहे. मात्र येथील स्त्रीची भूमिका हळूहळू बदलत आहे. संपत्ती नसल्याने संपत्तीला वारस निर्माण करण्याचे तिचे काम संपले आहे. मूल होणे ही नैसर्गिक घटना झाली आहे. त्याचप्रमाणे तिचे पोट भरण्यासाठी तीही हळूहळू सामाजिक उत्पादनामध्ये भाग घेऊ शकते. या आर्थिक स्वावलंबनामुळेही नवऱ्याचा तिच्यावरचा अधिकार कमी होऊ लागला आहे. तिचे शोषण हे कुटुंबापेक्षाही कारखान्यांमधून अधिक प्रमाणावर होऊ लागले आहे. त्याचवेळी तिला दोन प्रकारची कामे करावी लागत आहेत व तिचे दुप्पट शोषण होते आहे. तिचे कुटुंबातील काम हे 'श्रमशक्तीची देखभाल' या स्वरूपाचे हळूहळू होते आहे. ते कसे ते पुढे आपण बघणार आहोत. थोडक्यात, स्त्री-पुरुष संबंध हे केवळ 'सोय' या तत्त्वावर आधारित नसून ते प्रेमाधिष्ठित लैंगिक संबंध असे बनण्याचा पाया घातला जात आहे. एक पती एक पत्नी या कुटुंबव्यवस्थेमध्येच 'प्रेम' हा नवा गुणक जोडला जात आहे. व्हिक्टोरियन काळी जन्माला आलेली प्रेम ही कल्पना या परिस्थितीचे फळ आहे. मात्र ह्या 'प्रेमाची' पूर्ण अर्थाने अंमलबजावणी या भांडवलशाही समाजामध्ये होऊ शकत नाही. आज पातिव्रत्य–प्रेम हे समीकरण मांडले जाते व प्रेमाच्या बुरख्याखाली पातिव्रत्याचे, योनिशुचितेचे कार्य साधले जाते.

थोडक्यात, समाजाच्या तीन विकासांच्या अवस्थांमध्ये आपण कुटुंबांचे चार प्रकार पाहिले.

(१) रानटी अवस्था : गट विवाह (अ) रक्तसंबंधित (आ) पुनालुआन.

(२) असंस्कृत अवस्था : युगुल विवाह.

(३) सुसंस्कृत अवस्था : एकपत्नी विवाह आणि त्याला पूरक वेश्याव्यवसाय व व्यभिचारी संबंध. याच तिसऱ्या अवस्थेत एकपत्नी विवाहाच्या जोडीलाच समांतर पद्धतीने अनेकपत्नी विवाह हजर होता. एक पत्नी व अनेक पती संबंधही काही समाजात आढळतात. पण याच वेळी या पतीचेही इतर अनेक स्त्रियांशी संबंध

आढळतात. उदा० पांडव.

भांडवलशाही व विवाह पद्धती

भांडवलशाही समाजामध्ये हे चित्र आपल्याला दुभंगलेले दिसते. मार्क्स आणि एंगल्स कम्युनिस्ट मॅनिफेस्टोमध्ये म्हणतात, "सध्याच्या भांडवलदारांचे कुटुंब कोणत्या पायावर उभे आहे? भांडवलावर, खाजगी नफ्यावर. भांडवलदार बायकोकडे केवळ प्रजोत्पादनाचे साधन म्हणून बघतो. भांडवलदार जेव्हा कुटुंबसंस्था, तिचे पावित्र्य, त्यातून होणारे संस्कार याचे उदात्तीकरण करतो तेव्हा तिरस्कार वाटतो. कारण औद्योगीकरणाच्या प्रक्रियेमध्ये कामगारांच्या कुटुंबातील सर्व भावनिक पाश तटातट तुटलेले असतात. आणि कामगारांची मुले ही केवळ यंत्र चालविणारे हात किंवा साधने बनलेली असतात."

किंवा लेनिन म्हणतो त्याप्रमाणे (८ मार्च १९२१ ला आंतरराष्ट्रीय श्रमिक महिलांना दिलेल्या भाषणात), "भांडवलशाहीमध्ये मानवाचा अर्धा भाग स्त्रिया या दुहेरी शोषणाचा बळी असतात. श्रमिक महिला व शेतकरी महिला यांचे भांडवलाकडून शोषण होतेच, पण जेथे भांडवलशाही आहे अशा पुढारलेल्या समाजातसुद्धा स्त्रियांना कायद्याने पुरुषाच्या बरोबरीने समान हक्क मिळत नाहीत. एवढेच नव्हे तर मुख्यत्वे करून ती घरगुती कामाला बांधलेली गुलाम रहाते आणि पाठीचा कणा मोडून टाकणारे, शरीर भरडून काढणारे कष्ट तिला कुटुंबासाठी व स्वयंपाकघरात उपसावे लागतात." आणि म्हणूनच या कुटुंबाला मार्क्स, बाहेरील समाजाची व उत्पादन-संबंधांची छोटीशी प्रतिकृतीच म्हणतो—"कुटुंबामध्ये पुरुष हा जणू भांडवलदार असतो. पत्नी कामगार असते. पुरुषाचा स्त्रीवरील अधिकार संपवून कायद्याने दोघांना समान हक्क मिळण्याच्या मार्गातील पहिली पायरी म्हणून सर्व स्त्रियांना सामाजिक उत्पादनामध्ये भाग मिळणे आवश्यक आहे. त्याचवेळी तिचे पुरुषाकडून होणारे शोषण थांबेल." येथे मार्क्स केवळ वरवर दिसणाऱ्या आभासाबद्दल बोलत आहे. स्त्री व पुरुष यांचे संबंध भांडवलदार व कामगार यांच्यासारखे वर्गात्मक व वैरात्मक असतात असे त्याला म्हणायचे नाही.

म्हणूनच एंगल्स म्हणतो की, एकपत्नी विवाहाचेच अधिक प्रगत रूप हे 'लैंगिक-प्रेम-संबंध' (सेक्स–लव्ह) असे असेल. त्यांची तीन वैशिष्ट्ये, (१) स्त्री व पुरुष आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी असल्याने समान असतील, पुरुषाचे वर्चस्व संपेल. (२) वैवाहिक संबंधाचे पावित्र्य ही कल्पना जाऊन वेळप्रसंगी विवाह मोडायला परवानगी मिळेल. (३) स्वतःचा जोडीदार जात, जमात व वर्ग या तिन्ही बंधनांच्या पलीकडे जाऊन निवडता येईल. म्हणजेच जात, जमात व वर्ग या कल्पना उरलेल्या नसतील. या सर्वांचा परिपाक म्हणूनच आज जी कायदेशीर व रूढींनी लादलेली

बंधने आहेत तीही नष्ट होऊ शकतील. आणि स्त्री-पुरुषांचे संबंध हे बाह्य बंधनांवर अवलंबून न रहाता ते केवळ प्रेमावर अवलंबून रहातील. या नंतरची पायरी नक्की कशी असेल हे मात्र आता सांगता येणार नाही. कदाचित अधिक प्रगल्भ पातळीवरचे अनेक स्त्री-पुरुष संबंधही त्यावेळी शक्य होतील असे मार्क्स सांगतो.

सध्या मात्र पूर्वीच्या कुटुंबव्यवस्थेचा गाभा–खाजगी मालमत्ता–कामगाराच्या बाबतीत तरी कोसळून पडला आहे. आणि तरीसुद्धा परंपरागत रूढी, जमात, जात, वर्ग यांचे वर्चस्व चालू आहे. आजचे एकपत्नी संबंध हे बाह्य बंधनांनी जखडलेले, रूढी व कायदा यांच्या चौकटीने बंदिस्त म्हणूनच अन्याय, अत्याचारी बनतात. तरूण पिढी या बंधनांच्या विरुद्ध बंड करून उठते, आवाज उठविते. लैंगिक वासनांचे आज दमन होते आहे. याची कारणे दोन– (१) खऱ्या अर्थाने प्रेमाचा अनुभव घेता येत नाही. पाश्चात्त्य देशात जेथे वरवर बघता मनासारखा जोडीदार निवडता येतो, तेथेही ही निवड प्रत्यक्षपणे अनेक अदृश्य दडपणांवर आधारित असते. (२) याचा परिणाम होऊन लैंगिक वासना हीच आयुष्याची प्रमुख प्रेरणा ही चुकीची फ्राइडप्रणीत कल्पना सर्वसामान्य झाल्याने भांडवलशाही व्यवस्थेतील इतर बंधनेसुद्धा प्रामुख्याने लैंगिक बंधने वाटतात व ही बंधने तोडण्यासाठी प्रयत्न सुरू होतात. या प्रयत्नातून हिप्पीवादाचा जन्म होतो. खरे पहाता या असंतोषाचे मूळ हे भांडवलशाहीतील वस्तुकरणाच्या प्रक्रियेत आहे. येथे शरीराकडे वस्तू म्हणून पाहिले जाते. वस्तूंचा उपभोग म्हणजे सुख अशी प्रेमाची विकृत कल्पना होते. आणि म्हणून स्वैराचाराची मागणी पुढे येते. ही स्वैराचाराची मागणी व मार्क्सची प्रगल्भ व्यक्तींतील बाह्य बंधनरहित लैंगिक संबंध ह्यामध्ये गुणात्मक फरक आहे.

मार्क्सवाद्यांनीही लैंगिक दमनाला विरोध केला होता. पण तो वेगळ्या भूमिकेवरून होता. त्याचा विचार आपण पुढे करू.

आज न्यू लेफ्ट चळवळीमधील काही लोक म्हणतात त्याप्रमाणे पितृप्रधान समाजव्यवस्थेचा त्याग करून मातृप्रधान समाजव्यवस्था पुन्हा कायम करण्याने समाजामधील स्पर्धा, दमन व भीती जाऊन भ्रातृभाव व प्रेम नांदू शकेल का? का आज या दोन्हीतील सुयोग्य गुणविशेषांचा संकर झालेल्या नव्या समाजसंघटनाची गरज आहे? याचा विचार व्हायला हवा.

कालची भारतीय स्त्री

जागतिक पातळीवरील सर्वसाधारण चित्र आपण पाहिले. कुटुंबव्यवस्थेचे बदलणारे स्वरूप आपण पाहिले. त्यातूनच स्त्रीचे स्थान बदलत गेले. भारतामध्ये ही प्रक्रिया कशी कशी घडली हे आपण पाहणे आवश्यक आहे. आपण आपल्या संस्कृतीला वैभवशाली म्हणून तिचा गौरव करतो. हिंदू धर्माच्या संपन्न परंपरांचे आणि वैदिक तत्त्वज्ञानाचे गोडवे गातो. मैत्रेयी, गार्गी, लोपामुद्रांची नावे आपल्या तोंडावर वारंवार फेकली जातात आणि सांगितले जाते की, खरे म्हणजे आपली संस्कृती श्रेष्ठ आहे. आम्ही स्त्रियांची देवता म्हणून पूजा करतो. स्त्रीचा मानसन्मान करतो. मध्ययंतरीच्या काळात मुसलमानांच्या स्वाऱ्या आल्या म्हणून आम्ही स्त्रीला चार भिंतींच्या आत कोंडले. तेव्हापासून स्त्रियांना बंधनात राहावे लागले. त्यातही स्त्रियांचे संरक्षण व्हावे एवढाच उदात्त हेतू होता. भारतीय समाजात स्त्रीला आदराचे स्थान होते व आजही आहे.

अशा प्रकारच्या युक्तिवादात एक लक्षात येते की यामध्ये इतिहासाचा कालानुक्रमानुसार पद्धतशीर अभ्यास नाही. ही सगळी खिचडी आहे. भारतीय संस्कृती ही जणू एका जागी थांबून राहिलेली संस्कृती आहे. तिचा खूप पूर्वीचा काळ, काल, आज आणि उद्या यामध्ये काही फरक पडलेला नाही, जीवनपद्धती बदललेली नाही. ही विचार करण्याची पद्धतच चुकीची आहे. आतापर्यंत आपण पाहिले की, प्रत्येक समाज टप्प्याटप्प्याने विकसित होत असतो. अर्थात प्रत्येक समाजाच्या विकासामध्ये मघाशी वर्णन केलेल्या व्यवस्था पूर्णपणे साकार होतातच असे नाही. तरीही समाज स्थितिजन्य नसतो. त्यांची समाजव्यवस्था बदलत जात असतेच.

प्राचीन भारतात समाजव्यवस्था कशी बदलत गेली आणि कुटुंबव्यवस्थेवर व स्त्रीच्या स्थानावर याचे कसे परिणाम होत गेले याचा सखोल अभ्यास होणे आवश्यक आहे. या पुस्तिकेच्या कक्षेत याचा सखोल अभ्यास येत नाही. तरीही आपण एक धावता आढावा घेतला तर आज भारतीय स्त्री अशी दुबळी, अडाणी, दडपली गेलेली, चैतन्यहीन का बनली आहे याची कारणे आपल्याला कळतील. त्याचबरोबर स्त्रीचे स्थान हे देवाने किंवा निसर्गाने ठरविले नसून मानवी व्यवहारातून निश्चित झाले आहे, याचा प्रत्यक्ष पुरावा आपल्याला मिळेल.

सिंधू संस्कृती

भारतातल्या टोळी समाजाविषयी अशी फारशी माहिती उपलब्ध नाही. पण आपण सर्वसाधारणपणे जे चित्र आधी पाहिले त्यापेक्षा ते वेगळे नसावे. मोहोंजोदारो व हडप्पा येथील सिंधू संस्कृतीच्या कालखंडाच्या (इ.स. पूर्व ३००० ते १७५०) आधी समाज हळूहळू शेतीप्रधान बनत होता. शेतीप्रधान समाजामध्ये स्त्रीला महत्त्वाचे स्थान प्राप्त होई. जमिनीमध्ये अणकुचीदार दगडाने खणून स्त्रिया बी पेरीत. हे धान्य साठवून ठेवता येई. त्या प्राथमिक अवस्थेतील शेतीसाठी फार मोठ्या शारीरिक बळाची आवश्यकता नसे. महत्वाची गोष्ट म्हणजे स्त्रीची प्रजोत्पादनशक्ती व जमिनीची धान्य, वनस्पती प्रसविण्याची शक्ती ही एकाच प्रकारची समजली जाई. त्यामुळे स्त्रीची गर्भधारणा व जमिनीची सुफलता यांचा संबंध लावला जाऊन जमिनीतून भरघोस पीक हवे असेल तर स्त्रीच्या मंत्रतंत्रसामर्थ्याने ते येईल, अशी श्रद्धा होती. मानवाला नैसर्गिक नियमांचे आकलन नव्हते. तो भोवताली घडणाऱ्या घटनांचा आपल्या परीने अर्थ लावण्याचा प्रयत्न करी. यातूनच स्त्रीने शेतात जाऊन पुरुषाबरोबर मैथुन केले असता शेत चांगले पिकते अशी कल्पना रूढ होती. इतरही अनेक प्रकारचे 'समृद्धी विधी' होत असत. पाऊस पडावा म्हणून पर्जन्यविधी केला जाई. याच काळात काही भागांत मातृसत्ताक कुटुंबपद्धती रूढ झाली होती. आपल्या धर्मांत जे देवतांना महत्व मिळाले तो याच काळाचा वारसा आहे. देवतासंप्रदाय व देवीभक्ती यांचा उदय याच काळात झाला होता. स्त्रीकडे आदिशक्ती, विश्वजननी म्हणून पाहिले जाई. विश्वातील सर्जनशीलत्व फक्त स्त्रीकडेच आहे, अशी श्रद्धा होती. पुढे मात्र पुरुषप्रधान संस्कृतीशी संकर झाल्यावर ह्या देवता-संप्रदायाला विकृत स्वरूप प्राप्त झाले. कित्येक शतके बदल होत होत धार्मिक विधी स्त्रियांकडून पुरुषांकडे गेले. प्रारंभीच्या काळात पुरुषाला स्त्रीरूप घेऊनच देवीची पूजा करण्याची परवानगी असे. पौरुषाचे खच्चीकरण करण्याची चाल काही काळ रूढ होती. नंतर मात्र स्त्रीचा वेष परिधान करण्याचा उपचार फक्त उरला. माहुर-तुळजापूर येथील देवीभक्ताला भुत्या म्हणतात. तो याच परंपरेचा वारसा आहे.

पूर्वीच्या अश्मयुगात दगडी हत्यारे होती तर सिंधू संस्कृतीत ब्रॉंझ, तांबे, सोने, चांदी यांचा वापरही होत असे. सिंधू संस्कृतीत खेड्यांमध्ये शेती व पशुसंवर्धन होत असे. परंतु धनिक व वरिष्ट वर्गातले लोक मोठमोठ्या नगरांमध्ये राहत. व्यापार व हस्तोद्योग तेथे मुख्यतः चाले. चातुर्विधी व धार्मिक कल्पना यांचा विकास होत अत्यंत प्राथमिक स्वरूपाचा 'धर्म' या संस्कृतीत नांदत होता. काही पशू, पक्षी, लिंग व शिंगे असणारे देव यांची पूजा होत असे. शहरात राहणारे वर्ग प्रत्यक्ष कष्ट-कऱ्यांकडून वरकड काढून घेऊन त्यावर जगत. या समाजामध्ये विवाहसंस्था नुकतीच

स्थिर होऊ लागली होती. स्त्रीचे दुय्यम स्थान जवळजवळ पक्के होत आले होते; पण अजूनही कुटुंबव्यवस्था वरीच लवचिक असावी असे दिसते. बहुपत्नीत्वाची चाल होती.

वैदिक आर्यसंस्कृती व नंतर

इ.स. पूर्व १७५० च्या सुमारास आर्य आपली वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती घेऊन भारतात आले. आर्यांच्या टोळ्या प्रामुख्याने पशुपालन करणाऱ्या टोळ्या होत्या. त्यांच्याकडे लोखंड व घोडे ही प्रगत साधने होती. त्यांच्यामध्येही पुरुषप्रधानतेची बीजे रुजली असावीत. त्यांच्या टोळ्यांमध्ये म्हणजेच गणसंस्थांमध्ये सामुदायिक जीवन होते. आरंभीच्या काळात खाजगी मालकीची कल्पना अस्तित्वात नव्हती. वैयक्तिक विवाहसंबंध अजून पक्के झाले नव्हते. काही वैदिक वाङ्मयात सामूहिकतेचे, समतेचे, सामाजिक नीतिमत्तेचे गुणगान केलेले आढळते.

भारतात आल्यावर मात्र या वैदिक आर्यांच्या गणसंस्थांचा वेगाने विस्तार होत गेला. येथील शेतीप्रधान व स्थिर 'दस्यू'शी (म्हणजे सिंधू संस्कृतीतील लोकांशी) लढाया करून त्यांना जिंकून घेत आर्यही येथे स्थिर होऊ लागले आणि हळूहळू येथे चातुर्वर्ण्य व्यवस्थेचा उदय झाला. येथील सुपीक जमिनीतून अतिरिक्त उत्पादन निघत होते आणि नांगरांच्या शोधामुळे मानवाची उत्पादनक्षमता अधिक वाढली होती. आर्यांच्या स्वतःच्या टोळीची प्रथम तीन वर्णांत विभागणी हळूहळू होऊ लागली. पुरोहितांचा वर्ण, लढवय्या वर्ण, व्यापारी वर्ण आणि त्यांनी जिंकून घेतलेल्या लोकांमधून चौथा वर्ण आकारास आला. तोच शूद्र वर्ण. या शूद्रांनी शेती करायची, कष्ट करायचे आणि या वरिष्ठ तीन वर्णांनी प्रत्यक्ष उत्पादनात भाग न घेता इतर कामे करायची. याच तीन वर्णांचा मिळून राज्यकर्ता वर्ग तयार झाला.

यातून पुढे अतिरिक्त उत्पादन, खाजगी मालकी, स्त्री-पुरुष वैयक्तिक संबंध अशा तऱ्हेने कुटुंबव्यवस्था पक्की होत होती. त्या काळच्या समाजव्यवस्थेचा निश्चित अभ्यास उपलब्ध नाही; पण लिखित पुराव्यावरून जी समाजरचना दृष्टीस पडते त्यावरून असे म्हणता येते की स्त्री-पुरुष संबंध मध्ययुगीन काळाइतके कठिण झालेले नव्हते. स्त्रीला जर मूल नसेल तर 'नियोगा'ची पद्धत होती. अर्थात त्यामध्ये स्त्रीला शारीरिक सुख मिळावे हा भाग नसून तिच्या नवऱ्याच्या संपत्तीला वारस मिळावा हीच कल्पना प्रामुख्याने होती. त्याचप्रमाणे त्या काळी वयात आल्यानंतर स्त्रीचा विवाह होत असे. गार्गी, मैत्रेयी वगैरे विदुषी आर्यकाळाच्या प्रारंभी होऊन गेल्या असे उल्लेख आहेत. त्यांची उदाहरणे ही प्रातिनिधिक मानता येत नाहीत. त्यावरून सर्व स्त्रीवर्गाला शिक्षण मिळत होते असे म्हणणे धाडसाचे ठरेल. शूद्र वर्णातील स्त्रिया तर कष्टाला जुंपलेल्या होत्या आणि ब्राह्मण-स्त्रियांनासुद्धा वेदाधिकार नव्हता; त्यांचे

उपनयन (मुंज) होत नसे व विवाहविधी हेच स्त्रीचे उपनयन समजावे असे ऋग्वेदात म्हटलेले आहे !

इ. स. पूर्व ५०० नंतरच्या काळात एक मूलभूत परिवर्तन उत्तर भारतात घडून येत होते. आर्य नवे नवे प्रदेश जिंकून तेथे स्थायिक होत होते; त्यांचा स्थानिक रहिवाशांशी–अगदी रानटी टोळ्यांपासून सिंधू संस्कृतीतील प्रगत लोकांशी–संबंध येत होता. आर्य टोळ्यांचे आपसांतील संघर्ष चालू होतेच. काही शतके चालू असलेल्या या प्रचंड घडामोडींची निष्पत्ती म्हणजे पुढे स्थिरावलेली भारतीय संस्कृती होय. भारतीय संस्कृतीला वैदिक किंवा आर्य म्हणणे योग्य नाही. ती स्थानिक संस्कृती व आर्यांची संस्कृती यांच्या संकरातून निर्माण झाली आहे. तिच्यात अग्नी, वरुण हे आर्यांचे तसेच लिंग, कृष्ण हे स्थानिकांचे देव आहेत.

या वेळच्या सामाजिक बदलांमध्ये काही बदल आपण लक्षात घ्यायला हवेत. या वेळपावेतो जवळजवळ सर्व उत्तर भारत हा या संकरित संस्कृतीच्या कक्षेत आला होता. पशुपालनाऐवजी स्थिर शेती हा जीवनाचा पाया बनला होता. ही शेती करण्याकरिता कष्टकरी शूद्रांचा एक भाग व त्यांच्यावर हुकमत गाजवणारा आणि लढाया करणारा क्षत्रिय, धार्मिक विधी व बौद्धिक कामे करणारा ब्राह्मण व व्यापारउदीम करणारा वैश्य अशी व्यवस्था या गोंधळातून हळूहळू समाजात पक्की होत होती. अलग अलग टोळ्या नष्ट होऊन एकसंघ, संघटित समाज निर्माण होत होता आणि त्याचबरोबर टोळ्यांचे प्रमुख जाऊन सार्वत्रिक व्याप्तीची राज्यव्यवस्था जन्म घेत होती.

खाजगी मालमत्ता, स्थिर व संघटित जातिप्रधान वर्गीय समाजरचना व राजेशाही ही एकदमच विकास पावत होती. हे सर्व एका वैशिष्ट्यपूर्ण संस्थेच्या–ग्रामसंस्थेच्या–आधारे पक्के केले जात होते. शेती व उद्योगधंदे यांची घट्ट सांगड घालून खेडी जवळपास स्वयंपूर्ण बनली. त्यांच्यात जातीय रचनेच्या रूपाने काटेकोर श्रमविभागणी स्थिरावली, बलुतेदारीसारखी व्यवस्था निर्माण झाली.

हे सर्व चित्र डोळ्यांसमोर ठेवून आपणास या काळातील स्त्रीचा विचार करायला हवा. टोळीपेक्षा खूपच मोठ्या आकाराचा व गुंतागुंतीचा समाज व्यवस्थित चालायचा तर सर्व नियम अधिक काटेकोर व पक्के हवेत. जातिव्यवस्थेबाबत असे हे झालेले आढळते तसेच कुटुंबसंस्थेबद्दल व विवाहाबद्दलही झालेले आढळते. आर्थिक जीवनात सर्व वर्गांचे हक्क व कर्तव्ये आखून दिली गेली. जातीजातीमधील व्यवहाराचे नियम घालून देण्यात आले. त्यांचे पालन हे 'धर्म पाळणे' या नावाने नैतिक ठरविण्यात आले. मनुस्मृतीसारख्या ग्रंथात आज आपल्याला भीषण वाटणारे, विषमता व अत्याचार यांवर आधारलेले नियम निर्माण झाले ते याच काळी. आणि हे नियम–पालन अंमलात आणण्यासाठी प्रचंड राज्ययंत्रणा, सैन्य व मुलकी अधिकारी, ही सुद्धा

निर्माण झाली. सम्राट अशोकाचे राज्य हा या गोष्टीचा परिपाक म्हणता येईल.

अगदी पूर्वी आदिमातेशी नाते असणारी, समान मानलेली स्त्री त्यानंतर बऱ्याचशा सैलसर बंधनात बांधली गेलेली स्त्री, आता मात्र या नव्या व्यवस्थेत पुरती जखडली गेली. विवाह अर्थात एका जातीतच शक्य होता. अनेक नियमांनी स्त्रीचे दुय्यम, भोगदासी व प्रजोत्पादनाचे साधन हे स्थान पक्के झाले. पुरुषाचा व्यभिचार क्षम्य होता. पण स्त्रीचा अक्षम्य होता. तिला संपत्ती, विद्या, सत्ता यांच्यापासून पूर्ण वंचित करण्यात आले व घरकामात डांबले गेले. कौटिल्याच्या 'अर्थशास्त्र' व मनूच्या 'मनुस्मृती' या ग्रंथांमध्ये ही परिस्थिती स्पष्ट दिसून येते. स्त्रीला कधीही स्वातंत्र्य देऊ नका हा महान उपदेश मनुस्मृतीमधलाच. शहरांमध्ये धनिक वर्गाच्या सोयीसाठी वेश्याव्यवसाय करणाऱ्या स्त्रियांचा समूह तयार झाला. विधवा व परित्यक्ता स्त्रियांचे हाल सुरू झाले.

यानंतरच्या इ. स. ३०० ते १८०० या सुमारे पंधराशे वर्षांत, म्हणजे ब्रिटिश काळापर्यंत भारतीय समाजात बरेच बदल झाले. वर वर्णन केलेली संस्कृती दक्षिण भारतामध्ये पसरली व स्थिरावली. प्रथम गुप्त घराण्याचे साम्राज्य, नंतर हर्षवर्धन, दक्षिणेत राष्ट्रकूट, शातवाहन इत्यादी राज्ये आली. इ. स. १२०० नंतरच्या काळात मुसलमानांचे आगमन झाले व पुढे मोगल साम्राज्य स्थापन झाले. या काळाचा इतिहास तपशीलवार बघण्याचे हे स्थान नव्हे. राजकीय जीवनात या उलथापालथी होत असताना आर्थिक व सामाजिक जीवनातही सूक्ष्म बदल घडत होते. हळूहळू एका प्रकारच्या सरंजामशाही व्यवस्थेची निर्मिती चालली होती. राजे, सरदार, जहागिरदार, इनामदार, त्यांच्या आश्रयी असणारा ब्राह्मण पुरोहितवर्ग, व्यापारी व उद्योगधंदा करणारे कारागीर आणि शेतात राबणारे शूद्रातिशूद्र असे थर समाजात घट्ट बनत होते. या पर्व घडामोडींमधून भारतीय संस्कृतीचे स्वरूप जास्तजास्त गुंतागुंतीचे, अनेक प्रकारच्या सांस्कृतिक पद्धती सामावून घेणारे असे बनत गेले.

परंतु विवाहपद्धती, कुटुंबसंस्था व स्त्रीचे स्थान यांच्या बाबतीत मूलभूत असा फरक या सगळ्या कालखंडात पडला नाही. सततच्या लढाया, आक्रमणे यांच्यामुळे स्त्रीचे जीवन असुरक्षित होते. याची प्रतिक्रिया म्हणून तिच्या संरक्षणासाठी तिला अधिकच घरात वा गोशात डांबले गेले. धर्मनिष्ठादेखील आता उपचार म्हणून राहिली–कर्मकांड व व्रतवैकल्ये यांचे प्राबल्य माजले आणि या कुजत, साचून राहिलेल्या समाजप्रवाहात स्त्रीचे दास्य अधिकच तीव्र होत गेले. इतिहासाच्या सुरुवातीला कधी 'मुक्त' असणारी, पूजिली जाणारी स्त्री ही आता पूर्णपणे दडपली गेली व बंधनात अडकली. आधुनिक युगाची सुरुवात होईपर्यंत तिचे निःश्वास कोणालाच ऐकू येत नव्हते.

शिवकालातील व पेशवेकालातील स्त्री

आपल्याला अधिक जवळच्या व महत्त्वाच्या अशा सतराव्या व अठराव्या शतकातील महाराष्ट्रातील स्त्री-जीवनाबद्दल अधिक माहिती मिळते. हा काळ साधारण शिवाजी व पेशवे यांच्या राजकारणाचा काळ. या 'वैभवशाली' काळातील स्त्री-जीवन पाहणे फार महत्त्वाचे आहे. या काळातील स्त्रीच्या स्थानाचा विचार करताना तो सगळ्या पैलूंच्याच संदर्भात करावा लागतो. विवाहपद्धती, पुनर्विवाहाचा अधिकार, शिक्षण, आर्थिक स्थान, कायदे, राजकीय स्थान या सर्वांविषयी थोडक्यात आपण माहिती बघू. त्याचबरोबर उच्चवर्गीय स्त्री व कनिष्ठवर्गीय स्त्री या दोन्ही वर्गांतील स्त्रियांचे विशेष अधिकार व विशेष दुःखे या दोन्हींचा विचार करावा लागतो.

या सुमारास ब्राह्म व असुर हे दोन विवाहप्रकार रूढ होते. ब्राह्म म्हणजे विधिपूर्वक कन्यादान. उच्चवर्णीयांमध्ये कन्येचा विवाह या पद्धतीने होई. कन्येला अलंकार दिले जात. हुंडापद्धत ही तेव्हा अस्तित्वात होती. कनिष्ठ जातींमध्ये 'असुर' पद्धतीने विवाह होत. मुलाच्या बापाने मुलीच्या बापाला पैसे देऊन मुलगी घरी आणायची पद्धत होती. कूळ व शील याला अतिशय महत्त्व असे. जातीबाहेर विवाह होणे शक्यच नव्हते. पुरुष हा दान घेणारा व वधू ही देय वस्तू होती.

विवाहाची मर्यादा कमी होता होता ८–९ वर्षापर्यंत पोचली होती. पुरुषाचा द्वितीय विवाहसुद्धा बालिकेशी होई. पस्तीस वर्षांचा वर व दहा वर्षांची वधू असे प्रसंग पुष्कळदा घडत. बालविवाहामुळे अकाली मातृत्व प्राप्त होई आणि कोवळ्या बालिका मृत्युमुखी पडण्याचे प्रमाण बरेच असे. श्रीमंतांमध्ये हे प्रमाण जास्त होते. स्त्रीकडे उपभोगाची वस्तू व प्रजोत्पादनाचे साधन म्हणूनच पाहिले जाई.

पेशव्यांच्या घराण्यातील बालजरठ विवाहाचे काही पुरावे पेशवेदप्तरात आढळतात. दुसऱ्या बाजीरावाचे सहा विवाह झाले होते. पहिल्या विवाहाची पत्नी भागीरथीबाई. ती वयात येण्यापूर्वीच तिला बाजीराव 'त्रास देत असे', असा मजकूर सापडतो. नाना फडणवीसांची एकूण नऊ लग्ने झाली. नाना गेले तेव्हा फक्त सात जणी उरल्या होत्या. त्याही अतिशय लहान वयाच्या. आपल्या कामविकाराची कबुली नानांनी आपल्या आत्मचरित्रात देऊन ठेवली आहे. आगरकरांनीही त्या वेळच्या जुलुमांचे वर्णन फार भयंकर केले आहे. 'बुभुक्षित लांडग्याने मेंढीवर झडप घालावी तसे आपल्या पत्नीस बाजूला नेऊन सुखाचा घुटका घेणारे पुरुष त्या वेळी अस्तित्वात होते.'

त्या काळी ब्राह्मण, सोनार, कायस्थ, उच्च मराठे यांच्या स्त्रियांना पुनर्विवाहास परवानगी नसे. मात्र बहुजन स्त्रियांना पुनर्विवाहास परवानगी असे. लग्न म्हणजे प्रथम विवाह. पाट, मोहतूर, गांधर्व म्हणजे द्वितीय विवाह. या तिन्ही शब्दांमध्ये एक

महत्त्वाचा अर्थ अभिप्रेत आहे. स्त्री जेव्हा आपणहून वरलेल्या पुरुषाशी, न्हाण आल्यावर लग्न करते तेव्हा तिला संसारात अधिकार प्राप्त होतो. विधवांवरोबर सधवांनाही पाट लावण्याची परवानगी होती. दुसऱ्या नवऱ्याने पहिल्या नवऱ्याला लग्नातील खर्च म्हणून पैसे द्यायचे, त्याला 'देज' म्हणत.

उच्च वर्णीयातील विधवांना मात्र असह्य जिणे जगावे लागे. त्यांना दोनच मार्ग होते. संन्यस्त वृतीने वैधव्यपालन किंवा पतीवरोवर सती जाणे. संन्यस्त वृत्तीने राहणे सोपे पडावे म्हणून विधवेचे केशवपन करून तिचे केस मृत देहावरोवर जाळले जात. कुटुंवात विधवा अशुभ समजली जाई. सौभाग्यवतीने विधवेच्या पंगतीस वसू नये असा नियम होता. आणि या घोर तपश्चर्येच्या वदली तिला वोडकी, रांड, रंडकी अशी मुक्ताफळे मिळत.

सतीची उदाहरणे पाहिली असता ही आत्माहुती दिव्य प्रेमापोटी क्वचितच घडे हे लक्षात येते. धार्मिक रूढींचा पगडा जवरदस्त होता. आजच्या काळासारखे जीवन प्रवाही नव्हते. गावातील सर्व जण एकमेकांवर अवलंबून असत. वहिष्काराची भीती असे. त्यामुळे समाजाला भिऊन वागावे लागे. सतीची सक्ती कशी होई याचे वर्णन एका इंग्रज लेखकाने 'पुणे शहराचे वर्णन' या पुस्तकात केले आहे. 'एक स्त्री सती जात असता अंग पोळून वाहेर निघाली. सर्व अंगाची लाही होते म्हणून नदीत उडी टाकण्यासाठी ती नदीकडे पळू लागली. पण ब्राह्मण लोकांनी तिला पकडून जुलुमाने सरणात टाकले व वर मोठमोठे ओंडके टाकून तिचा प्राण घेतला.' त्या काळी सतीला उत्तेजन दिले जाई. सरकारतर्फे सती जाणाऱ्या बाईचा गौरव करण्यात येई. आर्थिक साहाय्य देण्यात येई. सतीचे आप्तेष्ट तिला आहेर देत. तीसुद्धा ऐपतीप्रमाणे दानधर्म करी. माधवरावांच्या पत्नी रमावाईने सती जाण्यापूर्वी लाखो रुपये किंमतीचा दानधर्म केला.

त्या काळी मुसलमान राज्यकर्त्यांच्या अनुकरणामुळे पडदा-पद्धत उच्च थरामध्ये उचलली गेली. मात्र मराठी राज्यकर्त्यांच्या स्त्रिया तरी पडद्यामुळे तशा वंदीवान झाल्या नाहीत. राजघराण्यातील स्त्रिया घोड्यावर वसत. भाला मारणे वगैरे शौर्यविद्यांमध्ये तरवेज होत. मात्र नृत्य, गायन आदि कलांपासून या स्त्रियांना काळजीपूर्वक दूर ठेवले जाई. नाचणाऱ्या व कलावंतिणी वेगळ्या आणि खानदानी स्त्रिया वेगळ्या. याउलट आदिवासी स्त्रिया मात्र सामूहिक नृत्यगायनात हिरीरीने भाग घेत होत्या. निसर्गावरोवरचे त्यांचे साहचर्य त्यांच्या रोजच्या जीवनात प्रतिविंवित होत होते आणि 'सुसंस्कृत' समाज मात्र आपल्या स्त्रियांना सूर्यापासूनसुद्धा लपवून ठेवीत होता.

वालविवाह होत असल्याने शिक्षणाची फारशी संधीच मिळत नसे. मात्र धर्माची पकड घट्ट होईल, अंधश्रद्धा वळकट होतील याची काळजी घेतली जाई. 'स्त्रियांनी

पुराणिक याजपासून नित्य पुराण, स्त्रियांचे धर्म व पातिव्रत्य धर्म व इतिहासश्रवण करावे असे करविले,' असे ऐतिहासिक उल्लेख आहेत. मुलीला गृहकृत्यदक्षतेचे शिक्षण मिळे. पाणी ओढणे, भरणे, दळण, कांडण, केरपोतेरे, स्वयंपाक, वाढणे, दळण दळणे इत्यादी गोष्टी लहानपणापासून अंगवळणी पाडल्या जात. एकत्र कुटुंबपद्धती असल्यामुळे अनेक माणसांची नाती कशी पाळावीत याचे शिक्षण फार आवश्यक असे. पेशवे, इतर ब्राह्मण व मराठे सरदार यांच्या स्त्रिया बहुतकरून साध्या असत. पोथ्या वाचण्याचे, पत्रे लिहिण्याचे ज्ञान त्यांना असे; पण पुष्कळदा श्रवणानेच त्या ज्ञान संपादीत. अवघड ग्रंथ वाचण्याइतकी गती येण्याइतके त्यांना शिक्षण मिळत नसे.

कष्टकरी लोकांच्या बायका त्यांच्या त्यांच्या धंद्यात त्यांना मदत करीत. शेतकऱ्यांच्या बायका शेतावर जात. साळी, कोष्टी, सुतार, लोहार, तेली, परीट या सगळ्यांच्या बायका आपापल्या धंद्यात तरबेज असत. मात्र अनाथ, अशरण स्त्रियांना कुठल्याही प्रतिष्ठत धंद्यात प्रवेश नव्हता. निरनिराळ्या धंद्यांना लागणारे धंदेशिक्षण उपलब्ध नव्हते. मध्यम वर्गाच्या स्त्रियांना तर अर्थार्जनासाठी बाहेर पडण्याची पंचाईत. दुसऱ्याच्या घरी स्वयंपाकपाणी करणे किंवा सुईण बनणे एवढे दोनच उपाय. अगदी शेवटी वेश्याव्यवसायाला जवळ करण्यावाचून गत्यंतर नसे. पूर्वीच्या काळी रक्षा किंवा रखेली ठेवण्याची पद्धती होती. वेश्यावस्ती तर होतीच. 'बावनखणी आणि तेथे पाचपन्नास कसबिणी' हा उल्लेख आहे. मात्र या स्त्रिया कनिष्ठ जातीच्या असाव्यात. खंडोबाला नवस करून अर्पण केलेले मुलगे वाघ्या बनत व मुलींना मुरळी म्हणत. मात्र 'वाघे' गृहस्थ जीवन सुरू करू शकत. 'मुरळी' वर मात्र लग्न न करण्याचे बंधन असे. पुरुषप्रधान समाजाने सोयिस्करपणे काढलेले हे नियम होते. 'मुरळ्या परमेश्वराची सेवा करीत असल्याने त्यांना वेश्यावृत्तीचे पाप लागत नाही' अशी धार्मिक समजूत आहे, म्हणे.

कुणबीण म्हणून विक्रीस ठेवण्याचीही चाल होती. अविवाहित शूद्र स्त्रिया दासी म्हणून विकल्या जात. पूर्वी दुष्काळ पडला की मुलेबाळे विकत व भाकर किंवा कोंडा मिळवीत. हैडे, वारण वगैरे लोक या मुलींना विकत घेऊन मोठ्या झाल्यावर बटीक म्हणून विकत. पन्नास रुपयांपासून ते शंभर रुपयांपर्यंत त्यांची किंमत असे. शनिवारवाड्यात काम करणाऱ्या कुणबिणी पेशव्यांच्या दासी होत्या.

स्त्रियांच्या कायदेशीर हक्काबद्दल पाहणी करायला गेले तर स्थिती फारच वाईट आढळते. अविभक्त कुटुंबाची पद्धत प्रामुख्याने रूढ होती. एक पुरुष प्रमुख सत्ताधारी व बाकी सर्वांनी त्याच्या आश्रित वागायचे. संपत्ती नेहमी पुत्र, पौत्र, याच क्रमाने जाई. पुत्र जन्माला आला की वडिलार्जित मिळकतीत हक्क निर्माण होई. मुलीला नाही, स्त्रियांना किमान दर्जा असे. घरातील खस्ता खाऊनही स्त्रीची योग्यता

गुलामापेक्षा जास्त नसे. नवऱ्याची मेहेरबानी म्हणून तिला हे सर्व मिळत असे. पतीच्या मनात ज्या दिवशी दुसरी स्त्री भरेल त्या दिवशी ती आपल्या वैभवाला मुकत असे. रंगमहालातील तिचे महत्त्व नाहीसे होई. विधवेला तर विचारणे दूरच राहो. तिला मुलगा असेल तर निदान विधवेला त्या अविभक्त कुटुंबाच्या मालमत्तेवर दुरून तरी हक्क सांगता येई. मुलीच असतील तर मुलींची लग्ने होणे घरप्रमुखांच्या मर्जीवर अवलंबून राही. नाही तर कन्या विक्रयाचे आमिष होतेच. थोडक्यात, स्त्रियांना स्वतंत्र जगणे जवळजवळ अशक्य होते. पती कसाही असला तर ती स्वतःसाठी मालमत्ता मागून घेऊन विभक्त राहू शकत नव्हती. विवाह, विवाहविच्छेद किंवा वारसा-कोटेच ती महत्त्वाची नव्हती. स्त्रियांना हीन, पतित म्हणूनच पशूपेक्षाही कमी लेखणारा हा समाज होता.

स्त्रियांना राज्यपद मिळत नसे. मात्र पतीच्या मागे राज्यारूढ राजा अज्ञान असल्यास त्याची माता म्हणून राज्यकारभार चालविण्याची पद्धत होती. राजारामाची पत्नी ताराबाई हिने वयाच्या २५ व्या वर्षी विधवा झाल्यावर मराठी राज्याची धुरा सांभाळली. अहिल्याबाई होळकरांचे राजकीय कर्तृत्व प्रसिद्ध आहेच. आनंदीबाईची महत्त्वाकांक्षा व कपटी राजकारणही परिचित आहेच. या उदाहरणांचा अर्थ एवढाच की संधी मिळाल्यास स्त्रियाही आपले कर्तृत्व दाखवीत.

या सर्वांतून आपल्याला स्त्रीचे सर्वसामान्य असे एकच चित्र रंगविता येईल. शिक्षण नसल्याने स्त्रीला आर्थिक व्यवहारात भाग घेता येत नव्हता. राजकारण करता येत नव्हते. शूद्रवत मानल्यामुळे धर्माची ओळख नव्हती. धर्माचे नियम बनविण्यात भाग घेता येत नव्हता. आठव्या वर्षी लग्न झाल्यामुळे तिच्या दृष्टीला कुटुंबाबाहेर पाहायची कुवत नव्हती व ती कल्पनातीत कोत्या व संकुचित बुद्धीची झाली होती. राजकीय, सामाजिक, आर्थिक, नैतिक कोणतेच अधिकार नसल्यामुळे दुःखी, लाचार, निराश, सर्वस्वी पुरुषाधीन स्त्री संपूर्णतया मिट्ट काळोखात होती. जिजामाता, अहिल्याबाई, लक्ष्मीबाई अशा सौदामिनी लखलखून चमकून सारा आसमंत उजळून टाकतात, पण सामान्य स्त्रीजीवन अंधारातच होते.

भारतीय संस्कृतीतील अविभक्त व विभक्त कुटुंबसंस्था

प्राथमिक अवस्थेतील शेतीप्रधान समाजातूनच वर्गसमाजाचा व त्याबरोबर पुरुष-प्रधान पितृसत्ताक कुटुंबाचा जन्म झालेला आपण पाहिला. भारतामध्ये अजूनही शेतीप्रधान अर्थव्यवस्था असल्याने व ही शेती मागासलेल्या अवस्थेत असल्याने याच पितृसत्ताक कुटुंबपद्धतीची दोन रूपे अजूनही अस्तित्वात आहेत. (१) अविभक्त कुटुंब व (२) विभक्त कुटुंब. ही कुटुंबव्यवस्था खाजगी मालकीवर आधारित उत्पादनव्यवस्थेचा प्राथमिक घटक होती. आज विभक्त पद्धतीमध्ये कुटुंबव्यवस्थेचे रूपांतर झाले असले तरी कुटुंब हे उत्पादनाचा प्रमुख घटक राहिलेले नाही, तरी उप-भोगाचा घटक म्हणून ते काम करते. शिवाय प्रजोत्पादन व मुलांचा सांभाळ हे कुटुंबाचे कार्य संपलेले नाही. कुटुंबाची रचना नक्की कशी होती हे जर नीट तपासायचे असेल तर आपल्याला हिंदू धर्माचे कायदे व सध्याचे भारतीय कायदे यांची छाननी करणे आवश्यक आहे. वैदिक वाङ्मयामध्ये संपत्तीसंबंधीचे कायदेकानू आढळत नाहीत. खाजगी मालमत्ता स्थिर होण्यापूर्वीचा तो काळ असावा. धर्मसूत्र व मनुसंहिता या दोन ग्रंथांमध्ये मालमत्तेची विभागणी व अधिकार या संबंधी विस्ताराने सांगितले आहे. धर्मसूत्राचा काळ साधारणपणे खिस्तपूर्व ६०० ते ३०० वर्षे मानला जातो. मनुसंहितेचा काळ खिस्तपूर्व २०० ते इसवी सन १०० पर्यंत मानला जातो. याच काळात खाजगी मालमत्तेवर आधारित जडणघडण भारतामध्ये पक्की होत गेली.

पुरुषाचा संपत्तीवर संपूर्ण अधिकार असे. मात्र याचा अर्थ ती संपत्ती तो मनः-पूर्वक उधळून देऊ शकत नसे. हे अधिकार कशा रीतीने चालावेत याची रूपरेषासुद्धा आखलेली असे. अर्थात हेही नियम काळाप्रमाणे बदलत गेलेले आढळतात. महा-भारतात पांडवांचा कुटुंबप्रमुख धर्मराज होता व द्यूतामध्ये तो आपला भाऊ व पत्नी या सर्वांना दान देऊन टाकू शकत होता. या सुमारास खाजगी मालमत्तेची कल्पना जन्माला येत होती. व एकूणच संपत्ती खूप कमी होती. पुढे पुढे या कुटुंबप्रमुखावरही बरीच बंधने पडलेली दिसतात. प्राथमिक अवस्थेमध्ये संपत्ती विभागली जाऊ नये म्हणून काळजी घेतलेली दिसते. पित्यानंतर संपत्ती सर्वांत थोरल्या मुलाला मिळे. या मुलावर सर्व घराची जबाबदारी असे. धाकटे भाऊ त्याला पुत्रवत असत. थोरला भाऊ जन्मजात कुटुंबप्रमुख बने. त्याला कर्तृत्व सिद्ध करावे लागत नसे. थोरल्या मुलाकडे आध्यात्मिक किंवा सांस्कृतिक वारसाही येत असे. त्याला कुलाचाराचे, यज्ञ-यागाचे अधिकार मिळत. मनुसंहितेत म्हटले आहे, ' पिता व माता यांच्या मृत्यूनंतर

सर्व भावांनी एकत्र जमावे व संपत्तीची समान वाटणी करावी. किंवा सर्व संपत्तीची जबाबदारी थोरल्या मुलावर सोपवून इतरांनी त्याच्या छत्राखाली रहावे.' गंमत म्हणजे धर्मसूत्र ग्रंथ हा मनुसंहितेच्या आधीचा ग्रंथ. त्यामध्ये मुलांना समान वाटणीचा आग्रह आहे. त्यानंतर मात्र मुलांचा हक्क हा पुष्कळसा आध्यात्मिक स्वरूपाचा आहे पण प्रत्यक्षात संपत्तीचे वाटप होऊ नये अशी काळजी घेतलेली दिसते. शेतीसाठी मोठी जमीन एकत्र रहाणे महत्त्वाचे असावे. संपत्तीच्या वाटणीमध्येही उत्तम भाग थोरल्या मुलाला जावा असे नमूद केलेले आढळते. पित्याने मृत्यूपूर्वीच विभागणी निश्चित करावी असा दंडक होता. पण त्या पित्यावर सामाजिक बंधने होती. पिता मरेतोवर संपत्तीचे वाटप होत नसे. पत्नी, मुले व दास, नोकर हे पूर्णपणे पुरुषावर अवलंबून असत. त्यांनी निर्माण केलेली संपत्ती ही कुटुंबाची असे. घरातील कर्त्या पुरुषाशिवाय कोणीही केलेले संपत्तीचे व्यवहार पूर्णपणे बेकायदेशीर ठरत.

विभक्त कुटुंबाची प्रवृत्तीही हळूहळू जन्म पावताना दिसते. मनु लिहितो, स्वतःच्या ज्ञानाने मिळालेली संपत्ती कौटुंबिक संपत्तीमध्ये एकत्रित करण्याचे कारण नाही. त्यामध्ये विद्यार्थ्यांना शिकवून मिळालेली गुरुदक्षिणा यांचाही समावेश आहे. त्याचबरोबर स्त्रीला तिच्या पित्याकडून, भावाकडून, आईकडून जी भेट मिळाली असेल ते तिचे स्त्रीधन रहाते. आईची संपत्ती ही अविवाहित मुलीला व विवाहित गरीब मुलाला मिळते. मात्र कौटिल्य सांगतो की, स्त्रीचे चारित्र्य ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. ती चारित्र्यवान राहिली तरच तिला संपत्तीचा उपभोग घेता येईल. नाहीतर विधवेची संपत्ती राजाच्या खजिन्यात जमा होईल.

स्त्रीधनाविषयीसुद्धा अनेक अपवाद केले आहेत. सौदायिक धन व असौदायिक धन. सौदायिक धनाचा विनियोग करण्याचे स्वातंत्र्य तिला असे. पतीची अनुज्ञा लागत नसे. याउलट 'दुष्काळ, धर्मकार्य, आजार या अडचणीचे वेळी पतीने स्त्रीधन घेतले असता ते स्त्रीस परत करण्याची आवश्यकता नाही,' असे याज्ञवल्क्य म्हणतो.

वारसा हक्क म्हणून मुलीकडे संपत्ती येत नसे. जिला भाऊच नाही अशी मुलगी मात्र वारस ठरण्याची शक्यता होती. विधवेला अज्ञान पुत्राचे पालकत्व असेल तरच कुटुंबीय संपत्तीचा काही वाटा मिळे. मात्र पुत्र नसेल तर केवळ दोन वेळच्या जेवणाची ती अधिकारी असे. अशा तऱ्हेने संपत्तीवर पुरुषाचा अधिकार घट्टपणे टिकवून सबंध समाजावर पुरुषाची पकड अधिकाधिक घट्ट होत गेली. पुरुषप्रधान कुटुंबव्यवस्थेचा पाया दृढ होत गेला.

विभक्त कुटुंबाचा उगम

ब्रिटिश येथे येऊन औद्योगिकरणाला सुरुवात झाल्यावर मात्र हळूहळू या कुटुंबाचे

विघटन सुरू झाले. भांडवलशाहीला उपयुक्त अशी विभक्त कुटुंबपद्धती येथे अस्तित्वात येऊ लागली. सतीबंदीचा कायदा हा ब्रिटिशांनी येथील धर्मात केलेला पहिला हस्तक्षेप. त्यानंतर बालविवाह प्रतिबंधक कायदा, त्यानंतर जवळजवळ शंभर वर्षांनी १९५६ साली तयार केलेले हिंदू कोड बिल. या कायद्यांनी समाजात चाललेल्या प्रक्रियांचे काही प्रमाणात प्रतिनिधित्व केले व काही प्रमाणात या प्रक्रियांना चालना दिली. एक लक्षात ठेवणे आवश्यक आहे की कायदे व त्या काळची सामाजिक परिस्थिती यामध्ये जवळचा संबंध असतो, हे कायदे ब्रिटिशांच्या पुढारलेपणामुळे संक्रमण झाले नाहीत, काळातील सामाजिक तर्कपद्धतीचे ते फळ होते.

छोट्या प्रमाणावर उत्पादन करणारा कारागीर आपल्या कुटुंबातील लोकांची मदत घेई. शेतकऱ्यालाही मनुष्यबळ हवे असे. मोठी कुटुंबे फायदेशीर असत. भांडवलशाहीला कारखान्यात काम करणारा, जवळ उत्पादनाची काही साधने असलेला, श्रमशक्ती विकून पोट भरू इच्छिणारा कामगार हवा होता. अविभक्त कुटुंबपद्धतीतून व्यक्तीला बाहेर ओरबाडून काढणे आवश्यक होते. मुंबईतील कामगार-संघटनांचा इतिहास पाहिला तर जबरदस्तीने किंवा आमिष दाखवून कोकणातील शेतकरी गिरणीमध्ये काम करायला कसा आणला जाई याची वर्णने पहायला मिळतील. आज बेकारीच्या जमान्यामध्ये हे खरे वाटणार नाही. पण त्यावेळी मुकादमांना कंत्राट देऊन कोकणातून गरीब शेतकरी, कुणबी यांना फसवून मुंबईला कारखान्यातून काम करण्यासाठी आणावे लागे. पुढे पुढे जमिनीची विभागणी होऊन बारीक बारीक तुकड्यांचा धनी आपली जमीन विकून बाहेर पडून शहरात येऊन राहू लागला. कारागिराला छोट्या प्रमाणावर उत्पादन परवडेनासे झाले व तो अवजारे विकून कामगारांच्या सैन्यामध्ये सामील झाला आणि अविभक्त कुटुंबपद्धती मोडून नवे विभक्त कुटुंब जन्माला येऊ लागले. शहरांच्या लोकसंख्येत वाढ व विभक्त कुटुंबपद्धतीचा उदय समांतर जाताना आढळतो.

भारतामध्ये खेड्यांपेक्षा शहरांची लोकसंख्या वाढत जात असल्याचे खालील तक्त्यावरून दिसेल.

ग्रामीण व शहरी भागातील लोकसंख्या वाढीचे प्रमाण

वर्ष	ग्रामीण व शहर
१९२१–३१	१ : १८
१९३१–४१	१ : २५
१९४१–५१	१ : ४६
१९५१–६१	१ : १२

१९५१ साली शिरगणती आयुक्तांनी सांगितले की ग्रामीण भागात ३३ टक्के कुटुंबे ही विभक्त कुटुंबे आहेत व शहरामध्ये ३८ टक्के कुटुंबे विभक्त आहेत. ज्याच्याकडे संपत्ती नाही तेथे हे विघटन अधिक जलदपणे होते असे आढळून येते. मात्र अविभक्त कुटुंब कसे ठरवायचे याबाबत मतभेद आहेत. एका छपराखाली व एकाच चुलीमध्ये ज्यांचा स्वयंपाक होतो, ते सर्व एक कुटुंबीय अशी व्याख्या सोपी आहे. पण ह्यामध्ये इतर अनेक गोष्टींचा विचार होत नाही. मुख्यतः पुष्कळदा आई-वडील खेड्यात रहातात, मुलगा व त्याचे कुटुंब शहरात रहाते. आईवडील बऱ्याच प्रमाणात मुलांच्या पैशावर अवलंबून असतात. किंवा पुष्कळदा थोरला थाऊ खेड्यात शेतावर काम करतो व धाकटा शहरात कामाला जातो. थोरल्याची मुले शहरात धाकट्याकडे शिकायला असतात. थोरला जमिनीतून पिकणाऱ्या धान्यापैकी काही भाग शहरात पाठविते. या कुटुंबाला काय म्हणायचे ?

१९५२ साली झालेल्या एका पहाणीचा वृत्तांत लक्षणीय आहे. ५१३ पदवीधर शिक्षकांपैकी ५७ टक्के शिक्षक एकत्र कुटुंबात रहात होते. त्यांपैकी ८६ टक्के लोकांना ती व्यवस्था उत्तम वाटत होती. फक्त ९ टक्के लोकांनाच अविभक्त कुटुंबपद्धती बदलण्याची आवश्यकता वाटत होती. ड्रायव्हर नावाच्या समाजशास्त्रज्ञाने केलेल्या पहाणीत ग्रामीण भागात १००० रुपयांच्या वर उत्पन्न असलेल्या कुटुंबामध्ये अविभक्त कुटुंबपद्धती आढळते. या उलट शहरामध्ये १५९० रुपयांच्या वर उत्पन्न असलेल्या गटामध्ये अविभक्त कुटुंबपद्धती फारशी लोकप्रिय नसल्याचे आढळते.

कुटुंब व सामाजिक सुरक्षितता

जोपर्यंत एकत्र कुटुंबाची एकत्र संपत्ती असे तोपर्यंत सर्वांनाच एकत्र रहाण्यात रस असे. त्याचे हितसंबंध जपले जात. यानंतर संपत्तीच्या वाटण्या होऊन संपत्ती जवळ-जवळ नष्ट झालेली अनेक कुटुंबे आढळतात. नोकरीधंद्याच्या निमित्ताने ही शहराकडे जातात. पूर्वी या अविभक्त कुटुंबातून सामाजिक 'सुरक्षितता' दिली जात असे. आता भांडवलशाहीत ते काम सरकारने किंवा खाजगी कंपन्यांनी आपल्याकडे घेतले. प्रॉव्हिडंट फंड, पेन्शन, ग्रॅच्युइटी, मेडिकल बेनिफीट अशा प्रकारच्या योजनांमुळे अडीअडचणीला कुटुंबाकडे मदतीच्या आधारासाठी धाव घ्यावी लागत नाही. पूर्वी आणि अजूनही काही प्रमाणात मंदी आली, कारखान्याची टाळेबंदी झाली की कामगार खेड्याकडे जातात. आता काही प्रमाणात नव्या योजनांमुळे सुरक्षितता मिळते. पण भारतामध्ये भांडवलशाही पूर्ण जोमाने विकसित होत नसल्याने या योजना काही संघटित कामगारांपुरत्याच मर्यादित रहातात, व अविभक्त कुटुंबपद्धतीवर अनेक असंघटित कामगारांना अवलंबून रहावे लागते. पूर्वी विधवा व अज्ञान मुले यांनाही या एकत्रित कुटुंबव्यवस्थेचा फायदा मिळत असे. आता विभक्त कुटुंबामध्ये

नवरा मेला व त्याला पेन्शन नसेल तर विधवा अगदी उघड्यावर पडते. विधवेचा एकत्र कुटुंबामध्ये छळ होई, कष्ट पडत. पण आजच्या विभक्त पद्धतीत तिला रस्त्यावर जाण्याची वेळ येते. परकीय मदतीवर अवलंबून रहाणाऱ्या मागास भांडवलशाहीलाही या एकत्र कुटुंबाचा फायदा घेता येतो. शहरामध्ये पुरुष कामगार एकटा रहातो, व बायकोला गावी कुटुंबात ठेवू शकतो. एकत्र कुटुंबाची ती जबाबदारी असल्याने त्यामध्ये अनैसर्गिक असे काही त्याला वाटत नाही. तो संघटनेमार्फत घराची मागणी करायला चटकन पुढे येत नाही. तीच गोष्ट गर्भवती कामगार बाईची. प्रसुती-काळात आईची किंवा सासूची मदत मिळते, तसेच मुलांना सांभाळ करायला आई किंवा सासू तयार असतात. त्यामुळे तीही प्रसूतीसाठी खर्चाची व नंतर पाळणाघरांची मागणी करायला पुढे येत नाही. अशा तऱ्हेने वेगाने होणाऱ्या औद्योगिकरणाच्या प्रक्रियेमुळे अविभक्त कुटुंबपद्धतीचे विघटन जलद झाले असते. प्रत्येकाला काम मिळून स्वावलंबनाची प्रक्रिया वाढली असती, व कुटुंबव्यवस्थेचे सुरक्षित छप्पर उडून जाऊन एकाकीपणाचे भय निर्माण होऊन कामगारांची संघटित होऊन प्रतिकार करण्याची क्रियाही वाढली असती. अमेरिकेत किंवा इतर पाश्चात्य मक्तेदारी भांडवलशाही समाजांमध्ये अशा तऱ्हेने कुटुंबाचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. वरवर पुरुषप्रधानता नष्ट झाल्यासारखी दिसते. पण ती कुटुंबातून नाहीशी होऊन संबंध अर्थव्यवस्थेच्या केंद्रभागी केंद्रित झाली आहे. त्याचा अभ्यास पुढच्या लेखात आपण करणार आहोत. आज भारतामध्ये मात्र कौटुंबिक जिव्हाळा, प्रेम यांचे उदात्तीकरण करून कौटुंबिक पाश हे धक्काशोषक म्हणून वापरण्याचे प्रयत्न चालू आहेत. आणि त्यायोगे स्त्रीने नोकरी केल्यास मुलांवर संस्कार कोण करणार, घराची काळजी कोण घेणार असे प्रश्न उभे करून स्त्रियांच्या मनातील स्वातंत्र्याच्या ऊर्मी उखडून टाकण्याचे प्रयत्न कल्पना-प्रणालीवरील पातळीवर सुरू आहेत. त्याचे जोडीला खऱ्या अर्थाने वैचारिक मतभेदाचे वातावरण तयार होऊन लोकशाही अधिक सुदृढ व भांडवलशाहीला अनुकूल होऊ नये म्हणून लोकांच्या मनावरील 'अधिकार शक्तीचे' दडपण कायम ठेवण्याचे कामही ही पुरुषप्रधान अविभक्त कुटुंबपद्धती छुपेपणाने करत रहाते. पाश्चात्य देशांमध्ये आज ज्या मानाने विद्यार्थ्यांच्या मनातील असंतोष पेट घेत असतो, त्या मानाने आमच्या येथे घेत नाही. कारण त्यांना आज्ञाधारकपणाची सवय असते.

अविभक्तपणाची प्रेरणा व मध्यमवर्ग

मध्यमवर्गीय सुशिक्षित कुटुंबातून मात्र व्यक्तिवादाची जाणीव, नव्या शिक्षणपद्धती, मुलांना वाढविण्याच्या नव्या शास्त्रीय पद्धती यांचे भान येत चालले आहे. आर्थिक सुरक्षिततेपेक्षा मानसिक कुचंबणा त्यांना अधिक महत्त्वाची वाटते. पैशाचे बऱ्यापैकी स्वास्थ्य व शिक्षणामुळे दूरवर निर्माण झालेल्या नोकरीच्या शक्यता यामुळे या वर्गाची

हालचाल वाढलेली आहे. तसेच नव्या ज्ञानामुळे आपण वडिलधाऱ्या मंडळींपेक्षा सांस्कृतिक दृष्ट्या वरचढ असल्याचा अहंकार जोपासल्यामुळे विभक्त कुटुंबात रहाण्याची प्रेरणा यांना मिळते. मात्र असा वर्ग थोडा आहे. यांच्या जोडीला शेत-मजूर वर्ग बसू शकेल. त्याचे पोट हातावर असल्याने व जीवनावद्दल कमीत कमी अपेक्षा असल्याने बिऱ्हाड पाठीवर बांधून, हा काम निघेल त्या दिशेने जायला तयार असतो.

याउलट श्रीमंत शेतकरी जमिनीचा लांबलचक पट्टा एकत्र रहावा, भांडवली पद्धतीने शेती करता यावी म्हणून अविभक्त कुटुंबपद्धतीत रहायला तयार असतो. कमाल जमीन मर्यादा कायद्यामुळे तो कागदावर अनेकांच्या नावे जमीन करून देतो. मध्यम शेतकऱ्याला घरातील मनुष्यबळाची आवश्यकता जास्त असते. जमिनीचे तुकडे करण्यामुळे तोटा होणार असतो. म्हणून तो अविभक्त कुटुंबपद्धत टिकवून धरतो. कामगारांचा काही विभाग आर्थिक सुरक्षिततेसाठी या कुटुंबपद्धतीला चिकटून रहातो. आणि याच बरोबर भांडवलदारांनाही ही अविभक्त कुटुंबपद्धती आवडत असते. उदा. मारवाडी जमात पहा. 'हिंदू अविभक्त कुटुंब' कायद्यामुळे वारसा हक्काने चालत आलेल्या संपत्तीचा कमी दर भरावा लागतो. त्यामुळे कागदावर तरी त्यांची अविभक्त पद्धती असते. तसेच संपत्ती एकत्र राहून मोठे भांडवल वापरता येते, कौटुंबिक नावाचा फायदा मिळून बाजारात पत वाढते. कर्ज पटकन मिळू शकते. तोटा होणारी कंपनी फायदा होणाऱ्या कंपनीकडे बोट दाखवू शकते. या सर्व आर्थिक फायद्यांसाठी कुटुंबातील सभासद एकमेकांजवळ गुण्यागोविंदाने नांदावेत, कौटुंबिक पाश तयार व्हावेत म्हणून धार्मिक सणवार मोठ्या उत्साहाने केले जातात. एकीकडे वेगवेगळ्या चुली करून रोजच्या व्यवहारात स्वातंत्र्य दिले जाते, पण महत्त्वाचे आर्थिक निर्णय घेण्यासाठी किंवा कुटुंबाच्या इज्जतीला धोका उत्पन्न होईल अशा प्रसंगी व्हेटो वापरण्यासाठी 'अधिकारी पदाची' व्यक्ती हजर असते, व पुरुषप्रधानता काळजीपूर्वक जोपासली जाते. एखादी सुमती मोरारजी अधिकार गाजविते पण केवळ अपवाद म्हणून. धाक, भीती व संपत्तीचे आमिष यावर कुटुंबीय सभासद एकत्र गुंफून ठेवले जातात.

कुटुंबाचे कार्य - मानसिक जडणघडण

समाजात रहाण्यासाठी आवश्यक ते सर्व गुण–अवगुण या सर्वांचा मिलाफ होऊन समाजातील व्यक्ती आपापले आयुष्य जगण्यासाठी तयार होते. व्यक्तीचे आयुष्याला सामोरे जाणे नकळत होत असते. याचा अर्थ असा नव्हे की व्यक्ती एकदाच घडते आणि पुढे तिची घडण्याची प्रक्रिया थांबते. सामाजिक व्यवहारात विशिष्ट पद्धतीने भाग घेणे, विशिष्ट घटनांना विशिष्ट प्रतिसाद देणे याचे बरेचसे प्रशिक्षण व्यक्तीला बालवयात मिळते. अर्थात आयुष्याचाही तिच्यावर परिणाम होत जातो. तिची व्यक्तिवैशिष्ट्ये, तिचे विशिष्ट प्रतिसाद यांच्यातही फरक पडत असतोच. मात्र एक गोष्ट नक्की. बालवयातच कुटुंबजीवनामध्ये मुख्यत्वे करून व्यक्तिवैशिष्ट्यांची रचना (कॅरॅक्टर स्ट्रक्चर) बांधली जात असते. कुटुंब ही समाजाची मानसशास्त्रीय प्रयोगशाळा असते. प्रत्येक व्यक्तीच्या शरीरातील जीवशास्त्रीय वैशिष्ट्ये व व्यक्तीच्या मनावर होणारे संस्कार या दोन्हीचा संगम होऊन एकेक व्यक्तिरेखा घडत जाते. हे संस्कार अदृश्यपणे पण सातत्याने होत असतात. त्यांचे अस्तित्व आपल्याला जाणवतच नाही. आणि म्हणूनच आपण पुष्कळदा व्यक्तींना सहजपणे दोष देऊन टाकतो. उदा० काही माणसे क्रूर असतात; काही दुष्ट असतात. काही भित्री, काही शूर. आणि आपल्याला वाटत रहाते की, हे सगळे जन्मजात गुण आहेत. त्यामध्ये माणसाचा हात किती आहे, म्हणजेच संस्कृतीचा, संस्कारांचा, माणसाने निर्माण केलेल्या रूढींचा, सामाजिक संस्थांचा याची आपल्याला जाणीवही नसते. आपण सर्व वैशिष्ट्यांचे कारण 'हे नैसर्गिक आहे' असे देऊन मोकळे होतो. ही समजूत चुकीची आहे हे मानसशास्त्रज्ञांनी सिद्ध केलेले आहे. जीवशास्त्रीय वैशिष्ट्ये ही कमी महत्त्वाची आहेत. प्राणी व मानव यांतील हाच महत्त्वाचा फरक आहे. प्राणी जगतातील सर्व जिवांची 'उपजत प्रेरणांची' बंदिस्त चौकट तयार असते. त्यांच्यातही स्वभाववैशिष्ट्ये असतात. पण त्यांचा पल्ला मर्यादित असतो. एखादा वाघ अधिक आक्रमक असतो. नरभक्षक होतो त्याला परिस्थिती कारणीभूत होते. पण मुख्यत्वेकरून या प्राण्यांची प्रेरणांच्या पूर्तीची पद्धत व निसर्गाशी जमवून घेण्याची रीत ही जातिविशिष्ट जीवनपद्धत म्हणून निश्चित झालेली असते. एकाच जातीच्या प्राण्यांमध्ये प्रतिक्रियांचा सारखेपणा ठळकपणे अनुभवाला येतो.

कोणतीही मानवी व्यक्ती मात्र अशा पूर्वनिश्चित नैसर्गिक प्रतिक्रियांच्या आंतरिक व्यवस्थेसह सज्ज होऊन जन्माला आलेली नसते. मानवाला स्वतःची जीवनपद्धती

३०५३
दा. क. २४४८४
शाखा (स्थळ प्रत)

घडवावी लागते. आणि म्हणूनच ती जीवनपद्धती गरजेप्रमाणे बदलत जाते. वाघ दहा हजार वर्षे वाघच रहातो. वाघाची जात त्याच त्याच वैशिष्ट्यांनिशी पिढ्या न् पिढ्या जगत रहाते. मानवाच्या सहज-प्रवृत्ती या बंदिस्त नसून 'खुल्या' असतात, मुक्त-संचारी असतात. या प्रवृत्तींची प्रेरक शक्ती स्वतःचे अस्तित्व टिकवणे हीच असते. मात्र त्या आपल्या पूर्तीसाठी आखीव, पूर्वनिश्चित मार्गांना बांधलेल्या नसतात. नैसर्गिक प्रेरणांच्या बाबतीत मानवाची व इतर प्राण्यांची तुलना पुष्कळदा केली जाते. प्राण्यांच्या समूहाला म्होरक्या लागतो तसाच माणसांच्या समाजालाही कोणी-तरी मेंढपाळ, कोणीतरी सामर्थ्यवान, कायदा व सुव्यवस्था राखणारा शासक लागतो. असा निसर्गनियम सहज सिद्ध केला जातो किंवा प्राण्यांच्या मध्ये मादीकडे पिलांना सांभाळण्याची व त्यांचे संगोपन करण्याची नैसर्गिक श्रमविभागणी आहे तशीच माणसांमध्येही स्त्री व पुरुष यांच्यामधील श्रमविभागणी अपरिहार्य आहे, अशी वरवरची साम्ये दाखविण्याचा प्रयत्न होतो. लैंगिक आकर्षण वा संबंध यांच्याबाबत तर मुक्त शरीरसंबंधांचे पुरस्कर्ते प्राण्यांचे उदाहरण नेहेमीच पुढे करतात. तेही प्राणी व मानव यांच्यातील या महत्त्वाच्या शास्त्रीय व भौतिक फरकाची नोंद घेत नाहीत.

याचबरोबर आणखी एक महत्त्वाची नोंद आत्यंतिक व्यक्तिवाद्यांनी घेण्याजोगी आहे की मानवाला अगदी एकट्याने राहून या निसर्गरचनेमध्ये आपले अस्तित्व टिकविणे अशक्य आहे. एवढेच नव्हे तर मानव समूहातील अलगअलग व्यक्ति-मात्रात अशा निसर्गदत्त जातीविशेषांचा अंगभूत अभाव असल्याने मानवांना आपले जातीवैशिष्ट्य सामूहिक जीवनातच घडवावे लागते. निसर्गाने ठेवलेली अपूर्णता मानव-प्राणी समाजनिर्मिती करून पूर्ण करत असतो. समाजसापेक्षता ही मानवप्राण्याच्या जीवशास्त्रीय दौर्बल्याचा मूर्त आविष्कार आहे. समाजजीवनाची घडण दोन पातळ्यां-वर एकाच वेळी होते. उदरनिर्वाहाची साधने संपादन करण्यासाठी व वंशसातत्य कायम राखण्यासाठी मनुष्य वस्तुनिष्ठ सामाजिक संबंध निर्माण करतो. त्याचवेळी सुसंगत अशी मानसिक पातळीवरही समाजाची घडण होत असते. वस्तुनिष्ठ सामाजिक संबंधांचे प्रतिबिंब मनामध्ये, कल्पनांमध्ये उमटून एक तर्कशुद्ध व्यवस्था लावण्याचा प्रयत्न होतो.

या सर्व पार्श्वभूमीवर एक लक्षात येईल की मानवाला स्वातंत्र्य हे नेहमी सामाजिक चौकटीतच उपभोगता येते. समाजाचा आर्थिक पाया हवा, उत्पादनव्यवस्था हवी, भौतिक वस्तूंचे सुख हवे, पण सामाजिक बंधने नकोत असे म्हणणे म्हणजे शास्त्रीय दृष्टिकोनाचा अभाव दाखविणे. फक्त समाजाच्या विकासाबरोबर, भौतिक उत्पादनाच्या विकासाबरोबर सामाजिक बंधनांची नवी, अधिक प्रगत, अधिक सुसंगत व्यवस्था यावी एवढ्यासाठी माणसाला प्रयत्न करता येतात.

मग असा प्रश्न निर्माण होऊ शकतो की काल, स्थल, संस्कृती यांच्या अतीत असा काही सर्वसाधारण मनुष्यस्वभाव तुम्हाला वर्णन करता येतो का? माणूस कसा असतो? प्रेमळ असतो, खुनशी असतो, द्वेष करणारा असतो की त्यागी असतो? याचे उत्तर देता येत नाही. मानवाचा विचार ऐतिहासिक विशिष्ट सामाजिक अवस्थेच्या संदर्भातच करता येतो. अगदी प्राथमिक टोळी जीवनात माणसाला माणूस खात असे. ती त्या काळाची गरज होती. आज माणसासाठी माणूस जीव द्यायला तयार होतो, मूत्रपिंड देतो. व्यक्ती-व्यक्तीचा विचार करत गेलो तर इतकी विविधता आणि वैचित्र्य आढळते की मानवजातीचा विशिष्ट स्वभाव असा लघुत्तम साधारण विभाज्य काढता येईल की नाही असा प्रश्न पडतो. 'मानव हा विवेकशील प्राणी आहे' ही माणसाची व्याख्याही अपुरी ठरते. कारण ही तर्कपद्धतीही वेगवेगळ्या काळी वेगवेगळ्या नियमांप्रमाणे वापरली जाते. म्हणूनच मार्क्सने माणसाची केलेली व्याख्या ही शास्त्रीय वाटते. मनुष्य स्वभाव हा आकाशातून पडत नाही. पण त्या स्वभावाची सर्व सामर्थ्ये त्याच्यामध्ये वसत असतात. एवढेच नव्हे तर नवी सामर्थ्ये निर्माण होत जातात. तो एक कच्चा माल असतो. तो आपोआप बदलत नाही. तरीसुद्धा ऐतिहासिक प्रक्रियेतून, सामाजिक व्यवहारातून तो बदलत असतो. विकसित होतो. तो इतिहास घडवतो व त्याच प्रक्रियेत स्वतः घडत जातो. त्याच्यातील गर्भित क्षमतांचा विकास होत जातो. त्यातूनच त्याची स्वभाववैशिष्ट्ये तयार होतात. हिंस्रपणाकडून तो अधिकाधिक प्रेमळपणाकडे जात रहातो. त्याच्या क्षमतांवर संस्कार होत असतात. भौतिक परिस्थितीचा विकास केल्याने हिंस्रपणाची गरज कमी कमी होत जाते.

व्यक्तिमत्त्वावर सामाजिक अस्तित्वाचा परिणाम होतो हे आपण बघितले. व्यक्तिमत्त्व म्हणजे काय? माणूस स्वतःचे अस्तित्व टिकविण्याची धडपड करीत असता विशिष्ट पद्धतीने बाह्य जगाशी नाते जोडायचा प्रयत्न करीत असतो. (१) भौतिक पातळीवर स्वतःच्या सुखासाठी वस्तू निर्माण करणे, उपभोगणे, (२) त्याचवेळी इतर लोकांशी स्वतःचे संबंध प्रस्थापित करणे; थोडक्यात भौतिक जगात एकरूप होणे अशा या दोन मुख्य प्रक्रिया आहेत. या प्रक्रियेमध्ये माणूस एका विशिष्ट पद्धतीने आपली शक्ती वापरत असतो. या विशिष्ट पद्धतीला, प्रेरक शक्तींच्या रचनेला व्यक्तिमत्त्व घडण म्हणता येते. सगळ्यांत महत्त्वाची गोष्ट अशी की जरी प्रत्येक व्यक्ती वैशिष्ट्यपूर्ण असली तरीसुद्धा एखाद्या विशिष्ट समाजामध्ये एका विशिष्ट काळी काही सर्वसाधारण स्वभाववैशिष्ट्यांचा समुच्चय आढळून येतो. याचाच अर्थ प्रत्येक व्यक्तिमत्वामध्ये सामाजिक व्यक्तिमत्त्व अधिक स्वतःची खास वैशिष्ट्ये यांचा मिलाफ झालेला असतो. आपल्याला मुख्यतः या सामाजिक व्यक्तिमत्त्वाचा विचार करायचा आहे. कारण या सामाजिक व्यक्तिमत्त्वाच्याच आधारे समाजसंघटन मजबूतपणे उभे राहू शकते. 'समाजाचा आर्थिक पाया व तो पाया टिकून रहावा म्हणून

अनुकूल वातावरण निर्माण करणारे विचार, संकल्पना यांच्यामधील संक्रमक धावपट्टी, असे सामाजिक व्यक्तिमत्त्वाचे कार्य एरिक फ्रॉम वर्णन करतो. हे सामाजिक व्यक्तिमत्व घडण्याचे पहिले स्थान कुटुंब हे असते.

सामाजिक व्यक्तिमत्त्व

सामाजिक व्यक्तिमत्त्व ही सर्वसाधारण कल्पना असल्यामुळे त्या समाजातील एकेक व्यक्ती पूर्णपणे त्या कल्पनेमध्ये सामावली जाऊ शकणार नाही हे उघड आहे. त्याचप्रमाणे एखाद्या समाजाचे सामाजिक व्यक्तिमत्व म्हणताना त्या समाजातील विविध वर्गांची व्यक्तिमत्त्ववैशिष्ट्ये वेगवेगळी असणार हे गृहित धरलेले आहेच. त्याचप्रमाणे त्याच समाजाचा आर्थिक पाया बदलला की त्याच समाजातील सामाजिक व्यक्तिमत्त्वही बदलले जाईल. नव्या उत्पादनपद्धतीला अनुकूल व्यक्तिमत्त्व तयार करण्याची गरज निर्माण होईल. सामाजिक व्यक्तिमत्त्व या पैलूचे मुख्य कार्य काय ? एखाद्या सामाजिक पद्धतीबद्दल विचारही न करता आपोआप ती पद्धत नैसर्गिक किंवा अपरिहार्य म्हणून स्वीकारायला माणसाला भाग पाडणे. उदा. आज कामगार आपोआप कारखान्यातील मुकादमाचे हुकूम पाळायला तयार होतो. हा मला का हुकूम देणार हे तो विचारत नाही. 'ज्याच्या हाती भांडवल त्याच्या मालकीचा कारखाना. मालक म्हणेल, त्या वस्तूचे मी उत्पादन करणार. तो हुकूम देणार, मी ऐकणार.' ही शरण जाण्याची वृत्ती त्याच्या अंगात भिनलेली असते.

पाश्चात्य भांडवलशाही देशातील माणसाला आपण 'उद्योगी' म्हणतो. तेथील शिस्तबद्ध जीवनाने भारावून जातो. हे त्या समाजाचे व्यक्तिमत्त्व असते. आपल्याकडे सर्वसाधारण माणसांत हे दिसत नाही, याचे कारण हे व्यक्तिमत्त्व ज्या परिस्थितीत फुलले ती परिस्थिती आपल्याकडे नाही. औद्योगीकरण झपाट्याने झाले. कारखान्यातून काम करायला 'स्वतंत्र' कामगार हवा होता, ज्याला मंदीच्या दिवसांत काढता येईल, भरभराटी दिवसांत कामावर घेता येईल. ज्याला जास्त पैशाचे आमिष दाखवून (इन्सेन्टिव) जास्त काम करून घेता येईल ! यंत्रावर काम करताना माणसाला सावध रहावे लागते. भराभरा फिरणाऱ्या यंत्राबरोबर हालचालीची गती ठेवावी लागते. ती गती त्याच्या अंगात भिनते.

पूर्वी शेतीची कामे करणारा शेतकरी हंगामातील कामांची भाऊगर्दी उरकल्यावर बाकीचे महिने चावडीवर जाऊन तंबाखू चोळत बसायचा. ज्या पाटलाचे शेत कटाईने किंवा खंडाने कसायला घेतले असेल त्याच्या हुकूमाखाली रहायचा. पडेल ते काम करायचा. शेतात यंत्रे नव्हती की नवी बी बियाणे नव्हती. जास्त घाम गाळला म्हणून जास्त धान्य पिकेल अशी प्रेरणा नव्हती. निसर्गाच्या लहरीवर चालणारी कामे. शिस्तीची गरज काय ? वर्षानुवर्ष एकाच जमीनदाराकडे याचे घराणे काम करी.

सगळे इमान ह्या जमीनदाराला वाहिलेले असे. आई, वडील, भाऊ त्या जमीनदाराची थुंकी झेलताना त्याने पाहिलेले. लहानपणी स्वत्त्व धुगधुगत असताना जर त्याने जमीनदाराचा मुलगा शिव्या देतो म्हणून तक्रार केली तर लगेच आई त्यांचे तोंड दाबणार. 'ती मोठी माणसे, आपण त्यांच्या आधाराने रहायचे', असे म्हणून त्याला शिकवी, आणि आपोआप या मुलाचे मन जमीनदाराची हुकमत सहन करायला तयार होई. स्वतःचे गुण दाखवून येथे बढती मिळविण्याचा प्रश्न नव्हता. किंवा जास्त उद्योग करून त्याचा फायदा मिळणे शक्य नव्हते. घरात बनलेल्या प्रत्येक गोष्टीवर जमीनदाराचा हक्क असे. तो स्वतंत्र माणूस म्हणून जन्मालाच येऊ शकत नसे. तो कूळ म्हणून, गरीब शेतकरी किंवा शेतमजूर म्हणूनच जन्माला यायचा आणि साल्दार, वेठबिगार म्हणूनच त्यांचे अस्तित्व संपायचे. आज दिसणारा शिस्तबद्ध, चपळ, जास्त वेतनाच्या आशेने जास्त काम करणारा उद्योगी कामगार हे त्याचे व्यक्तिमत्त्व असणे शक्य नाही.

उतरंडीच्या समाजसंघटनेची गरज : अधिकारी

सरंजामी समाज घ्या किंवा आताचा भांडवलशाही समाज घ्या, दोन्ही ठिकाणी समाजाची रचना ही उतरंडीची, शिडीची असलेली आढळते. सरंजामी समाजात जन्मजात जाती ठरत असत, उच्चनीचता ठरत असे व श्रेष्ठ-कनिष्ठांची शिडी तयार असे. हे सगळे देवाच्या इच्छेनुसार चाललंय अशी श्रद्धा असे. या समाजाचे रहाटगाडगे चकमक न होता, न कुरकुरता बिनबोभाट चालावे म्हणून माणसांच्या मनांना त्या विशिष्ट पद्धतीने आकार देणे आवश्यक होते. या समाजाचे सामाजिक व्यक्तिमत्त्व हे 'अधिकारी' वृत्तीचे होते. याचा अर्थ उच्च थरावरील प्रतिष्ठित व्यक्तीला शरण जायचे, त्याचे आदेश पाळायचे आणि आपल्यापेक्षा कनिष्ठ थरावरील व्यक्तीवर अधिकार गाजवायचा. एकाच नफ्याच्या दोन बाजू मात्र दोन्ही समाजांत अधिकारी वृत्ती ही प्रमुख असली तरी तिचा तात्त्विक व भौतिक पाया बदललेला आहे. सरंजामी समाजात धर्माला महत्त्व होते. जातींना महत्त्व होते. उच्च थर हा धार्मिक व जातीच्या दर्जाप्रमाणे ठरे. ब्राह्मण श्रेष्ठ, मग क्षत्रिय, वैश्य, शूद्र. ब्राह्मणांला पुन्हा देवाला लीन व्हावे लागे. क्षत्रियाकडे राज्यसत्ता असली तरी तो ब्राह्मणाच्या सल्ल्याने व आशीर्वादाने राज्य करी. जन्मजात, दैववादी अशी व्यवस्था व पिळवणुकीवर आधारलेले 'अधिकारी सामाजिक व्यक्तिमत्व' पुराणे, कथा, दंतकथा, परीकथा सगळ्यांतून मुलाला हेच समजाविले जाई.

आजचा समाजही 'अधिकारी' व्यवस्थेवर आधारित आहे. पण हा अधिकार आहे पैशाचा. पैसा, मग तो लुटलेला असो; साठेबाजी, चोरटी आयात, किंवा कामगारांच्या श्रमांची चोरी या कोणत्याही मार्गाने आलेला असो; पैसेवाला माणूस

सर्वात श्रेष्ट. मुख्य म्हणजे पैसा मिळविणे हे जन्मजात मिळालेल्या जातीपेक्षा थोडे अधिक शक्य. त्यामुळे ही व्यवस्था काहीशी उदारमतवादी वाटते. पैसेवाला अस्पृश्य-सुद्धा पैसेवाल्या ब्राह्मणाच्या किंवा शहाण्णव कुळी मराठ्याच्या मांडीला मांडी लावून बसू शकतो. कामगाराची बायको हट्ट करणाऱ्या मुलाला सांगते, 'श्रीमंतांना काहीही शोभतं. तुला असले चोचले कसे परवडतील ?' हे उच्चनीच थर व त्यांचे आपापसांतील संबंध अधिक स्पष्टपणे दिसावेत व मनावर ठसावेत म्हणून प्रयत्नपूर्वक सांस्कृतिक बारकावे जपले जातात. वेष, भाषा, रूढी, शिक्षण. एकलव्याला धनुर्विद्या शिकविण्याचे द्रोणाला नाकारावे लागते. आज आय. ए. एस. परीक्षा इंग्रजी भाषेतूनच द्यावी लागते. एकलव्याला धनुर्विद्या शिकूनही गौरविले जाऊ शकत नाही. आजच्या समाजात इंग्रजी शिकलेल्या दलिताला आय. ए. एस. च्या परीक्षेला बसून सरकारी अधिकारी होता येते. मात्र त्याला त्यासाठी उच्चपदस्थाच्या 'मॅनर्स', रहाणीपद्धती शिकावी लागते. आपली संस्कृती विसरावी लागते. मातीचे महत्त्व कमी होत जाते, पण अधिकारपदाच्या जागांचे गुण अंगी बाणवावे लागतात; वरच्याचे पाय चाटण्यासाठी आणि खालच्याला लाथा मारून आपले श्रेष्टत्व सिद्ध करण्यासाठी.

अधिकारी व्यक्तिमत्वाची घडण

हे 'अधिकारी व्यक्तिमत्व' कुटुंबामध्ये घडविले जाते. 'अधिकारी प्रवृत्ती दमनशाहीचा जास्तीत जास्त उपयोग करते. अपयशासाठी जास्तीत जास्त शिक्षेची भीती, असहकार, वाळीत टाकणे, या तऱ्हेचे अतिरेकी प्रकार योजून दुसऱ्या माणसांना आपल्या मनाप्रमाणे वागायला लावण्याचे प्रयत्न होतात. बाहेर जर या गुणांची आवश्यकता असेल तर ते गुण कुटुंबातूनच जोपासले जातात. आपल्या कुटुंबातून लहान मुलाला नेहमी 'मी सांगतोय, म्हणून अभ्यास कर', किंवा 'मोठ्या माणसाचे ऐकावे.' याही शिकवणीमध्ये जन्मजात श्रेष्टपणाचा भाव असतो. थोडक्यात आहे त्या अधिकारपदाचा आंधळेपणाने स्वीकार करावा हे तत्त्व ! अधिकारी प्रवृत्ती ही एकाधिकारशाही असते. लोकशाहीच्या अगदी विरुद्ध येथे असमानता गृहितच धरलेली असते. कुटुंबामध्ये कर्ता पुरुष श्रेष्ट असतो. वय हा एक घटक. पैसा मिळविण्याची शक्ती हा दुसरा घटक. इतरांना आर्थिक दृष्ट्या अवलंबून रहावे लागणे हा तिसरा घटक. तोच मुलगा चाकरमानी होऊन पैसू मिळवू लागल्यानंतर बापावर आपले मत लादू शकतो. सरंजामशाहीमध्ये पैसा, शारीरिक बळ किंवा खास कौशल्य, कला ह्या निकषांवर एखादी व्यक्ती अधिकार ग्रहण करू शकत नसे. देवाने दिलेल्या जन्मसिद्ध व जातिसिद्ध अधिकाराच्या जागेवरील कोणाही व्यक्तीला ते अधिकार प्राप्त होत. भांडवलशाहीमध्ये पैसा या निकषावर अधिकार सिद्ध होऊ लागले आहेत. हळूहळू धाकटा भाऊ जर पैसेवाला असेल तर तो थोरल्या भावाला आदेश देऊ शकतो.

किडकिडा माणूस बलदंड माणसाला नोकरीवर ठेवू शकतो. दलित ब्राह्मणाला बूट पुसायला लावू शकतो. थोडक्यात, येथे माणसामाणसाचे संबंध भीतीवर आधारित असतात.

आजच्या कुटुंबाचे दृश्य वधू. वडील मुख्यतः अर्थार्जन करतात. आईने नोकरी केली तरी ती प्रथम गृहिणी व नंतर नोकरदार असते. तिला नोकरी बहुधा वडिलांपेक्षा कमी पगाराची असते. महत्वाचे निर्णय वडील घेतात. शिल्लक किती टाकायची, जागा कुठे घ्यायची, दिवाळीला खर्च किती करायचा, मुलाने काय शिक्षण घ्यायचे ? कारण त्यांच्या हातात आर्थिक नाड्या असतात. आज्ञाधारकपणा, स्पर्धात्मक प्रवृत्ती, समाजातील चालीरीतीविषयक आदर, त्याचबरोबर मालकी हक्क वृत्ती हे सर्व या अधिकारी वृत्तीचे पैलू आहेत. आज्ञाधारकपणामुळे अधिकारी व्यक्तीचे स्थान बळकट रहाते. कुटुंबातील गरीब नातेवाईकांशी तुलना करून कुटुंबातील कर्ता पुरुष स्वतःचे श्रेष्ठत्व सिद्ध करतो व स्पर्धात्मक प्रवृत्ती जोपासतो. सामाजिक चालीरीतींच्या दडपणामुळे मूळ प्रश्न विचारायला प्रवृत्त होऊ शकत नाही. एकाकी पडण्याची भीती वाटते. मालकी हक्क वृत्तीमुळे खाजगी मालमत्तेचे तत्त्व आपोआप मनावर ठसून खाजगी मालमत्तेवर आधारित व्यवस्था टिकवली पाहिजे याची गरज पटते. हे सर्व पैलू भांडवलशाहीला पूरकच आहेत; म्हणूनच 'अधिकारी प्रवृत्ती' हे व्यक्तिमत्त्वही पूरक आहे. घरात वडिलांचे अधिकार स्वीकारणारा माणूस बाहेर नोकरीच्या ठिकाणी बॉसचा, मालकाचा अधिकार स्वीकारायला सहजी तयार होतो. सरंजामशाहीमध्ये धर्मव्यवस्थेला व देवाला हाच माणूस सहज शरण जात असे. कारण स्वतःचे अस्तित्व आणि सुरक्षितता त्याने कोणातरी स्वतःच्या स्वत्वाबाहेर असणाऱ्या गोष्टीकडे सोपविली असे. आज धर्माचे स्थान कमी होत चालले आहे व शासनसंस्थेवर लोक आपला भार सोपवू लागले आहेत. शासनसंस्था शिस्त व कायदा पाळून संरक्षण देणार, सुख देणार. या शासनसंस्थेला माणूस सहज लीन होतो. घरी वडिलांचा आधार शोधणारा, त्यांच्या आज्ञेत रहाणारा, त्यांचे निर्विवाद श्रेष्ठत्व जन्मापासूनच मान्य करणारा माणूस घराबाहेरच्या समाजात कोणातरी सामर्थ्यवान व्यक्तीच्या, पुढाऱ्याच्या शोधात असतोच. थोडक्यात, सबंध समाजाची ती गरज तयार होते.

'अधिकारी व्यक्तिमत्व' व स्त्री

या पुरुषांना कुटुंबातील ही 'अधिकारी जागा' कशी मिळते ते पहाण्याजोगे ठरेल. आई वडिलांच्या आज्ञेत रहाते. उलट उत्तरे देत नाही. घाणेरडी, कमी प्रतीची कामे आई करते. बाबा महत्त्वाची, जास्त व्यावहारिक ज्ञान लागणारी कामे करतात. बाबांना पहिला चहाचा कप मिळतो. जेवताना बाबांना आधी वाढले जाते. मुलांनी जास्त हट्ट केला की आई म्हणते, "मी बाबांना सांगेन हं !" बाबांना 'अहो'

म्हटले जाते. बाबांच्या आवडीची भाजी केली जाते. या सर्वांतून बाबांच्या 'अधिकारी व्यक्तिमत्त्वाची' प्रतिमा लहान मुलाच्या मनात दृढ होत जाते.

मानसशास्त्रीय प्रक्रिया

वडिलांच्याबद्दलची भीती आणि भीतीपोटी आदर व आज्ञाधारकपणा कसा निर्माण होतो याची मानसिक प्रक्रिया समजून घेण्यासारखी आहे. फ्रॉइडच्या मते लहान मूल हे निसर्गतःच आईकडे ओढले जात असते. हे आकर्षण काही अंशी लैंगिक असते व आईवर पूर्ण ताबा मिळविण्याचा प्रयत्न करते. पण तिच्याबर वडिलांचा अधिकार असतो. यामुळे वडिलांबद्दल मत्सराची भावना तयार होते. पण त्याचवेळी वडिलांची भीती वाटत असते व मूल–मुलगा किंवा मुलगी–वडिलांना मान द्यायला शिकतात. या विचारसरणीत 'लैंगिक प्रेरणा' ही आयुष्यातील सर्वांत महत्त्वाची प्रेरणा मानली गेली आहे. आणि म्हणूनच लिंगाच्याच भीतीद्वारे अधिकार सिद्ध केला जातो. फ्रॉम मात्र त्याला नुसतेच 'भीती' हे नाव देतो. मरणाची भीती, उपाशी राहण्याची, बंधनात पडण्याची, अपयशी होण्याची. माणसाची सर्वांत प्राथमिक प्रेरणा असते 'अस्तित्व टिकविणे.' त्याच वेळी हे अस्तित्व टिकविण्याची माणसाची धडपड व प्राण्यांची धडपड यांच्यात फरक असतो. माणसाला एकटेपणाची, वगळले जाण्याची, शहामृगाप्रमाणे जमिनीत डोके खुपसून बसण्याची भीती असते. तो सतत स्वतःची निसर्गाबरोबर व भोवतालच्या माणसांबरोबर नाळ जुळवू बघत असतो. या भीतीच्या जोरावरच लहान मुलाचे मन घडविणे, हवा तसा आकार देणे शक्य असते. कुटुंबामध्ये 'अधिकारी' व्यक्तिमत्त्वाच्या जोरावर उघड उघड दमन करीत मुलाचे मन घडत जाते. मोठेपणी ते अधिकाधिक सूक्ष्म पद्धतीने होते.

लहान मूल शाळेत जायला लागले की हळूहळू अधिकाराच्या जागेवर इतर व्यक्ती येऊ लागतात. शाळेत शिक्षक, पुढे ऑफिसात बॉस, बाहेर पोलिसाच्या रूपाने शासनव्यवस्था या सर्वांवर मात करणारा ईश्वर असतोच. ईश्वर नसेल तर सध्याच्या भांडवलशाही युगामध्ये तो 'विशेषज्ञाला' शरण जातो. अमूक एक गोष्ट का करायची? विशेषज्ञ सांगतात म्हणून? अमूक औषध का द्यायचे? डॉक्टरने सांगितलंय म्हणून. अडाणी लोक डॉक्टरला सुई टोचायला सांगतात ते आपण बघतो. आणि श्रीमंत लोक बारीक बारीक दुखण्याचे निमित्त करून वातानुकूल रुग्णालयात वेळ काढतात तेही आपण पहात असतो. आजच्या युगाची, भांडवलशाहीची ही गरज आहे. उपयोग हा येथे परवलीचा शब्द आहे. त्यासाठी कोणा ना कोणा अधिकारी व्यक्तीचा हवाला देऊन माणसाला शरण येण्यासाठी भाग पाडणे आवश्यक आहे. आज सरंजामशाहीसारखी आंधळी, ईश्वरी शक्तीवर आधारित, जन्मजात अस्तित्त्वाने नियत होणारी 'अधिकारी समाजरचना नाही' हे कबूल. आज माणसाला थोडे अधिक स्वातंत्र्य

मिळाले आहे. पण पिळवणूक कायम आहे. आणि ही पिळवणूक काही माणसे श्रेष्ठ व काही कनिष्ठ या तत्त्वानेच कायम राखता येते, आज पैसा, विशेष ज्ञान यांच्यामुळे श्रेष्ठत्व ठरते. आणि वरवर दिसणारी लोकशाही ही गाभ्यामध्ये पोकळ ठरते. कुटुंबामध्येही हे कसे प्रतीतिबिंबीत होते, बघू.

भांडवली कुटुंब

भांडवलदार वर्गातील कुटुंब, मध्यमवर्गीय नोकरदार वर्गातील कुटुंब व कामगार वर्गातील कुटुंब, अशा प्रकारे विभागणी करू. या तीनही ठिकाणी वेगवेगळ्या तऱ्हेचे मानसिक वातावरण असते. मालमत्तादार वर्गामध्ये मुलांवर कर्त्या माणसाचा जास्त अधिकार असतो. कारण मुलांनाही ही समज देण्यात येते की त्या व्यक्तीच्या मनाप्रमाणे वागाल तरच त्याच्या संपत्तीचा वाटा मिळेल. अधिकारी व्यक्तीसुद्धा याच आमिषाच्या आधारावर मुलांना नाचवू शकते. ती व्यक्ती म्हणजे पैशाचे मूर्त स्वरूप. नोकरचाकर त्यांच्या सेवेस हजर असतात. त्याची बसण्याउठण्याची स्वतंत्र खोली. हांजी हांजी करणारी लाचार माणसे भोवती उभी. मुलांनाही मुलाखतीची वेळ घेऊन त्याच्याशी बोलावे लागते. श्रीमंत घर असल्याने समाजाचे सतत त्यांच्यावर लक्ष. वार्ताहर कान लावून बसलेले. इज्जत हा अतिशय महत्त्वाचा निकष. त्यामुळे प्रत्येक गोष्ट काटेकोरपणे पाळली गेली पाहिजे यावर कटाक्ष. बंधने अधिक आणि लोकशाहीला वाव कमीत कमी कारण आहे ही व्यवस्था टिकवून त्यांचे हितसंबंध सुरक्षित राहू शकतात. उद्या लोकशाही वातावरणात कोणा मुलांची न्यायवृत्ती जागृत झाली आणि त्याने नोकरांना चिथवायला सुरुवात केली, संपाच्या वेळी कामगारांची बाजू घेतली तर ? म्हणून कुटुंबातच असे 'अधिकारी वृत्ती' पोसणारे वातावरण तयार होणे आवश्यक. हीच व्यवस्था कशी योग्य आणि हीच व्यवस्था फक्त कशी शक्य आहे हे इतके व्यवस्थित मनात रुजते की त्याला समाजवाद, कष्टकऱ्यांची लोकशाही हे शब्दप्रयोग कळूच शकत नाहीत. काही माणसे श्रेष्ठ आणि काही कनिष्ठ ही त्याच्या मागची बैठक त्याने पक्की स्वीकारलेली असते. आणि म्हणूनच तोही पुढे स्वतः प्रभावी भांडवलदार होऊ शकतो.

मध्यमवर्गीय कुटुंब

या उलट मध्यमवर्गीय कुटुंबामध्ये कर्त्या पुरुषाकडे संपत्ती नसल्याने त्याची सत्ता त्या मानाने मुळातून कमी होते. त्याच्यावर आर्थिक दृष्ट्या सर्वजण आधारित असतातच. पण त्याचा दरारा बाह्य गोष्टींनी सिद्ध होत नाही. तो त्याला थोड्या फार प्रमाणात बौद्धिक कुवत किंवा इतर कौशल्ये यांच्या जोरावर सिद्ध करावा लागतो. बायको नोकरी करत असेल, पैसे मिळवत असेल तर थोड्याफार प्रमाणात तीही समानता

मागते. त्यामुळे घरात थोडेसे लोकशाही वातावरण तयार होते. मुले आपले म्हणणे पुढे मांडतात. जेवायला एकदम बसणे, आईने न वाढता सगळ्यांनी आपापल्या हाताने जेवण वाढून घेणे यातून बाबांबद्दलची भीड चेपली जाते. तरीसुद्धा अजूनही शिक्षण संपूर्णपणे मोफत नसल्याने कोणत्या प्रकारचे शिक्षण घ्यावे याचा निर्णय पुष्कळशा प्रमाणात वडिलांकडून होत नसला तरी समाजात प्रतिष्ठेचे स्थान मिळणारा व्यवसाय निवडणे असे हे अदृश्य दडपण व वडिलांची प्रत्यक्ष आर्थिक मदत यावर मुलीला शिकवणे, न शिकवणे सर्वस्वी वडिलांच्या इच्छेवर रहाते. तिचे शिक्षण ही वडिलांची जबाबदारी नसून तिचा विवाह ही अंतिम जबाबदारी असते. 'वडील मुलीचे सुखच बघतात' या आवरणाखाली वडील जात, कूळ, प्रतिष्ठा, पैसा हे सर्व बघत असतात. याचेच विकृत स्वरूप म्हणजे गरीब बाप आपली मुलगी जरठ विजवरास विकतो. याचाच अर्थ आजच्या मध्यमवर्गीय कुटुंबामध्ये बरेचसे लोकशाही वातावरण निर्माण झालेले दिसले तरी मंगळागौर, हरतालिका, सौभाग्यवतींनाच हळदी-कुंकू देणे या सारख्या रूढी थांबत नाहीत तोपर्यंत स्त्रीवर पुरुषाचे दडपण आहे हे सिद्ध होते. त्याचप्रमाणे मुलांना आपल्या आवडीप्रमाणे शिक्षण घेण्यासाठी संधी मिळत नाही, कॉलेजच्या फॉर्मवर वडिलांची सही लागते, ट्रीपला जाताना वडिलांची परवानगी लागते, शिस्तीच्या नावाखाली पॉकेटमनीचा हिशोब द्यावा लागतो, आंतरजातीय विवाहाला संमती घ्यावी लागते, मुलीला मुलाबरोबर हिंडल्याचे कळले असता जाब द्यावा लागतो, तोपर्यंत कुटुंबाचे लोकशाही स्वरूप हे आभास आहे आणि अजून 'अधिकारी रचना' कायम आहे असे निदान करता येते.

मध्यमवर्गीय कुटुंबात थोडेफार असणारे लोकशाही वातावरण मध्यमवर्गीय अस्तित्वाला पोषक कसे आहे ते बघता येते. मध्यमवर्गीय बाप पिढीजात मालमत्ता मुलांना देऊ शकत नाही. शेवटी मुलांना त्यांच्या पायावर उभे रहाणे आवश्यक असते. बॉसच्या हाताखाली विनम्रपणा जसा आवश्यक असतो तितकीच स्पर्धेमध्ये भाग घेऊन दुसऱ्याला ढकलून पुढे जाण्याची वृत्तीही आवश्यक असते. तरच या स्पर्धात्मक जगामध्ये नोकरी मिळवून अस्तित्व टिकवता येते. मालमत्तादार, भांडवलदार किंवा जमीनदार यांच्या मुलांमध्ये मग्रुरीची वृत्ती आवश्यक असते. त्यांनाही स्पर्धात्मक जगाला तोंड द्यावे लागते; पण ते वेगळ्या प्रकारे– शिडीच्या वरच्या पायरीवर. जरी तो नादान निघाला तरी त्याला मरण नसते. मध्यमवर्गीय माणसाला स्वतःच्या हिंमतीवरच जीवनाला सामोरे जायचे असते. म्हणूनच मध्यमवर्गामध्ये मुलाला स्वतःचे आयुष्य स्वतः घडवावे लागते, अशा प्रकारची शिकवण दिली जाते. पुढारीपण, स्वतःहून जबाबदारी घेण्याची प्रवृत्ती यांचे कौतुक होते. संपत्ती नसली तरी थोडेफार आर्थिक स्थैर्य असते. त्यामुळेच प्रयोगशीलतेलाही प्रमाणात उत्तेजन मिळते. मुलाच्या भावनांचा विचार होतो. पण त्याचप्रमाणे त्यांच्या प्रवृत्ती अदृश्यपणे वळ-

विण्याचाही प्रयत्न होतो. भावनांचा विचार एवढ्याचपुरता की कोणत्या मानसशास्त्रीय प्रयोगाने त्या प्रवृत्ती हव्या तशा वळविता येतील.

कामगार कुटुंब

या दोन वर्गांतील कुटुंबव्यवस्थेबरोबरच आपल्याला कामगार कुटुंबाचाही विचार करावा लागतो. कुटुंब ही अतिशय बांधीव व बंधनकारक संस्था खाजगी मालमत्तेवर आधारित समाजव्यवस्थेला आवश्यक असते हे आपण सर्वसाधारण सूत्र बघितले. खाजगी मालमत्तेचा आदर हे मूल्य समाजातील प्रत्येक व्यक्तीने आत्मसात करावे लागते. ज्याच्याकडे संपत्ती आहे, उत्पादनाच्या साधनांवर ज्याचा मालकी हक्क आहे त्याचा तर या मूल्यांमुळे सरळ सरळ फायदा होत असतो. त्याचे हितसंबंध जपले जात असतात. पण ज्यांच्याकडे हा मालकी हक्क नसतो व जे आपल्या श्रमांनी ही उत्पादनाची साधने निर्माण करतात त्यांच्याकडून हे तत्त्व म्हणून मानले जाणे आवश्यक असते. सामूहिक श्रम व खाजगी मालकी हक्क, यांच्यामध्ये जो अंतर्विरोध आहे तो लक्षात न येणे आवश्यक असते. मालकी हक्काचे समर्थन तात्विक पातळीवर आवश्यक असते. उदा० काही मूठभर लोकांकडे संपत्ती कशी आली ? याचे उत्तर असते, त्यांनी काटकसर केली, शिल्लक टाकली. त्यातून एक यंत्र खरेदी केले, कामगारांना काम दिले, त्यांच्या श्रमांचा योग्य मोबदला दिला व उरलेला पैसा त्याला नफा मिळाला. त्याने पैसा खर्च न करण्यात जो संयम दाखविला त्या संयमाचे हे फळ. कॉलेजमध्ये अर्थशास्त्र शिकविताना 'संयमाचा सिद्धान्त' शिकविला जातो. बाळपणी घरामध्ये वाढदिवसाला पिगी बँक दिली जाते. मुलाला खाऊचा पैसा साठवून, बघ किती पैसे जमले, आता त्याची मोटारगाडी आणू किंवा सायकल आणू, असे आमिष दाखविले जाते व बचतीने पैसा साठतो हे तत्त्व बिंबविले जाते. दैवाच्या कल्पनेचा, नशिबाचा आधार वारंवार घेतला जातो. देवावरची श्रद्धा आजच्या भारतीय कामगारांमध्ये अजूनही टिकून आहे, शिवाय काही लोकांना जन्मजात बुद्धी जास्त असते. हे गृहित तत्व असतेच. परिस्थिती बदलण्यासाठी देवाला पुन्हा पुन्हा अवतार घ्यावा लागतो. ही अवतारांची कल्पना 'अधिकारी' व्यक्तीची गरज पुन्हा पुन्हा ठसवत रहाते. 'फळाची अपेक्षा न ठेवता कर्तव्यकर्म करावे' ही गीतेची शिकवण अशीच परिस्थितीच्या स्थैर्यासाठी पूरक ठरते. कुटुंबातूनच या गोष्टी मनावर बिंबविल्या जातात. कंपनीतील अधिकारी, सरकारी अधिकारी घरी आले तर त्यांच्या स्वागतासाठी कोंबडी कापली जाते. पुढे दोन दिवस फाके पडले तरी कोणी कुरकूर करायची नाही असा रिवाज असतो. एरवी दारू पिऊन आईला मारणारा बाप जर या लोकांपुढे नमत असेल तर ते लोक बापापेक्षा श्रेष्ठ असले पाहिजेत ते पोराला कळून चुकते.

मध्यमवर्गीयांमध्ये वैचारिक, तर्कशुद्ध पद्धतीने किंवा सूक्ष्म पद्धतीने मन वळविण्याचे प्रयत्न अधिक होतात. कामगार कुटुंबामध्ये शिक्षणाचा अभाव व अस्तित्व टिकविण्याची गरज म्हणून बाह्य उपचार वापरून वळण दिले जाते. कामगार बाप मुलाला जास्त मारतो. एकीकडे त्याची आर्थिक ताकद कमी असल्यामुळे मुलाच्या सर्व गरजा तो पुरवू शकत नाही. मुलाला बरेच लवकर स्वतःच्या पायावर उभे रहाण्याची गरज भासते. त्यामुळे बक्षिसाचे प्रेम संपादन करून मन वळविणे, घडविणे शक्य नसते. मारणे, शिक्षा करणे हेच बाह्य उपाय वापरावे लागतात. एकीकडे उघडउघड बंधने तर दुसरीकडे कुटुंबातून बाहेर फेकले जाण्याची वेगाने होणारी प्रक्रिया असे हे मिश्र स्वरूप असते. जागा लहान त्यामुळे घरात राहून बसणे, बोलणे, लिहिणे, वाचणे या क्रियांसाठी एकत्र वेळ कमी मिळतो. वडिलांचा पगार अपुरा असल्याने स्वतंत्र होण्याची गरज तीव्र असते. पण त्याच बरोबर भोवतालच्या बकालपणाचे सावट, बेकारीचे सावट हेही वातावरण असतेच. त्यामुळे कामगार कुटुंबामध्ये कुटुंबापेक्षासुद्धा जमातीचे वर्चस्व अधिक टिकून रहाते. एका चाळीत रहाणाऱ्या लोकांमध्येही अधिक बंधुभाव तयार होतो. सुरक्षिततेसाठी त्यांच्याकडे पैसा नसतो, प्रतिष्ठा नसते. फक्त एकजूट हीच त्यांची शक्ती. एकीकडे परिस्थितीच्या रेट्यामुळे अधिकाधिक मागे जाणे, पड खाणे ही प्रवृत्ती वाढते. त्याचवेळी प्रतिकार करण्याची व सूड घेण्याची इच्छाही अधिकाधिक तीव्र होत जाते. तेंडुलकरांनी 'हिंसेवर' जे संशोधन सुरू केले आहे त्यातही त्यांचा निष्कर्ष हाच निघतो. 'परिस्थिती माणसाची कोंडी करते व अस्तित्व टिकविण्यासाठी आक्रमक होणे हे नैसर्गिक रीत्याच घडते.' आजही कामगार कुटुंबातील लोकांचे प्रतिसाद हे प्राथमिक भावनाविष्कार असतात. लैंगिक शिव्या किंवा चटकन हात उगारण्याची प्रवृत्तीही त्यांच्या आपापसातील संबंधांची दृश्य लक्षणे आहेत. हाच कामगार कारखान्यात, ऑफिसमध्ये सतत लाथा खात असतो आणि हुकूम झेलत असतो.

मध्यमवर्गीय कुटुंबापेक्षा कामगार कुटुंबामध्ये काही वेगळ्या प्रेरणा ठळकपणे दिसतात. त्याचबरोबर काही समान मूल्येही आढळतात. मात्र त्या मूल्यांचे अर्थ कसे बदलतात ते पाहू. प्रामाणिकपणा हे मूल्य बहुतेक समाजांमध्ये चालत आलेले आहे. हा प्रामाणिकपणा सत्ताधारी वर्गातील व्यक्ती कमीत कमी प्रमाणात पाळतात. आयकर व विक्रीकर चुकविणारे महाभाग अनेक असतात. एवढेच नव्हे तर हे कर कसे चुकवावेत याचा कायदेशीर सल्ला देणारे तज्ज्ञ राजरोस काम करतात. त्यांचा प्रामाणिकपणाचा अर्थ असतो स्वतःच्या हितसंबंधांशी प्रामाणिक. मध्यमवर्गीयाच्या बाबतीत प्रामाणिकपणाचा अर्थ असतो, सत्याची बाजू घेणारा. हे सत्य बहुधा पृष्ठभागीय सत्य असते. इतर मूल्यांचा आधार घेऊन जी समाज रचना उभी असते तिच्याच कसोट्यांवर हे सत्य तपासून बघावे अशी ही शिकवण असते. उदा. मध्यम-

वर्गीय कारकून स्वतः ज्या कंपनीत काम करतो, ती कंपनी कायदेशीर रीत्या कर चुकवीत असेल तर तो ती कंपनी प्रामाणिक असल्याचा निर्वाळा देईल. मध्यमवर्गीय कुटुंबातून मुलाला 'प्रामाणिक' रहाण्याची शिकवण दिली जाते. तेव्हा वस्तुनिष्ठपणे परिस्थिती पहावी, आपमतलबीपणाने वागू नये, सत्य तेच सांगावे असा त्याचा अर्थ असतो. कामगार कुटुंबातून याच 'प्रामाणिकपणा'चा अर्थ 'इमान राखणे' अशा तऱ्हेने केला जातो. येथे प्रामाणिकपणाची वरवरची वस्तुनिष्ठपणाची कसोटी काढली जाते, व 'विश्वासू' 'इमानी' व्यक्तिमत्व घडविण्याचा प्रयत्न होतो. याचे महत्त्वाचे कारण कामगाराकडून अंधश्रद्धेचीच अपेक्षा केली जाते. त्याची बुद्धी जितकी जास्तीत जास्त निरुपयोगी होईल व तो यंत्राचाच जास्तीत जास्त चांगला 'अवयव' होईल तितके मालकाचे, भांडवलदाराचे अधिक हित साधले जाईल. मध्यमवर्ग हा बुद्धीचे काम करत असल्याने त्याची बुद्धी इतकी नियंत्रित करून चालणार नाही. त्यातही आजकाल कारकून किंवा टायपिस्ट या प्रकारच्या नोकऱ्यांतून अधिकाधिक सामान्यीकरण होत आहे व त्यांच्या व कामगारवर्गाच्या मनाच्या घडणीमध्ये अधिक साम्य तयार होत आहे. त्याचाच परिणाम म्हणून कामगारवर्गाप्रमाणे याही वर्गाला सामूहिक कृतीची गरज भासत आहे. याचा परिणाम मध्यमवर्गीय कुटुंबव्यवस्थेवर होत आहे, तेथील भावजीवनावर होत आहे.

आतापर्यंत आपण 'सामाजिक व्यक्तिमत्त्व' हे समाजाच्या स्थैर्यासाठी कसे आवश्यक आहे हे पाहिले. त्याचप्रमाणे हे सामाजिक व्यक्तिमत्व घडविण्याची सुरुवात कुटुंबामध्ये कशी होते हेही पाहिले. प्रत्येक वर्गातील कुटुंबामधील शिकवण ही त्या त्या वर्गाचे समाजातील कार्य काय आहे यावर कशी अवलंबून असते याचाही आपण विचार केला. थोडक्यात कुटुंबाचे एक प्रमुख कार्य-माणसाचे मन घडविणे, समाजात जगायला लायक माणूस निर्माण करणे, आणि त्या योगे समाजसंघटनाला स्थैर्य देणे, संघटन मजबूत करणे, माणसाच्या अणूंना एकत्र बांधून ठेवण्यासाठी बिजागरी म्हणून काम करणे असे आहे हे आपण बघितले.

हे सर्व प्रत्यक्षात कसे पार पडते हे समजून घेण्यासाठी आपल्याला थोडी मानसशास्त्राची मदत घ्यावी लागते. मानसशास्त्र सांगते की मनाचे दोन थर असतात : एक बाह्य थर, ज्यावरील प्रतिक्रिया सहज दिसू शकते व त्याचे आकलन होऊ शकते, पण त्याचवेळी आणखी एक मनाचा थर अंधारात लपलेला असतो. भोवताली घडणाऱ्या घटनांचे गाळीव परिणाम त्यावर होत असतात आणि ते साठविले जातात. माणसाच्या प्रतिक्रियांचा आकार या थरातून नियंत्रित केला जातो. उदा. एखादा माणूस उदारपणा दाखवतो. त्याच्या कृतीमागची प्रेरणा कोणती ? मानवजातीवरील प्रेम हे उत्तर मनाच्या वरच्या थरावरचे उत्तर झाले. 'जाणिवे' च्या पातळीवरचे उत्तर झाले. मनाच्या अंधाराच्या भागामध्ये शिरायचा प्रयत्न केला तर काय दिसेल ?

जर माणूस लोकांच्या पिळवणुकीवर संपत्तीचा संचय करत असेल तर अपराधी भावनेने गरिबांना देणगी देऊन पापक्षालन करावे अशी प्रेरणा असेल. किंवा देणगीचा बुरखा ओढून घेऊन आपल्या इतर पिळवणुकीकडे समाजाचे लक्ष जाऊ नये असा त्याचा प्रयत्न असेल. किंवा हीच देणगी एखाद्या गरीब माणसाने स्वतःच्या पोटचा तुकडा काढून घेऊन दिली असेल तर म्हणता येईल की त्याचे मानवावर प्रेम आहे. त्याला दुःखाची सह-अनुभूती झाली म्हणून प्रेरित होऊन त्याने उदारता दाखविली. हे सांगायचे कारण असे की हा मनाचा अंधारमय भाग नेहमी अज्ञात असतो. पण हाच भाग कसा तयार होतो, हे बघणे आज अगत्याचे झाले आहे. त्याचा शोध घेऊनच आपल्याला 'क्रांतिकारक जाणिवा' कशा उत्पन्न करता येतील या प्रश्नाचा मानसशास्त्रीय दृष्टिकोणातून उलगडा होऊ शकेल.

या अंधारी भागाला आपण 'नेणीव' म्हणू. रोझा लक्झेंबर्ग म्हणते, 'नेणीव जाणिवेच्या आधी अस्तित्वात येते. मानव इतिहास घडविण्यात सहभागी होतो. पण मानवाचे व्यक्तिगत जाणीवपूर्वक तर्कशास्त्र तयार होण्यापूर्वीच ऐतिहासिक प्रक्रियेतील तर्कशास्त्रे, तर्कसुसंगतता तयार झालेली असते.' याचा अर्थ असा की माणसाला वाटत रहाते की माझा विचार प्रामाणिक आहे, वस्तुनिष्ठ आहे, जाणीवपूर्वक केलेला आहे, पण त्याचवेळी अनेक घटक जाणिवेच्या मागे काम करत असतात व बऱ्याच प्रमाणात माणूस त्या शक्तींच्या हातातील बाहुले असतो.

ही नेणीव कशी तयार होते? मार्क्स आणि फ्रॉईड दोघांच्याही मते नेणीव घडविण्यात 'दमन' (रिप्रेशन) प्रक्रियेचा भाग महत्त्वाचा असतो. फ्रॉईडच्या मताप्रमाणे शारीरिक व जीवशास्त्रीय प्रेरणांचे सामाजिक बंधनांमुळे दमन होते व त्या प्रेरणा अंधारात जाऊन काम करतात. दमन टाळता येणे शक्य आहे. त्यासाठी समाजरचना बदलण्याचे किंवा समाजसंघटन बदलण्याचे कारण नाही. भांडवलशाही उत्पादनव्यवस्था, कुटुंबसंस्था आहे तशीच कायम ठेवून केवळ नैसर्गिक प्रेरणांना मुक्त संचाराला परवानगी देऊन दमन टाळून 'नेणीव' बदलता येईल. मार्क्सच्या मते समाजसंघटन बदलून, उत्पादनव्यवस्था व त्यावर आधारित समाजातील माणसांचे परस्परसंबंध बदलूनच आज होणारे दमन टाळता येईल. कारण नव्या समाजसंघटनामध्ये दमनाची आवश्यकता रहाणार नाही, व माणसाच्या गर्भित क्षमता खऱ्या अर्थाने झळाळू शकतील. नेणीव व जाणीव बऱ्याच अंशाने एकाच पातळीवर येऊ शकतील.

आज पुष्कळसे अनुभव आपण जाणीवपूर्वक आत्मसात करू शकत नाही. अनुभवाचे 'भान' आपल्याला येऊ शकत नाही. कारण एक 'सामाजिक गाळणी' तयार झालेली असते. ही सामाजिक गाळणी कशी तयार होते ते पाहू. कोणते अनुभव, कोणत्या संवेदना चटकन जाणिवेत शिरतात? ज्या अस्तित्व टिकविण्यासाठी आव-

श्यक आहेत त्या. उदा. आगीच्याच अनुभवाची चटकन नोंद होऊन कृती होईल. हा मूर्त गोष्टीचा अनुभव झाला. एखादा अमूर्त अनुभव घेऊ. प्रसन्न पहाट, झुळझुळणारा वारा, लालट रंगाचा सूर्य. हा अनुभव ७ च्या भोंग्याकडे सगळे लक्ष ठेवून भराभरा ढेंगा टाकणारा कामगार घेऊ शकणार नाही. त्या अनुभवाच्या अभिव्यक्तीला त्याच्याकडे शब्दसुद्धा नसेल. भाषा ही एक अतिशय महत्त्वाची गाळणी आहे. भाषेमध्ये संबंध जीवनदृष्टी सामावलेली असते. येथे शब्दांचा खोटा वापर करणाऱ्या लोकांबद्दलचे हे विधान नाही. भाषेच्या जन्मासंबंधीचे हे विधान आहे. दया पवार जेव्हा म्हणतो, 'आम्हाला ज्ञानेश्वरी समजत नाही.' तेव्हा दयासारख्या मुलाला दलित घरच्या कुटुंबांमध्ये जे अनुभव येतात त्यांचा ज्ञानेश्वरीतील अनुभवाशी काही संदर्भ लागत नाही, नाते लागत नाही असे त्याला अभिप्रेत असते. पूर्वी लग्नपत्रिकेमध्ये असा मजकूर छापलेला असे, 'चिरंजीव अमुक याचा चि. सौ. कां. अमुक ठमुक हिच्याशी शरीरसंबंध करण्याचे योजिले आहे.' या विधानात शरीरसंबंध शब्दामध्ये संबंध सामाजिक दृष्टिकोन गोठविलेला होता. त्यावेळी प्रेममीलन, मैत्री, स्त्री-पुरुष समानता हे शब्द व त्यामागील अर्थ माहीत नव्हता. स्त्रीकडे पहाण्यासाठीचा दृष्टिकोन तरुण मुलाला या भाषेतून दिला जाई. त्याची नेणीव यातून तयार होई. समानतेचे भान आले तरी ती हातात सापडत नसे.

'सामाजिक गाळणी' तयार होण्यासाठी भाषेच्या बरोबरीने दुसरा महत्त्वाचा घटक आहे 'तर्कशास्त्र.' जीवन समजावून घेताना विविध अनुभवांतील दुवे साधण्यासाठी जे नियम लावले जातात त्या नियमांचे शास्त्र. प्रत्येक माणसाला आपली भाषा ही नैसर्गिक वाटते. उदा. एखाद्या व्यक्तीबद्दल प्रेम व द्वेष ह्या दोन्ही भावना एकत्र अस्तित्वात असू शकतात. हे विधान 'द्वंद्वात्मक' तर्कशास्त्र ज्यांना अवगत आहे त्यांना कळू शकेल. पण ज्यांना ॲरिस्टॉटलचे रूपवादी तर्कशास्त्रच फक्त माहीत आहे त्यांना हे विधान कळू शकणार नाही. त्यांच्या जाणिवेचा भाग होऊ शकणार नाही. तिसरा घटक 'सामाजिक गाळणी'मध्ये महत्त्वाचा ठरतो, तो सामाजिक रुढी किंवा 'सामाजिक दृष्ट्या अनुचित वागणूक.' समाजात अशा अनेक संकल्पना, भावना अयोग्य, धोकादायक ठरविल्या जातात की त्यामुळे त्या 'जाणिवेच्या' पातळीपर्यंत पोचूच शकत नाहीत व त्यामुळे 'नेणिवेच्या' रचनेपर्यंत जात नाहीत. उदा. श्रीमंत कुटुंबातून नोकरांनी जमिनीवर बसायचे, मालकाच्या समोर खुर्चीवर बसायचे नाही, एकत्र जेवायचे नाही या पद्धती इतक्या रूढ झालेल्या असतात की त्यात काही चूक आहे का हा प्रश्न बालवयात पडत नाही आणि प्रश्न पडला तरी घराच्या रीतीविरुद्ध वागण्याचे धैर्य होत नाही. तो ती स्वतःची इच्छा दमन करतो, किंवा आजचा ऑफिसात काम करणारा तरुण घ्या. त्याला काम करण्याचा कंटाळा येतो, रस वाटत नाही. त्याला स्वातंत्र्य नाही याची पुसट जाणीव होते. पण त्याला नक्की काय

होते याचे आकलन होत नाही. आपण सर्वसामान्य माणसासारखे वागले पाहिजे याची भीती वाटून तो आपल्या मनातील भावनांचे दमन करतो. हे भावनांचे दमन करण्याची गरज आमच्या समाजामध्ये अतिशय मोठी आहे. जितके अंतर्विरोध वाढत जातात–विसंगती वाढत जाते तितकी तेथील जाणीव दाबून टाकण्याची प्रक्रियाही वाढते. आणि 'सामाजिक नेणीव' तयार होऊ लागते. श्रीमंत माणसाची गाडी धक्का मारून गेली तरी सामान्य माणूस अंग चोरून बाजूला उभा रहातो. वडिलांनी आईला मारले तरी मुलगा पहात बसतो.

मग 'नेणीव' म्हणजे काय? नेणिवेचा आशय काय असतो? याबाबत सर्वसामान्य विधान करता येत नाही. आपल्याला एवढेच म्हणता येते की माणसाच्या सर्व प्रेरणा, इच्छा, वासना, जे जे काही माणसात असतं ते सर्व हा या मनाच्या अंधाराचा–नेणिवेचा आशय असतो. त्यातील कोणत्या इच्छा, वासना, प्रेरणा दडपल्या जातात हे त्या त्या समाजाच्या वर्गरचनेवर, संस्कृतीवर अवलंबून असते. त्या त्या समाजाच्या मर्यादा, त्या समाजाची ऐतिहासिक अवस्था यातून त्या समाजाची 'नेणीव' तयार होते. आणि 'नेणिवेला' आकार देण्याची प्रक्रिया कुटुंबापासूनच सुरू होते. याच प्रक्रियेतून उत्पादनसंबंधांची पुनर्निमिती होत रहाते. कल्पनाप्रणालीची पुनर्निमिती होत रहाते, व समाजसंघटन पुन्हा पुन्हा जन्म घेते.



औद्योगिक समाजाचा उदय आणि स्त्रीचे बदलते स्थान

मध्ययुगीन काळातील ही दडपलेली, त्यामुळे अडाणी राहिलेली, अंधश्रद्धांमुळे आंधळी, अधू मनाची स्त्री आपण बघितली आणि विशेष म्हणजे ही स्त्रीसुद्धा बदलली. आज आपल्याला दिसणारी स्त्री आणि अठराव्या शतकातील स्त्री यामध्ये जमीनअस्मानाचा फरक आहे. हिंदू धर्मासारखा व्यवस्थित चिरेबंदी धर्म, त्यालाही तडे गेले. हा बदल कशामुळे झाला ? आपल्याला असे आढळते की, येथील बदल हा जगभरच्या बदलाचे पडसाद म्हणून घडत होता. युरोपमध्ये सोळाव्या शतकाच्या अखेरपासून तांत्रिक शोध लागण्यास सुरुवात झाली व औद्योगिक क्रांतीचा उदय झाला. याच क्रांतीच्या बरोबरीने तेथे भांडवलशाही-लोकशाही क्रांतीची बीजे रुजली जात होती. पूर्वीच्या सरंजामी समाजात जमीनदार, कूळ व व्यापारी हे तीन प्रमुख वर्ग होते. या व्यापारीवर्गाकडे हळूहळू पैसा साठत होता. त्या पैशाच्या जोरावर मोठ्या प्रमाणावर वस्तूचे उत्पादन करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. तांत्रिक शोधामुळे मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणे शक्य होऊ लागले. त्याचबरोबर मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्याच्या गरजेतून नवे तांत्रिक शोध लागत गेले. यंत्र तयार होऊ लागली. यंत्रे चालविण्यासाठी शक्तीचा शोध लागला. वाफेतून मिळणारी शक्ती, कोळशाच्या खाणीतून मिळणारे इंधन, नवीन नवीन धातू यांची भर पडत गेली. उत्पादनशक्ती वाढल्या. या उत्पादकवर्गाला सरंजामशाही जाचक झाली व त्यांनी बंड केले. स्वातंत्र्य, समता, बंधुभाव या घोषणा घेऊन त्यांनी जमीनदारांच्या शेतावर राबणाऱ्या कुळाला आपल्याबरोबर घेतले आणि क्रांती केली. हाच वर्ग पुढे भांडवलदार वर्ग म्हणून तयार झाला. जमीनदार, सरदार, त्यांची आश्रित कुळे, कारागिर ही उतरंड कोसळून पडली.

औद्योगीकरणामुळे व भांडवलशाही क्रांतीमुळे दोन गोष्टी घडल्या (१) यंत्रामुळे वस्तूंच्या उत्पादनासाठी विशिष्ट कौशल्याची गरज नाहीशी झाली (२) उत्पादनाची हत्यारे स्वतःच्या मालकीची असली पाहिजेत, ही गरज उरली नाही. पूर्वी शेतावर कसणाऱ्या कुळाच्या मालकीचे बैल व नांगर असत. कारागिरांची हत्यारे त्यालाच विकत घ्यावी लागत. आता यंत्रावर काम करण्यासाठी नुसती श्रमशक्ती विकावी लागे. बाकी कोणत्याही साधनांची गरज नसे. स्त्रीकडे वारसाहक्क चालत येत नसल्यामुळे श्रम विकणे एवढेच तिच्या हाती असे. युरोपीय भांडवलदारांनी या वस्तुस्थितीचा चांगला फायदा करून घेतला. एका अर्थाने हा घटना चांगली होती. कारण आता

कारखान्यात काम करून स्त्रीला तिच्या कामाचा स्वतंत्र मोबदला मिळू शके. पूर्वी लोहाराची बायको भात्यावर काम करूनसुद्धा तिला स्वतंत्र मोबदला मिळत नसे; पण त्याचवरोबर भांडवलदारांनी स्त्रियांना कामावर ठेवून व स्वस्त दरामध्ये राबवून खूप नफा गोळा केला. इंग्लंडमध्ये भांडवलशाहीच्या सुरुवातीला स्त्रियांना १२-१२ तास, १४-१४ तास राबवून आणि पुरुषापेक्षा कमी मोबदला देऊन बराच नफा केला गेला. स्त्रीचे स्थान समाजामध्ये दुय्यम असल्याने स्त्रीला मिळणारे कमी वेतन तिने स्वतः व तिच्या नवऱ्याने सुद्धा स्वीकारले होते. औद्योगिक क्रांतीमुळे स्त्रियांना नोकऱ्या उपलब्ध होत गेल्या व आर्थिक स्वातंत्र्याची शक्यता हळूहळू वाढत गेली. त्यातूनच युरोपातील स्त्रीच्या मुक्तीच्या आकांक्षा जागृत झाल्या.

भारतातील आर्थिक बदल

आपल्याकडे मात्र अर्थव्यवथेतील बदल ब्रिटिश साम्राज्यशाहीतून आला. इंग्लंड-मधील औद्योगीकरणाची गती वाढल्यामुळे बाजारपेठा शोधण्यासाठी इंग्रज बाहेर पडले. कच्चा माल घेणे व पक्का माल विकणे हे त्यांचे उद्दिष्ट. त्यांनी भारतावर अंमल बसवला आणि त्यांच्या संस्कृतीचा प्रभाव येथील समाजावर पडू लागला. परिणाम असा झाला की, त्यांनी त्यांच्या मालाला येथे बाजारपेठ मिळविली. पण भारतात मात्र औद्योगीकरण वाढू नये यासाठी प्रयत्न केले. त्यामुळे येथील उद्योगधंद्याची वाढ मंद राहिली. भांडवलशाही क्रांतीमुळे जुनी सरंजामी व्यवस्था युरोपात समूळ नष्ट होऊन आधुनिक उद्योग, लोकशाही, विज्ञाननिष्ठा, व्यक्तिस्वातंत्र्य यांचे प्रभुत्व स्थापन झाले; पण भारतात मात्र ही प्रक्रिया अर्धवट व विकृत झाली. इंग्लंडमध्ये औद्योगीकरणामुळे नोकऱ्या मिळणे इ. फायदे ज्या प्रमाणात स्त्रियांना मिळाले त्या प्रमाणात भारतात मिळू शकले नाहीत. तरीसुद्धा मुंबईत जेव्हा प्रथम कापडगिरण्या निघाल्या तेव्हा स्त्रिया कामगार म्हणून भरती झाल्या. खेड्यातील भूमिहीन शेतकरी शहरात येऊन राहू लागला व नव्या भांडवलदारी उत्पादनव्यवस्थेत कामगार म्हणून आपले श्रम विकू लागला. स्त्रियांनाही गिरण्या, खाणी, इमारतीचे बांधकाम या क्षेत्रांमध्ये कामे मिळू लागली.

या सर्व स्थित्यंतराचा येथील समाजजीवनावर परिणाम होऊ लागला. पेशवाईचा अस्त होऊन शनिवारवाड्यावर इंग्रजी बावटा फडकू लागला आणि महाराष्ट्रातील समाजजीवन ढवळून निघाले. इंग्रजांनी आपल्याबरोबर यंत्रे व कारखाने आणले नाहीत; पण शिक्षण आणले व रेल्वे आणली. त्यामुळे दळणवळण वाढले आणि आधुनिक शिक्षणामुळे नवी समाजव्यवस्था, नवी मूल्ये व कल्पना याचा प्रसार होऊ लागला. सरकारी शाळाकॉलेजातून तयार झालेला उच्चवर्णीय बुद्धिजीवी नोकरदार-वर्ग शहरांमध्ये तयार झाला. अज्ञानी, रूढिग्रस्त, पारंपरिक समाजव्यवस्थेशी जुळवून

घेताना त्यांची कुचंबणा होऊ लागली. स्वतःच्या पत्नीला खऱ्या अर्थाने सहधर्मचारिणी बनविल्याशिवाय आपली सामाजिक प्रगती होणे शक्य नाही, हे त्यांच्या लक्षात येऊ लागले. बालविवाह, पुनर्विवाह इ. सुधारणांसाठी या ब्राह्मण सुशिक्षित वर्गाने प्रयत्न सुरू केले.

सामाजिक सुधारणेला थोडीफार चालना इंग्रज सरकारने दिली. राजा राममोहनराय यांनी सतीच्या प्रथेविरुद्ध लोकमत जागृत केले. १८२९ साली प्रथम सतीबंदी–कायदा करण्यात आला. धर्मामध्ये ढवळाढवळ करण्याची तोपर्यंत सरकारची तयारी होती; परंतु १९५७ च्या उठावानंतर इंग्रज सरकारने येथील धार्मिक व सामाजिक बाबींमध्ये हस्तक्षेप न करण्याचे धोरणे स्वीकारले; पण त्यानंतरही 'संमतिवयाचा कायदा' आला व बालविवाह थांबविण्याचा प्रयत्न केला गेला.

महाराष्ट्रातील दलित वर्गाची दुःखे चव्हाट्यावर आणण्याचे काम ख्रिस्ती धर्मोपदेशकांनी केले. जुन्या रूढींची व्यासपीठावरून जाहीर चर्चा केली. मुलींच्या शाळा काढल्या. मात्र धर्मांतराच्या भीतीने उच्चवर्गीयांनी आपल्या मुलीबाळींना या शाळांत पाठविले नाही.

काही सुशिक्षित पुरुषांनी मुलींच्या शिक्षणाची गरज ओळखून १८४८ साली मुंबईत प्रथम शाळा सुरू केली. स्टुडंटस् लिटररी ॲन्ड सायन्टिफिक सोसायटी हे त्या संस्थेचे नाव. पुण्यात ज्योतिबा फुले व त्यांच्या पत्नी सावित्रीबाई यांनी मुलींना शिक्षण देण्याचे काम सुरू केले. जातिव्यवस्था मोडायची असेल तर स्त्री व पुरुष यांच्यामध्ये समानता आणण्याची गरज आहे, हे त्यांनी ओळखले होते. जातीमधून निर्माण होणारे दास्य व स्त्रीचे दास्य हे एकाच समाजव्यवस्थेचा भाग आहे, हे त्यांनी ओळखले होते. आपल्या भाषेतूनही पुरुषी वर्चस्व कसे दिसते हे त्यांच्या लक्षात आले होते, म्हणूनच 'सर्व माणसे समान आहेत' असा वाक्प्रयोग करताना ते काळजीपूर्वक 'सर्व एकंदर स्त्री-पुरुष समान आहेत' असा वाक्प्रयोग करीत. फुल्यांनंतर महर्षी कर्वे यांनी महिला विद्यापीठ स्थापन करून स्त्रीशिक्षणाचे कार्य चालू ठेवले.

दुसरा महत्त्वाचा प्रश्न त्या वेळी घेतला गेला तो विधवा विवाहाचा. दादोबा पांडुरंग, लोकहितवादी, विष्णुशास्त्री बापट यांनी या प्रश्नाला चालना दिली. त्यांच्यावर बहिष्कार टाकण्यात आला; पण नव्या व्यापारी अर्थव्यवस्थेत हा बहिष्कार जाणवू शकला नाही. पुढे आगरकर व रानडे यांनी पाश्चिमात्य समाजशास्त्रांचे पद्धतशीर अध्ययन करून पूर्वीच्या समजुतींविरुद्ध मूलभूत प्रश्न विचारायला सुरुवात केली. स्त्रिया या जन्मतःच अबला आहेत, निसर्गानेच त्यांचे कार्यक्षेत्र चूल व मूल ठरविले आहे, या परंपरावादी सिद्धान्ताची रेवडी उडविली. स्त्री व पुरुष यांना निसर्गाने समान बुद्धी व मन दिले आहे, तेव्हा समाजानेही त्यांना समान अधिकार दिले पाहिजेत असे त्यांनी प्रतिपादन केले. मात्र या वेळी रूढीबंधनांनी जखडलेल्या उच्च-

वर्णीय स्त्रियांमध्ये स्वतःच्या हक्कांसाठी झगडा करण्याची ताकद नव्हती. त्यामुळे या पुरुषांना शेवटी सुधारणांसाठी पुरूषांच्याच दयाशीलतेला आवाहन करावे लागले. त्याच सुमारास रमाबाई रानडे यांनी सेवासदनसारखी संस्था काढून त्या वेळी विधवांच्या औद्योगिक शिक्षणाची सोय केली. मात्र केवळ उच्चवर्णीय स्त्रियांपुरतेच हे प्रयत्न मर्यादित राहिले व अशा तऱ्हेने स्त्रीजागृती येणे शक्य नाही, याचे दर्शनही झाले. पंडिता रमाबाई यांचे विधवा स्त्रियांना अस्मिता देण्याचे प्रयत्न व महर्षी कर्वे यांचे महिला विद्यापीठ ह्या घटना याच काळातील आहेत.

याच सुमारास जगात दोन महत्वाच्या घटना घडल्या. युरोपात पहिले महायुद्ध झाले. त्या वेळी पुरुष लढाईवर गेले असता त्यांच्या जागा भरून काढायला स्त्रिया पुढे आल्या व त्यांनी वरीच कर्तबगारी दाखविली. उद्योगधंदे, राज्ययंत्रणा, सर्व क्षेत्रांत त्यांनी भरीव कामगिरी केली. त्याचबरोबर रशियामध्ये समाजवादी क्रांती होऊन तेथे स्त्री व पुरुषांना समान हक्क घोषित केले गेले. या दोन्ही घटनांमुळे स्त्रियांचे कार्यक्षेत्र विस्तारले जाऊ शकते, याचा प्रत्यय आला. भारतामध्ये सुद्धा या कल्पनांचे वारे येऊन पोचले.

यानंतर येथे गांधीजींचे राजकारण सुरू झाले. त्यांनी ज्या प्रकारचे कार्यक्रम इंग्रज सरकारविरुद्ध लढण्यासाठी घेतले त्यामध्ये स्त्रियांना सहज भाग घेता येत होता. चरख्यावर सूत कातणे, दारूच्या दुकानांवर निरोधने करणे, सत्याग्रह करणे, यामधून उच्चवर्णीय स्त्रिया मोठ्या प्रमाणावर पुढे आल्या व राजकारणात भाग घेता घेता त्यांनी आपली अनेक परंपरागत बंधनेही फेकून दिली. मध्यमवर्गीय स्त्रीला या चळवळीने आत्मविश्वास दिला.

स्त्री घराबाहेर पडायला तयार झाली त्याला आणखीही काही कारणे घडत होती. नवे कारखाने, नवे उद्योग निघू लागल्यामुळे नव्या शहरी, दुसऱ्या जागी नोकऱ्यांची संधी मिळू लागली व मुख्य हादरा अविभक्त कुटुंबपद्धतीला बसला. शेती करण्यासाठी खूप माणसे लागत. एकत्र कुटुंब हा फायदा असे. आता शिकलेला मुलगा लांब जाऊ लागला. विभक्त कुटुंब करू लागला. नवरा-बायको व मुले यांचे सुटसुटीत कुटुंब तयार होऊ लागले. एकत्र कुटुंबात अनेक लोकांची मनधरणी करत, खस्ता खात राहणाऱ्या स्त्रीला हा नवा बदल बरा वाटू लागला. नव्या कुटुंबात एका नवऱ्याचेच मन राखायचे होते. एकत्र कुटुंबातून बाहेर पडल्यामुळे व्रतवैकल्ये, कुळाचार यातूनही ती बाहेर पडू शकली. औद्योगिक विकासामुळे पूर्वी घरी कराव्या लागणाऱ्या वस्तूपैकी पुष्कळ वस्तू बाजारात मिळू लागल्या. स्त्रीला घरातील कामापासून किंचित स्वातंत्र्य मिळू शकले. पुढे दुसऱ्या महायुद्धाच्या काळात भारतातील उद्योगधंद्याची वाढ झाली. त्याच सुमारास महागाई वाढली. मध्यमवर्गीय नोकरदार कुटुंबांना आर्थिक ताण पडू लागला व शिकलेल्या बायकांनी नोकऱ्या धरायला

सुरुवात केली. कारकून, शिक्षिका, परिचारिका या व्यवसायात स्त्रिया मोठ्या प्रमाणात गेल्या.

याच सुमारास अखिल भारतीय महिला परिषदेसारख्या संस्थांची स्थापना झाली. त्यांनी बालविवाह, घटस्फोट, वारसा हक्क, मतदानाचा हक्क यांसारख्या विषयांवर लोकमत जागृत करण्याचे काम केले. १९१९ साली स्त्रियांना मर्यादित प्रमाणात मतदानाचा हक्क मिळाला. स्वातंत्र्यानंतर तर अनेक कायदे पास झाले व कायदेशीर दृष्ट्या स्त्री-पुरुष समान झाले. घटस्फोटाचा हक्क मिळाला. वारसा हक्क मिळाला.

भारतातील स्त्रीच्या या प्रगतीला औद्योगीकरण जसे कारणीभूत आहे. त्याच्याच-बरोबर आणखी एक शास्त्रीय शोध अलीकडे अतिशय महत्त्वाचा ठरत आहे. संतति-नियमनाच्या साधनांचा शोध लागल्यामुळे मातृत्व ही नैसर्गिक देणगी किंवा आपत्ती न ठरता त्यावर स्त्रीला ताबा मिळविता येणे शक्य झाले आहे. विशेषतः प्राथमिक श्रमविभागणी ज्या तत्त्वावर झाली ते प्रजोत्पादनाचे कामच आज दुय्यम महत्त्वाचे ठरू लागले आहे. कुटुंबातील कामासाठी आज निरनिराळ्या सामाजिक संस्था निघू लागल्या आहेत. उदा. आजाऱ्यांची काळजी घेण्यासाठी रुग्णालये निघाली. मुलांच्या शिक्षणांसाठी शाळा निघाल्या. त्यामुळे कौटुंबिक जबाबदारीसाठी स्त्रीने इतर उत्पा-दनकार्यातून बाहेर राहावे हा युक्तिवाद कोणी करू शकत नाही.

स्त्री-मुक्तीसाठी आकाश खुले झाले–एक आभास

स्त्रियांनी ही एवढी मोठी झेप घेतलेली आपण बघितली. यंत्रांच्या उदयाबरोबर औद्योगीकरणाच्या प्रक्रियेमध्ये स्त्रीला उत्पादनकार्यात सामावून घेण्याची शक्यता निर्माण झाली व स्त्रीच्या मुक्तीसाठी आकाश खुले झाले. स्त्रीमुक्तीची व्याख्या तयार झाली–लिंगभेदावर आधारित श्रमविभागणी नष्ट होणे म्हणजे स्त्रीमुक्ती होणे. असा भास निर्माण झाला की आता काय कमी आहे? स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या घोषणा घेऊन भांडवलदारवर्गाने इतर शोषित वर्गांना आपल्या बाजूला एकत्रित केले व राज्यसत्ता काबीज केली. लोकशाही घोषित केली आणि सामान्य माणसाला वाटले की, त्याच्यासाठी आता खरोखरच आकाश हीच मर्यादा. कर्तृत्वाला भरपूर वाव. जन्माने तुमचे स्थान ठरणार नाही. तुमच्या बुद्धिमत्तेवर, पैसा मिळविण्याच्या यशावर तुमचे समाजातील स्थान अवलंबून आहे. तुम्ही कोणीही असा. लूट करा. पैसा मिळवा. भांडवल गुंतवा. नफा काढा. बस्स! पण खरोखरच हे स्वातंत्र्य किती जणांना उपभोगता आले? बहुसंख्य लोक कामगारच राहिले. लाखो छोट्या शेतकऱ्यांना जमिनी विकून शेतमजूर व्हावे लागले आणि मजुरी मिळाली नाही तर भुकेकंगाल राहावे लागले. हीच गोष्ट स्त्रियांच्याही बाबतीत झाली. कागदावर सर्व अधिकार मिळाले. शिक्षण, नोकरीचा हक्क, समान वेतनाचा हक्क, बाळंतपणाची रजा, मुलांना

सांभाळण्यासाठी शिशुकेंद्रे ! पण प्रत्यक्षात किती आले ? आपण सुरुवातीलाच सखूबाईची गोष्ट वघितली आणि मंजुश्रीची गोष्ट वघितली. सखूबाईला शिक्षण नाही, नोकरी मिळत नाही. मंजुश्रीला नोकरी आहे, पण लांब राहावे लागते. शिशुकेंद्राची सोय नाही. नवरा घरी मदत करीत नाही. शिवाय तिचे स्वतःचे मन अजून स्वतंत्र नाही.

स्त्रीमुक्ती व समाजवाद

या सर्वांला कारण काय ? येथे उत्पादनपद्धतीत परिवर्तन झाले. औद्योगीकरण झाले. जीवनपद्धती वदलली. स्त्रियांना नोकऱ्यांसाठी वाहेर पडावे लागले; पण उत्पादनाचा जो मूळ पाया पिळवणूक, तो वदलला नाही. समाजात पिळणारे वर्ग व पिळले जाणारे वर्ग ही विभागणी कायमच राहिली. उत्पादनाची मालकी काही मूठभर लोकांकडे आणि उत्पादनाची प्रेरणा नफा. कारखान्यातून वस्तू वनतात, शेतात अन्न पिकते; पण ते मुख्यतः लोकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी नसून त्या वस्तू विकून त्यातून जो नफा मिळेल तो पुन्हा भांडवल म्हणून गुंतवून अधिकाधिक नव्या नव्या वस्तू उत्पन्न करण्यासाठी वापरला जातो व त्यातून अर्थव्यवस्थेवर अधिकाधिक नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न होतो. हा नफा अधिकाधिक मिळत राहावा म्हणून कामगारांना कमीत कमी वेतन, कमीत कमी सोयी-सवलती देण्याचा कारखानदारांचा प्रयत्न असतो. केवळ संघटित होऊनच कामगार आपले रहाणीमान टिकविण्यासाठी व उंचावण्यासाठी धडपड करू शकतो. स्त्रियांसाठी सवलती देण्याचे कायदे होऊनसुद्धा ते अंमलात न आणण्याचे कारण हे या पिळवणुकीच्या तत्त्वात आहे. हेच पिळवणुकीचे तत्त्वज्ञान संस्कृतीमध्येही जोपासले जाते. कुटुंबव्यवस्था हा समाजाचा पाया हे वारंवार विंववले जाते. कुटुंवासाठी स्त्रीने स्वार्थत्याग केला पाहिजे, प्रथम कुटुंवाची सेवा हे ध्येय मानले पाहिजे. मग वेळ उरला, कारखान्यात जागा असली तर नोकरी. स्त्रीची नोकरी ही दुय्यम समजली जाते. नोकरी हा माझा हक्क म्हणून स्त्री मागू शकत नाही. अर्थात आज पुरुषांनाही सर्वांना नोकरी मिळतेच असे नाही; पण पुरुषाला ती मिळावी याला कोणाचा तत्त्वतः विरोध असत नाही.

याला उपाय काय ? स्त्री-मुक्तीचा मार्ग काय ? स्त्रीला उत्पादनव्यवहारात सामील होण्याची शक्यता कधी येईल ? आणि सामील झाली तरी तिला केवळ स्त्रियांची समजली जाणारी कामे न मिळता आपल्या आवडीप्रमाणे व कुवत असेल त्या व्यवसायात शिक्षण व नोकरी कधी मिळू शकेल ?

या परिस्थितीचा उपायही आजच्या या भांडवलशाही समाजरचनेच्या पोटातच लपलेला आपल्याला आढळतो. आपण आतापर्यंत पाहिले की, आजपर्यंत समाज विकसित होत होता; पण त्याचा पाया पिळवणुकीवर आधारित वर्गसमाज हाच होता.

आर्थिक पिळवणूक सांस्कृतिक क्षेत्रापर्यंत विविध रूपांमध्ये अटळपणे जाऊन पोचते. किंबहुना सांस्कृतिक पिळवणुकीतूनच आर्थिक पिळवणुकीचे समर्थन होते. आर्थिक पिळवणूक टिकून राहू शकते. शूद्र या वर्णाला अस्पृश्य मानून त्यांच्या मनावर अस्पृश्यतेचे दडपण तयार करून शेकडो वर्षे त्यांना राबविणे शक्य झाले. स्त्रियांच्याही मनावर पातिव्रत्याचे दडपण टाकून त्यांना कुटुंबासाठी राबवणे शक्य झाले. तेव्हा हा वर्गसमाज नष्ट करणे, ही पिळवणुकीची उतरंड नष्ट करणे हा एकच उपाय यासाठी असू शकतो. संपूर्ण स्त्रीमुक्तीसाठी वर्गहीन समाजाची आवश्यकता असे. माणसाने माणसाची केलेली पिळवणूक पूर्णपणे नष्ट झाली आहे. अशी समाजव्यवस्था व एक नवीन, स्वतंत्र व सहकार्याने राहणाऱ्या माणसांची संस्कृती निर्माण होण्याची आवश्यकता आहे.

आणि ह्या वर्गहीन समाजाची बीजे आजच्या भांडवलशाही समाजामध्येच आढळतात. येथे उत्पादन हे अतिशय मोठ्या प्रमाणात, सामुदायिक प्रकारचे झाले आहे. नुसत्या वेगवेगळ्या कामांचीच विभागणी झाली आहे असे नसून कारखान्यांत जी एकेक वस्तू बनते तिचेही असंख्य लहान लहान भाग वेगवेगळ्या विभागात वर्नावले जातात. एकाच यंत्रावर अनेक माणसे एकदम काम करतात. यामुळे सांमूहिक काम ही या उत्पादनपद्धतीची महत्त्वाची गरज व वैशिष्ट्य आहे. यातूनच सामूहिकतेची जाणीव तयार होते. संघटितपणाची जाणीव तयार होते. एकमेकांच्या सहकार्याचे अनन्यसाधारण महत्त्व पटते. याच उत्पादनपद्धतीत हळूहळू मालकवर्ग बांडगूळ बनू लागतो. कारखाना चालवण्यासाठी व्यवस्थापक असतात. कामगार असतात. तेव्हा मालकाची गरज काय? कामगार व व्यवस्थापक सर्वांनी मिळून सामुदायिक उत्पादन होते, मग सामुदायिक मालकी का नको? आम्ही श्रम घालून जे निर्माण करतो त्याच्यावर आमची मालकी का नको? खाजगी मालकी, त्यामुळे मिळणारा नफा, त्यासाठी पिळवणूक हे सूत्रच काढून टाकले तर? खाजगी मालकी जाऊन समाजाची मालकी आली तर? उत्पादन होणाऱ्या वस्तू नफ्यासाठी तयार होणार नसून सामान्य माणसांच्या गरजा भागविण्यासाठी तयार झाल्या तर? काम न करणाऱ्या मूठभर ऐतखाऊ मालकवर्गाच्या हातून सत्ता काढून घेऊन सर्व कष्टकरी लोकांच्या हाती सत्ता आली तर? तर मग अशा समाजात सर्वजण सामाजिक उत्पादन प्रक्रियेत सहभागी असतील. सर्वांच्या सोयीनुसार उत्पादन व विभाजन करता येईल. शिशुकेंद्रे, सामुदायिक स्वयंपाकगृहे, विविध क्षेत्रांतील शिक्षणकेंद्रे अशा सोयी उपलब्ध होतील.

सामाजिक श्रम व वैयक्तिक अपहरण हे सूत्र जाऊन सामाजिक श्रम व सामुदायिक उपभोग हे सूत्र येणे म्हणजेच समाजवादी समाजव्यवस्था येणे. येथे पिळवणुकीस आवश्यक असलेली वर्गरचना नष्ट होते. पिळवणूक नष्ट होते, खाजगी नफ्याची प्रेरणा नष्ट होते. समाजातील प्रत्येक माणसाकडे कामगार म्हणून पाहिले न जाता माणूस

म्हणून पाहिले जाते. त्याच्या सर्जनशीलतेला वाव मिळावा म्हणून उत्पादनसाधनांचा विकास करून उदरनिर्वाहासाठी कमीत कमी वेळ नोकरी करावी लागावी, असे प्रयत्न होतात. कारखान्यातील कामांचे तास सामाजिक गरजेप्रमाणे कमी कमी होत जातात व सांस्कृतिक, आनंददायी व्यवहाराला अधिक वाव दिला जातो. समाजातील प्रत्येक व्यवहाराचे व्यापारीकरण हळूहळू कमी कमी होत जाते. कलेचा व्यापार होत नाही. कलेच्या नावाखाली किंवा जाहिरातीसाठी स्त्रीचे शरीर वापरण्याची गरज नसते आणि समाजातील दुबळ्या घटकांसाठी खास सोयीसवलती देण्यास समाज तयार होतो. सामुदायिक निर्णय घेणे ही प्रक्रिया सुरू होते.

पाश्चात्त्य देशांत भांडवलशाही क्रांती झाल्यामुळे औद्योगीकरण झपाट्याने झाले. स्त्रिया घराबाहेर पडल्या. उत्पादनकार्यात भाग घेऊ लागल्या. त्यांना अर्थार्जनाची संधी मिळाली. मर्यादित अर्थाने त्या स्वतंत्र झाल्या. तरीही त्यांचे समाजातील दुय्यम स्थान संपले नाही. त्यासाठी त्यांची चळवळ सुरू आहे.

भारतात मात्र भांडवलशाही इंग्रजांमार्फत आल्यामुळे व येथील भांडवलावर अजून परकीय भांडवलदारांचे नियंत्रण असल्यामुळे औद्योगीकरण झपाट्याने झाले नाही. जुनी जमीनदारी पद्धत काही प्रमाणात कायम राहिली. त्यामुळे स्त्रियांना नव्या नव्या क्षेत्रांत नोकऱ्यात उपलब्ध होऊ शकत नाहीत. मोफत शिक्षण नाही. याचा परिणाम जुनी मूल्ये, परंपरा कायम ठेवण्यात झाला आहे. आमच्या येथील स्त्री पाश्चात्त्य समाजापेक्षाही मागे राहिली आहे. येथील स्त्रीचा विकास होण्यासाठी समाजवादी क्रांतीशिवाय दुसरा पर्याय नाही. समाजवादी क्रांतीमुळे देशाची प्रगती वेगाने होऊन स्त्री मुक्तीला अनुकूल वातावरण तयार होऊ शकेल. साम्राज्यशाही, नियंत्रित भांडवल-शाही व्यवस्था नष्ट करणे व पिळवणुकीचा पाया उद्ध्वस्त होणे, या व्यापक श्रमिक जनतेच्या उद्दिष्टांशी स्त्री-मुक्ती आंदोलनाची खास उद्दिष्टे घट्ट बांधली गेलेली आहेत. ह्या व्यापक उद्दिष्टांचा विसर पडू देणे स्त्री मुक्ती आंदोलनाला चालणार नाही, हे नीट ध्यानात घेणे आवश्यक आहे.

भांडवलशाहीत स्त्री-मुक्ती अशक्य

समाजवादामध्ये स्त्रीची मुक्ती आहे असे म्हटले की भांडवलशाहीचे समर्थक पुढे सरसावतात. आपल्यापुढे अनेक उदाहरणे ठेवतात. अमेरिकेमध्ये बघा. एकूण काम करणाऱ्या लोकांपैकी ४२ टक्के स्त्रिया काम करत आहेत. इंग्लंडमध्ये, जपानमध्ये जर्मनीमध्ये. ज्या देशांची औद्योगिक वाढ झपाट्याने झाली आहे, ज्यांनी आज सबंध जगभरची बाजारपेठ जिंकून घेतली आहे, तेथे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते आणि त्यासाठी त्यांना तेथील स्त्रियांना कामावर घ्यावेच लागते. स्त्रियांना कामावर घेऊन ते त्यांच्यावर उपकार करीत नाहीत, तेथील अर्थव्यवस्थेची ती अपरिहार्य गरज आहे.

पण तेथील काम करणाऱ्या स्त्रीचे तिच्या कामाच्या ठिकाणी स्थान काय आहे? एकूण काम करणाऱ्या स्त्रियांपैकी ९० टक्के स्त्रिया या त्या त्या ठिकाणच्या दुय्यम स्थानावर असतात. एकूणच स्त्रियांच्या कामाचे प्रकार बघितले तर या देशात कारकून व विक्रेत्या या प्रकारच्या नोकऱ्यांमध्ये स्त्रिया प्रामुख्याने आढळतात. त्याच्याच बरोबरीने परिचारिका व शिक्षिका. उरलेल्या थोड्या कामगार व शेतमजूर या क्षेत्रांत आढळतात. व्यवस्थापन किंवा इतर अधिक उत्पन्नाच्या व प्रतिष्ठित व्यवसायांमध्ये स्त्रियांचे प्रमाण फारच थोडे आहे. याचा अर्थ स्त्रीचे जे गुण पूर्वापार जोपासले गेले आहेत त्याच गुणांचा उपयोग होईल अशा प्रकारचे काम स्त्रीला दिले जाते. पूर्वीची श्रमविभागणी लिंगभेदावर आधारित होती. संतती निर्माण करण्याचे, अपत्यसंगोपन करण्याचे व कुटुंबवियांची सेवा करण्याचे काम स्त्रीला दिले होते. ती कामे तेव्हा ती घरात करी व तिला त्याबद्दल फक्त जेवणखाण, कपडालत्ता मिळे. वेळप्रसंगी लाथा व शिव्यांचा बोनसही मिळे. आता तीच कामे ती बाहेर जाऊन करते. घरातील आजाऱ्यांची सेवाशुश्रूषा करण्याऐवजी बाहेर परिचारिकेचे काम करते. नवऱ्याला आकर्षित करण्याऐवजी सेल्सगर्ल व मॉडेल म्हणून काम करते; पण मोहवतीच राहते. घरातील मुलांना शिकविण्याच्या ऐवजी बाहेर शिक्षिकेची नोकरी करते, घरात नवऱ्याचे काम व आज्ञापालन करताकरताच बाहेर साहेबाच्या हाताखाली कारकुनी करते. याचाच अर्थ स्त्री म्हणून तिचे स्वरूप कायमच राहते, तिचे स्थान दुय्यम राहते. तिला इतर व्यवसायात फारशी संधी मिळत नाही. तिचे मन व व्यक्तिमत्व या तऱ्हेच्या कामासाठीच घडविले जाते. लिंगभेदावर आधारित श्रमविभागणी कायमच राहते. खऱ्या अर्थाने व्यवसायाची निवड तिला करता येत नाही आणि यामुळेच समाजाचा, पुरुषाचा तिच्याकडे बघण्याचा दृष्टिकोणही बदलत नाही,

आपल्या भोवती काय स्थिती आहे? आपण पूर्वी बघितलेच की भारतामध्ये एकूण काम करणाऱ्या लोकसंख्येपैकी फक्त १७ टक्के स्त्रिया आहेत. त्यातही ८० टक्के स्त्रिया शेतावर राबतात, ज्यासाठी शिक्षण लागत नाही. बऱ्याचशा कारकून, शिक्षिका परिचारिका आहेत आणि फारच थोड्या डॉक्टर, शास्त्रज्ञ, राजकारणी आहेत. याचबरोबर स्त्री-शरीराचा बाजार अधिकाधिक वाढत आहे. पूर्वी बाप मुलगी विकी व नवरा विकत घेई. म्हणजे स्त्री ही वस्तू होती; पण पण ती एका घरातील वस्तू होती. आता तिचे सौंदर्य थोड्या वेळासाठी वेगवेगळ्या लोकांना उपभोगता येते. वेश्येचे शरीर विकत घेऊन शारीरिक भूक भागते. जाहिरातीसाठी स्त्री-शरीर विकत घेऊन भांडवलदार आपल्या मालाची विक्री वाढवतात व नफा कमावतात. चित्रपटांतून स्त्रीचे अनावृत शरीर विकत घेतले जाते. ऑफिसेसमधून सेक्रेटरी, रिसेप्शनिस्ट म्हणून सुंदर तरुणींना घेतले जाते. तेथेही पुन्हा तिचे शरीर व स्त्रीसुलभ गुण विकत घेतले जातात. पुरुषप्रधान व्यापारी जगात पुरुषांच्या डोळ्यांना सुखावण्यासाठी

अशा जागी स्त्रियाच लागतात. स्त्रियांना पुन्हा घरात पुरुषाच्या आज्ञेत राहण्याची सवय झाली असल्याने ऑफिसमध्येही त्या पुरुष सेक्रेटरीपेक्षा अधिक आज्ञाधारकपणे काम करतात. अशा तऱ्हेने स्त्रियांना 'आर्थिक स्वातंत्र्य' मिळत असले तरी ते फसवे आहे. ते अपूर्ण आहे.

आणि यासाठी मार्ग एकच : नफ्याची प्रेरणा नष्ट करणे. खाजगी मालकी नष्ट करणे. या खाजगी मालकीमुळे भांडवलदारांच्या हातात आर्थिक सत्ता केंद्रित होते, समाजव्यवस्था वर्गीय बनते व त्यातून पुरुषप्रधान सांस्कृतिक सत्तेची बीजे रोवली जातात. वरिष्ठ वर्गाचे अनुकरण करीत सामान्य कारकून व सामान्य शेतमजूर सुद्धा आपला पुरुषी अहंकार पोसत असतो आणि स्त्री जरी बाहेर पडली, कमाई करायला लागली तरी ती मनाने स्वतंत्र होत नाही, मुक्त होत नाही. आपले गुण, कौशल्य, खऱ्या आवडीनिवडी याचा तिला पत्ता लागत नाही. सामान्य कामगाराला, शेतमजुराला, कारकुनाला ज्याप्रमाणे समोर येईल ते आयुष्य जगावे लागते, तसेच स्त्रीलाही परंपरेने जोपासलेले गुण सांभाळत समोर येईल ते आयुष्य जगावे लागते. वात्सल्य, सेवाभाव, शालीनता, आज्ञाधारकपणा, भित्रेपणा, दुबळेपणा, दुसऱ्याच्या आधाराची गरज असे अनेक स्त्रीसुलभ गुण सांगितले जातात. वाङ्मयातून, पुराणांतून त्यांची महती गायिली जाते.

पण हे गुण या इतिहासातूनच तिच्या अंगी रुजलेले आहेत, हे ती केव्हा समजून घेणार ? या तथाकथित 'नैसर्गिक' गुणांतून मुक्ती करून घेईल तेव्हाच ती खऱ्या अर्थाने मुक्त होईल ! त्यासाठीच जाणीवपूर्वक प्रयत्न करायला हवेत. त्यासाठीच आजची लैंगिक भेदावर आधारलेली श्रमविभागणी जायला हवी. स्त्रीने परिचारिका न होता कामगार म्हणून काम करावे. तंत्रज्ञ म्हणून काम करावे. त्यासाठी तिला मुद्दाम धंदे शिक्षण दिले जावे. तिच्या स्वयंपाक, अपत्यसंगोपन वगैरे इतर जबाबदाऱ्या समाजाने उचलाव्यात आणि हे समाजवादात होऊ शकेल. उत्पादन–साधनांवर, कारखाने, शेते, शाळा यांच्यावर जेव्हा सामूहिक मालकी प्रस्थापित होईल, नफ्याची प्रेरणा जाईल, कामगार म्हणून पाहिले न जाता मानव म्हणून परस्परांकडे पाहिले जाईल, तेव्हा प्रत्येक मानवाच्या विकासाकडेही लक्ष देण्याची योजना सर्व मिळून आखतील. स्त्रीच्या जबाबदाऱ्यांचे सामाजीकरण होईल. पुरुषालाही आपला पुरुषी अहंकार सोडून स्त्रीला मदत करावी लागेल. तांत्रिक शोधांमुळे ते काम सोपेही होईल. गॅस येईल, कूकर येईल, कपडे धुण्यासाठी यंत्रे येतील. कुटुंबनियोजनामुळे मातृत्व सक्तीचे राहणार नाही. मुलांना सांभाळणे, मोठे करणे यामध्ये आनंद वाटेल. येथे केवळ कागदावरचे स्वातंत्र्य स्त्रीला मिळणार नाही. कायदे कागदावर राहणार नाहीत. कारण काम करणे, अर्थव्यवस्थेत भाग घेणे हा प्रत्येक स्त्रीचा मूलभूत हक्क राहील. अर्थव्यवस्थेचे नियोजन करताना प्रत्येकाला काम मिळणे हे मुख्य सूत्र

राहील. कारण सरकार हे लोकांचे असेल, कष्टकऱ्यांचे असेल. काम करण्याचे उद्दिष्ट हे केवळ कमाई करणे, एवढेच मर्यादित नसेल. कारण प्रत्येकाला आवडीचे शिक्षण व आवडीचे काम मिळावे यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न केले जातील. हे सर्व फक्त एक स्वप्न नाही. आज जगातल्या समाजवादी देशांमध्ये या दिशेने वाटचाल होत असलेली दिसून येत आहे.

निकोप कुटुंबसंस्था

येथील कुटुंबाचे स्वरूप कसे असेल ? मघाशीच आपण पाहिले की, शेती हा प्रमुख व्यवसाय होता, सरंजामशाही व्यवस्था होती तेव्हा अविभक्त कुटुंब ही गरज होती. शेतीला खूप लोकांची मदत लागे. पुढे औद्योगिक व्यवस्था आली व विभक्त कुटुंबाला सुरुवात झाली. तरी सुद्धा पुरुष हा प्रधान व स्त्रिया व मुले सर्व त्याच्या आज्ञेत असेच कुटुंबाचे स्वरूप राहिले. स्त्रीने नोकरी केली तरी तिची नोकरी दुय्यम, स्थान दुय्यम. अजूनही कुटुंब हा समाजाचा मूलभूत घटक मानण्यात येतो. मुलांची जबाबदारी मुख्यतः कुटुंबाची. सरकार मदत करेल; पण मुलांनी बापावर शिक्षणासाठी अवलंबून राहायचे, मग बापाने तू डॉक्टर हो, इंजिनीअर हो म्हणून त्याच्यावर दबाब आणायचा, वगैरे घडत राहते. नव्या समाजवादी समाजात हे सर्व बदलेल. खऱ्या अर्थाने सर्वजण समान होतील. कुटुंब असेल पण ते समान पायावर. कारण प्रत्येक स्त्री, पुरुष, मुलगा, मुलगी हे स्वतंत्रपणे समाजाचे सभासद असतील. लहान मुलांचे शिक्षण, शाळेत मिळणारे जेवण, लहानपणी आई कामावर जाताना शिशुकेंद्रांवर राहण्याची सोय हे सर्व समाजाकडूनच मिळेल. स्त्री व पुरुष स्वतंत्रपणे नोकरी करतील. त्यामुळे आईवडिलांच्या दबावाखाली ते म्हणतील त्या स्त्री–पुरुषाशी लग्न करण्याचे बंधन त्यांच्यावर राहणार नाही. जाती, धर्म यांना महत्त्व राहणार नाही. नोकरी करताना ओळखी वाढतील. व्यक्तिव्यक्तीतील संबंधातील मोकळेपणा वाढेल. स्त्री व पुरुष हे स्वतःच्या आवडीने सहजीवनासाठी एकत्र येतील. मुले वाढवणे ही एक सर्जनशील क्रिया असेल. मुले होण्यामध्ये संपत्तीला वारस मिळावा, वंशदीप चालू राहावा असल्या कल्पनांचे दडपण नसेल. यातून मुलींवर जो अन्याय होतो तशा अन्यायाची शक्यताही नाहीशी होईल. स्त्रीला मुलगा होण्याची वाट बघत सात–आठ बाळंतपणाच्या दिव्यातून जावे लागणार नाही. संततिनियमनांच्या साधनांमुळे मातृत्व सक्तीचे राहणार नाही, उदारनिर्वाहाची सोय यादृष्टीने स्त्रियांना विवाह करावा लागणार नाही ! आपण नवऱ्यावर अवलंबून आहोत अशी भावना नसेल. 'प्रेम' लादलेले नसेल. सक्तीचा कायदेशीर व्यभिचार असं विवाहबंधनाचे स्वरूप राहणार नाही. एकमेकांशी जुळवून घेण्याची गरज राहीलच; पण ती कोणत्याही दोन मानवी संबंधांत राहते. मित्रांच्यात किंवा मैत्रिणींच्यातसुद्धा असतेच. पूर्वापार

चालत आलेल्या पतिपत्नीच्या उच्च व नीच भूमिका येथे संपल्या असतील आणि मग स्त्रीसुलभ म्हणून समजले जाणारे ढोबळ गुणही संपतील. वात्सल्यावर फक्त स्त्रीचाच अधिकार का ? स्त्रीने पुरुषाला उलट उत्तर द्यायचे नाही असे का ? स्त्रीनेच तडजोड करायची, मन मारायचे, स्वभाव बदलायचा असे का ? येथे व्यक्ति-सुलभ गुण उरतील. अर्थात हे स्थान मिळविण्यासाठी पुरुषाची पूर्वापार चालत आलेली पुरुषीवृत्ती काढून टाकण्यासाठी स्त्रीला झगडावे लागेल.

गृहकृत्य अनुत्पादक आहे का ?

आजच्या भांडवलशाही समाजव्यवस्थेमध्ये आणखी एका महत्त्वाच्या बाबतीत स्त्रीवर अन्याय होतो. स्त्री जे गृहकृत्य करते त्या श्रमांचा हिशोब कोणत्याही भांडवल-शाही अर्थव्यवस्थेमध्ये धरला जात नाही. रस्त्यावर काम करणारी झाडूवाली, ऑफिसमधला शिपाई, भाजी विकायला बसणारी स्त्री या सगळ्यांच्या कामाचे मोल राष्ट्रीय उत्पादनात मोजले जाते. त्यांचे काम उत्पादक ठरते; पण आज दहा कोटी स्त्रिया घरांत जे गृहिणीचे काम करतात त्यांचे मोल काय ? या कामाचे नक्की महत्त्व कसे आहे याचा आपण आधी शोध घेऊ म्हणजे घरकाम व बालसंगोपन या कामाचे मूल्य आपल्याला काढता येईल.

येथील असंख्य लोक कामगार, कारकून किंवा शेतमजूर म्हणून काम करतात. म्हणजेच ते रोज आपली आठ तासांची श्रमशक्ती भांडवलदाराला किंवा श्रीमंत शेतकऱ्याला विकतात. त्याच्या बदल्यात भांडवलदार व श्रीमंत शेतकरी त्यांना जीव-नावश्यक एवढे वेतन देतो. याचाच अर्थ हे लोक जेवढी श्रमशक्ती रोज खर्च करतात तेवढी श्रमशक्ती भरून यावी म्हणून आवश्यक तेवढा खर्च मालक त्यांना देतात. ही श्रमशक्ती कशी भरून निघते ? त्यांना जेवण लागते, त्यांचे कपडे धुवावे लागतात, एवढेच नव्हे तर त्यांची काळजी घ्यावी लागते. मानसिक ओलावा, जिव्हाळा पुरवावा लागतो. भांडवलशाहीमुळे येणारा दुरावा, रोजचा जीवनसंघर्ष सुसह्य व्हावा म्हणून त्यांना कौटुंबिक सुख हवे असते. हे सगळे कोण पुरविते ? कारकून किंवा इतर मध्यमवर्गीयांकडे धुणेभांड्याला मोलकरणी असतात; पण कामगार, शेतमजूर यांच्या-साठी त्यांच्या बायका राबतात. कारकुनांच्यासाठी त्यांच्या बायका स्वयंपाक करतात व कौटुंबिक जिव्हाळा देतात. त्याच्या बदल्यात या स्त्रियांना जेवणखाण व कपडालत्ता मिळतो ! बस्स ! पण स्वतंत्र अस्तित्व नसते. तेच कंटाळवाणे घरकाम सक्तीने वर्षानुवर्षे करावे लागते. आपण या सर्वाला प्रेम हे नाव देतो. कुटुंबासाठी त्याग, खस्ता खाणे वगैरे उदात्त नावे देतो; पण अगदी सरळ चिकित्सा केली तर काय दिसते ? मालकवर्ग अप्रत्यक्षपणे आपल्या नोकरवर्गाची श्रमशक्ती भरून यावी, कार्यक्षमता वाढावी म्हणून या स्त्रियांना, त्यांच्या बायकांना विनामूल्य राबवून घेत असतो.

अर्थव्यवस्थेचीच अटळ गरज म्हणून होणाऱ्या या श्रमांची आर्थिक जीवनात पैशांच्या रूपात किंमत मात्र शून्य असते. गोष्ट साधी आहे. उद्या लग्न केले नाही तर या सर्व गोष्टीसाठी पैसा द्यावा लागेल की नाही ? आणि मग कमी वेतन देऊन कामगाराची श्रमशक्ती भरून निघेल का ? तो कामासाठी कार्यक्षम राहील का ?

आणखी एक महत्त्वाची गोष्ट यातून मालकवर्ग साधत असतो, या स्त्रिया नव्या कामगारवर्गाला जन्म देत असतात. प्रेम, कुटुंब या गोंडस नावाखाली नव्या श्रमशक्तीचे उत्पादन होत असते. लहान मुलांना सांभाळून, त्यांना परंपरागत संस्कार देऊन त्यांचे मन घडविण्याचे काम स्त्रिया करतात. या समाज व्यवस्थेत पक्का बसेल असा कामगार या स्त्रिया निर्माण करतात. थोडक्यात, या स्त्रिया श्रमशक्तीचे पुनरुत्पादन करतात. म्हणजे कामगारांना जीवनावश्यक वेतन देऊन मालक वर्ग एवढा फायदा त्यातून साधत असतो. कामगारांना जीवनावश्यक वेतन देऊन मालक वर्ग एवढा फायदा त्यातून साधत असतो. कामगाराच्या रोज खर्च होणाऱ्या श्रमशक्तीची भरपाई त्याच्या कुटुंबात होते व भविष्यातील नवा कामगार तयार होतो. आणि स्त्रिया केवळ दोन वेळचे जेवण व कपडे एवढ्याशा मोबदल्यात यासाठी काम करतात.

या दृष्टिकोणातून या प्रश्नाकडे बघितलेले काहींना आवडणार नाही. कारण येथे प्रेम, वात्सल्य वगैरे भावनांचा बुरखा फाडून टाकला आहे; परंतु भांडवलदार किंवा मालक वर्ग प्रत्येक माणसाकडे श्रमशक्ती विकणारी वस्तू म्हणून पाहत असल्याने भांडवलशाही समाजात ह्या मिथ्या कल्पना कशा रूढ होतात हे येथे मांडले आहे. समाजवादी व्यवस्थेत प्रत्येक माणसाकडे मानव म्हणून पाहिले जाते आणि म्हणूनच अशा व्यवस्थेमध्ये स्त्रीच्या अडचणींचा, जबाबदारीचा विचार करूनच तिच्या विकासाला वाव देण्याचा प्रयत्न केला जातो. समाजवादी व्यवस्थेमध्ये प्रत्येकजण जे काम करतो ते सामुदायिक कामाचा भाग असते आणि त्या कामापासून तयार होणाऱ्या वस्तूंचा सामुदायिक उपभोग असतो. त्यामध्ये श्रमशक्ती मालकाला विकण्याचा प्रयत्न नसतो. पगार किती घ्यायचा ते सर्वांनी मिळून ठरवायचे असते. समाजवादी व्यवस्थेमध्ये घरगुती कामाचेही जास्तीत जास्त सामाजीकरण झालेले असते. ह्यामुळे व सामुदायिक स्वयंपाकगृहातून स्वयंपाक करणाऱ्या व्यक्तींचे श्रम आपोआपच आर्थिक व्यवहारातील गणितात धरले जातात.

स्त्री-मुक्ती चळवळीची गरज

आतापर्यंत आपण बघितले की, लैंगिक भेदावर आधारीत श्रमविभागणी नष्ट झाली पाहिजे. पुरुषाचे काम पैसे मिळविणे व स्त्रीचे काम 'चूल आणि मूल' हे नष्ट झाले पाहिजे. या मार्गांमधील अडथळा ही भांडवलशाही समाजव्यवस्था आहे. आणि ही समाजव्यवस्था बदलून समाजवादी समाजव्यवस्था आली तरच स्त्री मुक्तीसाठी आवश्यक वातावरण तयार होऊ शकेल. तिला शिक्षण मिळेल, काम मिळेल आणि मग तिच्या मनावरची सांस्कृतिक दडपणे हळूहळू कमी होतील व ती एक समाजाची स्वतंत्र नागरिक म्हणून आर्थिक व राजकीय व्यवहारांमध्ये पुरुषाच्या बरोबरीने भाग घेऊ शकेल. आज स्त्रीसुलभ मानल्या जाणाऱ्या नोकऱ्या न करता आपल्या आवडीचा कोणताही व्यवसाय ती निवडेल आणि खऱ्या अर्थाने मुक्त, स्वतंत्र व्यक्ती म्हणून समाजात वावरेल. नित्य नवीन लागणारे तांत्रिक शोध तिला तिच्या रोजच्या जबाबदारीतून अधिकाधिक मुक्त करीत जातील.

स्त्रियांची एकजूट

पण हे सगळे कसे साधायचे ? हा बदल कसा घडवून आणायचा ? एक तर आपण सगळेच जाणतो. आजचे जीवन इतके सामूहिक बनलेले आहे की आपण एकेकट्याने कोणतीच गोष्ट साध्य करू शकणार नाही. त्यासाठी एकजुटीची आवश्यकता आहे. सर्व स्त्रियांनी एकत्र आले पाहिजे. एकजूट हीच आपली शक्ती आहे. ही शक्ती आपणास सरंजामशाहीविरुद्ध, भांडवलशाहीविरुद्ध आणि त्यांनी निर्माण केलेल्या वेगडी संस्कृतीविरुद्ध वापरायची आहे. यासाठी कामगार–स्त्रिया, शेतमजूर व गरीब शेतकरी स्त्रिया, मध्यमवर्गीय कर्मचारी स्त्रिया या तिन्ही वर्गांतील गृहिणी व या तिन्ही वर्गांतील विद्यार्थिनी व त्याचबरोबर मध्यम शेतकऱ्यांचा बायका या चारही गटांच्या स्त्रियांची एकजूट होणे आवश्यक आहे.

आपण एकेका गटातील स्त्री घेऊन तिची आजची स्थिती काय आहे, तिला कसे झगडता येईल ते बघू. (१) कामगार स्त्री : मुख्य म्हणजे इतर अनेक कामगार पुरुषांप्रमाणे भांडवलदार हिचे शोषण करत असतो. हिची श्रमशक्ती भांडवलदार विकत घेतो. तिच्याकडून यंत्रावर काम करवून घेऊन कच्च्या मालाचे रूपांतर पक्क्या मालात करवून घेतो. तिची आठ तासांची श्रमशक्ती कच्च्या मालात जाते. बाजारात तो पक्का माल विकून पूर्वीच्या पेक्षा मालकाला जास्त मूल्य मिळते. या जास्त

मिळालेल्या मूल्यापैकी थोडासा भाग जीवनावश्यक वेतन म्हणून कामगार स्त्रीला मिळतो. बाकीचा भाग नफा म्हणून भांडवलदारांच्या खिशात जातो.

कच्च्या मालाचे पक्क्या मालात रूपांतर झाल्यावर त्याची किंमत का वाढते ? कारण त्यामध्ये कामगाराचे श्रम जात असतात. ही किंमत त्या श्रमांची किंमत असते. मालक जेव्हा कामगाराला जीवनावश्यक वेतन देतो तेव्हा तो त्याला संपूर्ण श्रमांची किंमत देत नाही तर काही भागाची किंमत देतो. बाकीच्या भागाला आपण नफा म्हणतो. नफा म्हणजेच कामगाराचे शोषण केलेले श्रम.

याखेरीज या कामगार–स्त्रीला दोन पाळ्या कराव्या लागतात. कारखान्यातील एक पाळी व घरगुती कामांची दुसरी पाळी. शिवाय या कामगार–स्त्रियांसाठी अनेक कायदे होऊन सुद्धा तिला त्यांचा फारसा फायदा मिळू शकत नाही. लग्न झाले की कामावरून काढूनही टाकण्यात येते. मुलांसाठी शिशुकेंद्रे मिळत नाहीत. बाळंतपणाचा खर्च अतिशय थोडा मिळतो. कौशल्य वाढविण्यासाठी, ट्रेनिंगला जाण्यासाठी सवलत मिळत नाही.

या सर्व कामगार-स्त्रियांनी आपल्या ट्रेड युनियनच्या कामात भाग घेतला पाहिजे व आपल्या मागण्यांसाठी सतत झगडले पाहिजे. पगार वाढवून पाहिजे, बोनस पाहिजे, वगैरे मागण्या त्यांनी पुरुष कामगारांबरोबर घ्याव्याच; पण त्याबरोबर बाळंतपणाचा खर्च, शिशुकेंद्राची स्थापना, कँटिनमध्ये स्वस्त जेवण, कारखान्याजवळ राहण्यासाठी जागा याही मागण्या सतत केल्या पाहिजेत. त्यासाठी ट्रेड युनियनच्या कार्यकर्त्यांवर दडपण आणले पाहिजे. ट्रेड युनियनचे काम करण्यात पुढाकार घेतला पाहिजे आणि आपली राजकीय जाणीव वाढविली पाहिजे. इतर राजकीय मागण्यासाठी आग्रह धरला पाहिजे व समाजवादाशिवाय स्त्री-मुक्ती नाही हे लक्षात ठेवले पाहिजे.

कामगार-स्त्रिया या सर्वांत पिळल्या गेलेल्या स्त्रिया आहेत. त्यांना सामूहिकपणे यंत्रावर काम करण्याची सवय झाली आहे. त्यातूनच त्यांची सामूहिक जाणीव वाढली आहे. आपण सर्व मिळून यंत्रांवर काम करतो. आपण सर्व मिळून यंत्रांवर ताबा घेऊ, कारखान्यावर ताबा घेऊ व सर्व कारखाने समाजाच्या मालकीचे करू, अशी जागृती त्यांच्या मनात हळूहळू तयार होते. म्हणून त्यांना आपण आघाडीच्या स्त्रिया म्हणू. समाजवादामुळेच मालक व मजूर संबंध संपणार आहेत व समाजवादी व्यवस्थेमध्येच सर्व पिळल्या गेलेल्या वर्गांची मुक्ती आहे, ही वर्गजाणीव त्यांना त्यांच्या लढ्यातून येत असते. मूठभरांची मालकी व कोट्यवधींचे श्रम ही उफराटी तऱ्हा थांबवून सामुदायिक मालकी व सामुदायिक श्रम ही उत्पादनव्यवस्था आणली पाहिजे तरच आपल्याला मानव म्हणून जगता येईल, सवलती मिळतील, सोयी मिळतील हे त्या अनुभवातून शिकतात. संप, मोर्चे, बंद या प्रकारच्या लढ्यातून तिला शिक्षण मिळत जाते व ती अधिकाधिक जागृत होत जाते. हेच राजकारण घेऊन कामगार-

स्त्रियांनी इतर स्त्रियांकडे गेले पाहिजे. क्रांतिकारी-समाजवादी राजकारणाचा आदर्श घालून दिला पाहिजे.

कामगार-स्त्रियांसारखीच स्थिती आज शेतमजूर व गरीब शेतकरी स्त्रीची आहे. किंबहुना त्याहूनही वाईट आहे. ती श्रीमंत शेतकऱ्यांच्या शेतावर काम करायला जाते. तेथे तिला मजुरीचा दर अत्यंत कमी मिळतो. तिच्या श्रमांची चोरी होते. पुरुषांच्या बरोबरीने काम करूनही तिला १ रुपया रोज किंवा दीड रुपया रोज मिळतो. वर्षाकाठी जेमतेम १०० दिवस काम मिळते. बाळंतपणाचा खर्च मिळत नाही की सुट्टी मिळत नाही किंवा मुलांना सांभाळण्यासाठी शिशुकेंद्र चालविले जात नाही. तिच्यासाठी असे कायदेसुद्धा झाले नाहीत. एकटेदुकटे दूरवर रानात काम करावे लागते. त्या वेळी कोणतेही संरक्षण मिळत नाही.

शेतातील काम व घरगुती काम या दोन पाळ्या तिच्याही नशिबी आहेतच. दारू पिऊन आलेल्या नवऱ्याचा मार तिलाही खावा लागतो. मुलाला टोपलीत घालून कामाला जावे लागते. तेथे दोन मिनिटे दूध पाजायला बाजूला बसले तर मालक ओरडतो. शिक्षण नाही. अडाणीपणा, अंधश्रद्धा यामुळे ती अधिकच पिचली जाते. मात्र या स्त्रियांना कामगार-स्त्रियांसारखी सामूहिक मालकीची जाणीव एकदम येऊ शकत नाही. यंत्रांवर एकत्र काम करून कामगार-स्त्रीला सामूहिक कामाचे महत्त्व पटते. तसेच आधुनिक यंत्रांचा परिचय होतो. बदलत्या जगाचे भान येते. शेतावर काम करणारी शेतमजूर-स्त्रीही हा बदल बघत असते. नांगराच्या बदल्यात ट्रॅक्टर येतो. छोट्या शेतकऱ्यांच्या जमिनी जातात; पण तिच्या कामाचे स्वरूपच असे असते की, एककेटा माणूस काम करत राहतो. तिच्या मनातील आपल्या मालकीचे शेत असावे ही कल्पनाही पूर्णपणे गेलेली नसते. आता शेतमजूर-संघटना स्थापन होत आहेत व शेतमजुरांनाही संघटनेचे, सामूहिक कामाचे महत्त्व कळून येत आहे. आपली मजुरी वाढविण्यासाठी व आवश्यक सवलती मिळविण्यासाठी स्त्रियांनी या संघटनेत भाग घेतला पाहिजे. नेतृत्व पुरुषांच्या हाती सोपवून गप्प न राहता नेतृत्वासाठी पुढाकार घेतला पाहिजे व इतर स्त्रियांना संघटनेसाठी मार्गदर्शन केले पाहिजे. काम करणे हा आमचा हक्क आहे, ही जाणीव मनात ठेवली पाहिजे. मानव म्हणून स्थान मिळावायचे असेल तर समाजवादी क्रांतीशिवाय पर्याय नाही, हे राजकारण शिकले पाहिजे.

मध्यमवर्गीय कर्मचारी स्त्रिया

कामगार-स्त्रिया, शेतमजूर-स्त्रिया या त्यांच्या वर्गसंघटनेत सामील होतात व त्यातून क्रांतिकारी राजकारणाकडे त्या ओढल्या जातात. या संघटनेच्या अंतर्गत स्त्रियांचे विशेष गट करून त्यांना स्त्रियांवरील खास अन्यायाची जाणीव करून देता

येते. मध्यमवर्गीय पांढरपेशा कर्मचारी स्त्रियांचे प्रश्नही असेच महत्त्वाचे आहेत. आज बँकांतून, खाजगी कंपन्यांतून, सरकारी कचेऱ्यांतून, हजारो स्त्रिया काम करतात. शिक्षिका, परिचारिका, ग्रामसेविका अशा अनेक व्यवसायांमध्ये स्त्रिया आहेत. त्यांनाही ऑफिसचे काम व घरचे काम अशा दोन पाळ्या असतातच. ऑफिसातून कायदे झाल्यामुळे बाळंतपणाची रजा मिळते. खर्च मिळतो. मात्र लहान मुलांना ठेवण्याची सोय अजून झालेली नाही. घरी नवरा फारसा मदत करीत नाही. सणवार वगैरे पूर्वीची कामे संपली नाहीत. घरात लक्ष देत नाही असे आरोप शेजारीपाजारी, नातेवाईक यांच्याकडून ऐकून घ्यावे लागतात. कामाच्या ठिकाणी बढतीची संधी मिळाली तरी पुष्कळदा घरच्या अडचणीमुळे बढती मिळविणे शक्य होत नाही.

याही स्त्रिया त्यांच्या कर्मचारी संघटनेच्या सभासद असतात. मात्र घरच्या काळजीमुळे त्या संघटनेच्या कामात फारसा भाग घेत नाहीत. संपाच्या दिवशी मोर्च्यात सामील होण्याच्या ऐवजी या स्त्रिया तेवढाच एक दिवस घरी मिळाला म्हणून घरची कामे काढतात. ऑफिस सुटल्यावर घरी जाण्याची त्यांना घाई असते. कामगार व शेतमजूर-स्त्रियांच्या मानाने या स्त्रियांमध्ये एकजुटीची भावना कमी असते. त्यांच्या मनावरचे सांस्कृतिक संस्कार अधिक प्रभावी असतात. उत्पादक कामामध्ये भाग घेत नसल्याने त्यांना आपली पिळवणूक कोणामुळे होते, कशी होते ते कळू शकत नाही, त्या बऱ्याच व्यक्तिवादी राहतात. सामूहिक कामातून सामूहिक मालकी ही क्रांतिकारी जाणीव रुजू शकत नाही.

आपल्या दुःखाचे मूळ त्यांनी समजावून घेतले पाहिजे. डोंबिवलीहून चर्चगेटला जाताना प्रत्येक कर्मचारी स्त्री रोज तक्रार करते, चिडते, वैतागते; पण हे सर्व कशामुळे होते ? हे जर तिने डोळसपणाने पाहिले तर तिला कळून येईल की भांडवलशाही समाजव्यवस्था हा मार्गातील मोठा अडसर आहे. महागाई वाढते. नोकरी मिळायला अडचण पडते. नोकरी मिळाली तर सवलती मिळत नाहीत; सोयी नाहीत. ऑफिसमध्ये साहेबाच्या हाताखाली दुय्यम दर्जाचे काम. हे सगळे संपवायचे असेल तर समाजवादाच्या लढ्यात भाग घ्यावाच लागेल. 'केवळ आतापुरता' विचार करून चालणार नाही; आता संघटनेत भाग घ्यायचा म्हणजे कष्ट अधिक पडतात. पण ते कष्ट कमी होतील की नाही ? मुले ही समाजाचीच मुले आहेत. त्यांच्या शिक्षणाची, लहानपणी सांभाळण्याची सोय समाजाने केली पाहिजे. कामाच्या ठिकाणी स्वस्त दरामध्ये अन्न देण्याची सोय करून स्त्रियांचे श्रम समाजाने वाचविले पाहिजेत. तेव्हा याच मागण्या घेऊन त्यांनी संघटनेच्या अंतर्गत स्त्रीसंघटना उभी करून स्त्रियांमध्ये जागृती आणली पाहिजे. त्यातूनच त्या लढाऊ बनतील. यातूनच कुटुंबातील सांस्कृतिक बंधने तोडून टाकण्याची स्फूर्ती त्यांना मिळेल. नवरा, सासू, सासरा यांच्या दडपणाखाली राहण्याचे त्या नाकारू शकतील आणि यातून स्त्री-मुक्तीच्या

सुयोग्य मार्गावरील त्यांची वाटचाल सुरू होईल.

गृहिणी व विद्यार्थिनी

आतापर्यंत कष्ट करणाऱ्या सर्व स्त्रियांचे प्रश्न व त्यासाठी झगडण्याचे मार्ग आपण पाहिले; परंतु भारतामध्ये एकूण स्त्रियांच्या लोकसंख्येपैकी काम करणाऱ्या स्त्रिया अतिशय थोड्या आहेत. बाकी स्त्रियांचे काय ? कामगारांच्या बायका, मध्यम शेतकरी, पांढरपेशा कर्मचारी पुरुषांच्या बायका, शेतमजूर पुरुषांच्या बायका, शिवाय याच वर्गातील असंख्य विद्यार्थिनी, अविवाहित तरुणी यांची स्थिती आणखी वाईट आहे. या स्त्रियांना काम नाही. त्यामुळे आर्थिक स्वातंत्र्य अजिबात नाही. कामाच्या निमित्ताने बाहेर जायला मिळत नाही. घरात बसून भाकऱ्या भाजणे, मुलांची देखभाल करणे एवढेच काम. त्यांपैकी असंख्य स्त्रियांना शिक्षण नाही, वाचता येत नाही. ज्यांना शिक्षण आहे त्यांना दुपारी कादंबऱ्या वाचीत बसण्याखेरीज दुसरा उद्योग नाही. त्यातही विधवा स्त्रियांना तर दुसऱ्याच्या आधारे राहावे लागते. घरात मरमर काम करून बोलणी खावी लागतात. गरिबाघरच्या तरुण मुलींच्या बडिलांची हुंडा द्यायची ऐपत नसल्याने लग्ने होत नाहीत. शिक्षणात फारशी प्रगती करता येत नाही. नोकरी मिळत नाही. सगळीकडून कुचंबणा होते.

या स्त्रिया कामाच्या ठिकाणी एकत्र येत नसल्याने यांची संघटना बांधणे आज कठीण होते. आपल्याला कशाशी आणि कोणाशी लढावयाचे आहे याची त्यांना कल्पना येऊ शकत नाही. हुंडा घेण्याची प्रथा का चालू राहते ? शिक्षण का मिळत नाही ? नोकरी का मिळत नाही ? महागाई कशामुळे होते ? या स्त्रियांनी या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधून काढण्याचा प्रयत्न केला पाहिजे. हुंडा घेतला जातो, कारण या समाजात प्रतिष्ठा, पैसा याला महत्त्व मिळते. मुलगी दुसऱ्याच्या हातात सोपविण्याची कल्पना असते. पुरुषप्रधान भांडवलशाही संस्कृती लग्नाला पण बाजारी स्वरूप आणते. शिक्षणासाठी या समाजात जास्त पैसा खर्च केला जात नाही. तो महागड्या हॉटेलांसाठी खर्च होतो. परकीय भांडवलदारांच्या दबावाखाली येथील औद्योगिक प्रगती जोमाने होत नाही व नोकऱ्या निर्माण होऊ शकत नाहीत. साठेबाजीमुळे महागाई अधिक वाढते. हे सर्व समजून घेतले तर या सगळ्या गृहिणी आपल्या हक्कांसाठी झगडण्याकरता एकत्र येऊ शकतील. 'आम्हांला काम द्या' ही मागणी घेऊन त्यांना एकत्र येता येईल. 'प्रत्येक नागरिकाचा काम करण्याचा हक्क आहे.' याची जाणीय त्यांनी ठेवली पाहिजे.

मागच्या वर्षी महाराष्ट्रामध्ये महागाई प्रतिकार समितीने गृहिणींना संघटित केले. 'महागाई कमी करा', '१२ किलो धान्य द्या' अशा प्रमुख मागण्या होत्या. या मागण्यांमुळे स्त्रिया घरातून बाहेर पडल्या. राजकारणात भाग घेऊ लागल्या, अधिक

लढाऊ बनल्या. सासूसासरे, नवरा यांच्या विरोधाला न जुमानता त्यांनी मोर्च्यात भाग घेतला. त्यांच्या परंपरागत बंधनातून बाहेर पडण्याचा त्यांनी प्रयत्न केला. हे खूप मोठे यश झाले; पण ही पहिली पायरी झाली. याच्याही पुढे जाऊन त्यांनी आपले मूलभूत हक्क मागितले पाहिजेत. 'आमच्या उदरनिर्वाहासाठी आम्हाला दुसऱ्यावर अवलंबून राहणे पसंत नाही. आम्हाला काम द्या,' ही मागणी घेऊन त्या पुढे आल्या तर त्यांचे राजकारण अधिक जहाल होईल. कारण थेट भांडवलशाही व्यवस्थेलाच जाऊन त्यांना भिडावे लागेल. त्यांची मागणी या भांडवलशाही व्यवस्थेमध्ये पूर्ण होणे शक्य नाही. त्यासाठी समाजवादी क्रांतीच्या लढ्यात त्यांना भाग घ्यावा लागेल.

महागाई प्रतिकार समितीने 'लाटणे' हे आपले प्रतीक ठरविले होते. गृहिणींनी लाटणे हाती घेऊन स्वतःच्या कामाचा, अस्तित्वाचा अभिमान धरणे ठीक आहे. आमचे काम दुय्यम दर्जाचे नाही हे ठासून सांगणे आवश्यक आहे; पण त्याच्याही पुढे जाऊन आम्ही फक्त लाटणे घेऊन थांबणार नाही. आम्हाला यंत्रांवर काम करू द्या. कचेऱ्यातून काम करू द्या. आमच्या आवडीचे काम करण्याची आम्हाला संधी द्या, त्यासाठी योग्य ते शिक्षण द्या, ही मागणी घेऊन लढे दिले पाहिजेत.

समाजवादी आंदोलन व स्त्री-मुक्ती लढा

या चारही गटांतील स्त्रियांचे प्रश्न व त्यांचे संघटनांचे प्रकार आपण पाहिले. त्यांच्या मागण्या आपण पाहिल्या. एकजुटीचे महत्त्वही आपण शिकलो. आता या चारही गटातील स्त्रियांनी एकत्र येणे जरूर आहे, हेही ओघानेच आले. कामगार वर्गाला उत्पादनप्रक्रियेतील त्याच्या विशिष्ट स्थानामुळे मुक्तीचा मार्ग अधिक लवकर आत्मसात होतो. खाजगी मालकी नष्ट करूनच 'सामाजिक श्रम व सामूहिक उपभोग' हे प्रत्यक्षात आणता येईल, हे त्याला अनुभवातून जाणवते. कामगाराच्या दृष्टिकोणातून कामगारवर्गीय तत्त्वज्ञान तयार होते. हे तत्त्वज्ञान घेऊनच सर्व पिळल्या जाणाऱ्या समुदायांना मुक्ती मिळू शकते. स्त्रियांनी याच तत्त्वज्ञानाचा स्वीकार केला पाहिजे. कामगार-स्त्रियांकडून क्रांतिकारक राजकारण शिकले पाहिजे. आपापल्या संघटनांमध्ये कृतिशील भाग घेतला पाहिजे. खास स्त्रियांच्या मागण्या पुढे मांडल्या पाहिजेत आणि मग सर्व स्त्रियांची मिळून एक मोठी लोकशाही संघटना स्थापून काही खास स्त्रियांच्या मागण्यासाठी स्त्रियांचे लढे उभारले पाहिजेत. कामगार, शेतमजूर, कर्मचारी स्त्रियांनी गृहिणींच्या 'काम पाहिजे' या मागणीला पाठिंबा दिला पाहिजे. गृहिणींनी या संघटित स्त्रियांच्या लढ्याच्या वेळी त्यांना मदत केली पाहिजे. कुठे एखाद्या स्त्रीवर अत्याचार झाला, बलात्कार झाला तर सर्व स्त्रियांनी आवाज उठविला पाहिजे. बलात्कारासाठी येणारी पुरुषी वृत्ती ही याच संस्कृतीचा, समाजव्यवस्थेचा भाग आहे,

हे ओळखले पाहिजे.

स्त्रीचे हे लढाऊ रूप बघून स्त्री ही बुद्दू, असाहाय्य, दुबळी अशी जी प्रतिमा पूर्वापार चालत आली आहे ती बदलेल. स्त्री अधिक निर्भय होईल. तिच्या आयुष्यात संघटनेला प्रथम महत्त्व येईल. स्त्री आंदोलनासाठी घरची इतर कामे मागे सारून पुढे येईल. घरदार, मुलेबाळे यांची जबाबदारी घेण्यासाठी तिच्या नवऱ्याला पुढे यावेच लागेल. स्त्री मानसिक गुलामगिरीतून मुक्त होऊ शकेल. आज गरज नुसतीच आर्थिक स्वातंत्र्याची नाही. मानसिक गुलामगिरी, सांस्कृतिक गुलामगिरी यांच्या साखळ्या तोडण्याचीही आहे. आणि आर्थिक स्वातंत्र्यासाठी झगडता झगडता तिला बंधने तोडण्याचे धैर्य येणार आहे. आज स्त्रिया अनेक संपांतून, मोर्च्यांतून पुरुषांच्या बरोबरीने भाग घेताना दिसतात. गिरणी कामगारांच्या संपाच्या वेळी स्त्रिया जाऊन गेट अडवून धरत होत्या. रेल्वेसंपामध्ये स्त्रिया निदर्शनामध्ये सामील झाल्या होत्या. राज्यकर्मचारी संपामध्ये स्त्रियांनी रक्ताने आपल्या मागण्या लिहून पाठविल्या. एकमेकींच्या मुलांना सांभाळण्याची जबाबदारी स्वीकारून स्त्रिया आज पुढे येत आहेत. एकजूट करीत आहेत. एवढेच नव्हे तर पुष्कळदा लढ्यामध्ये पुरुषांच्याही एक पाऊल पुढे राहत आहेत आणि त्यांना युगानुयुगांची बंधने तोडायची आहेत. उत्पादनामध्ये भाग घ्यायचा आहे. उत्पादनसाधने खूप प्रगत झाली आहेत आणि स्त्रियांच्या मुक्तीची शक्यता निर्माण झाली आहे. त्यांना मुक्त व्हायचे आहे आणि पुरुषालाही पुरुषी अहंकारातून मुक्त करायचे आहे. समाजवादी लढ्याशिवाय ही मुक्ती शक्य नाही, याची त्यांना कल्पना आहे.



स्त्रियांचा चळवळीतील सहभाग – इतिहासाचा नोंद

स्त्रीजन्माच्या दास्याची ही कहाणी जगभर अशीच आहे. हिंदू धर्माने जसे स्त्रीच्या गुलामीचे गोडवे गायले तसेच ख्रिश्चन धर्मानेही स्त्रीला दडपून ठेवले. मुस्लीम समाजाने तर स्त्रीची गोशात रवानगी केली. हजारो वर्षे स्त्रीला मनुष्य-प्राणी समजणे हे पाप होते. अर्थकारण पुरुषांच्या हाती. मग राजकारणापासून स्त्री दूर राहिली तर नवल नाही. ती मुळी समाजाची नागरिक नव्हतीच. ती फक्त समाजाचा नागरिक जो पुरुष त्याची गुलाम, त्याची दासी. त्यामुळे नागरिकत्वाचे हक्क तिला मिळणे शक्य नव्हते. आश्चर्य म्हणजे १७८९ साली फ्रेंच राज्यक्रांतीने मानवाचे हक्क म्हणून स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व या तत्त्वांचा घोष केला. ही क्रांती भांडवलदारी क्रांती झाली. सरंजामशाही, जमीनदारी उलथून टाकून व्यापारी, कारखानदार यांनी राजकीय सत्ता आपल्या हातात घेतली, पण त्या वेळच्या 'मानव' या शब्दामध्ये त्यांनी स्त्रीचा समावेश केला नाही.

पाश्चात्त्य देश

या भांडवलदारी क्रांतीमधील स्त्रियांची कामगिरी खरंच पाहण्याजोगी आहे. स्त्रियांच्या जागृतीला सुरुवात या काळापासून झालेली आढळते. तेव्हापासूनच हळू-हळू स्त्रीच्या समाजातील स्थानामध्ये बदल होत गेला. अर्थात हा बदल झगडून, भांडूनच मिळवावा लागला.

फ्रेंच राज्यक्रांतीमध्ये बॅस्टिलच्या तुरुंगावर हल्ला करताना स्त्रिया पुढे होत्या. याच वेळी क्रांतिकारकांच्या बैठकाही स्त्रियांनी संघटित केल्या होत्या. असे असून १७९३ मध्ये क्रांती यशस्वी झाल्यावर राष्ट्रीय सभेने स्त्रियांच्या सर्व क्लबवर बंदी घातली. त्यांना सर्व तऱ्हेचे राजकीय हक्क नाकारण्यात आले. त्याच वेळी रूसोने लिहिलेल्या पुस्तकातील विचार पाहण्यासारखे आहेत. 'स्त्रियांचे शिक्षण हे नेहमी पुरुषाच्या संदर्भातच व्हायला हवे...आपल्याला सुखविणे, आपले आयुष्य सोपे करणे हेच त्यांचे काम–मुलींना आयुष्यभर कडक बंधनात ठेवले पाहिजे.' याच सुमारास मानवी हक्कांच्या घोषणेला समांतर अशी काही स्त्रियांनी 'स्त्रियांच्या हक्कां'ची घोषणा केली. मेरी वुल्फस्टोन क्लाफ्ट या इंग्लिश स्त्रीने १८७१ साली 'स्त्रीहक्कांचे समर्थन' या नावाचे पुस्तक लिहून रूसोला आव्हान केले. 'पुरुषाच्या विरंगुळ्यासाठी स्त्रीची निर्मिती नाही. आपल्यासारख्याच सजीव, समान असलेल्या पुरुषाची दासी होण्या-

साठी आपला जन्म आहे, यावर स्त्रीने कसा विश्वास ठेवावा?' या महिलेच्या विचारांची हेटाळणी झाली. या महिलेच्या विचारांचा उगम तिचा असमाधानकारक लैंगिक जीवनात आहे, असाही जावईशोध लावला.

अमेरिकेत १८५१ साली ओहोयो येथे स्त्रीहक्कपरिषद भरली होती. तेथे सोजर्नर ट्रूथ या गुलाम-स्त्रीने फार प्रभावी भाषण केले. 'ह्या माझ्या हाताकडे बघा—मी शेते नांगरली. रोपे लावली आहेत. गुदामे भरली आहेत. कोणत्याही पुरुषाने माझ्यासाठी हे काम केले नाही. मी पुरुषाइतकेच काम करते. मिळेल तेव्हा पुरुषाइतकेच खाते आणि चाबकाचे फटकारे सहन करते. मी माणूस नाही? मला तेरा मुले झाली आणि बहुतेक गुलाम म्हणून विकली गेलेली मी पाहिली आहेत. आईच्या कळवळ्याचा माझा आक्रोश येशूखेरीज कुणी ऐकला नाही. मी काय माणूस नाही?' इंग्लंडमधील कोळशाच्या खाणीत काम करणाऱ्या स्त्रीची हकीकतही अशीच हृदयद्रावक आहे. भांडवलशाहीच्या प्राथमिक अवस्थेत स्त्रियांना मोठ्या प्रमाणावर नोकरीवर ठेवले गेले व कमी पगारावर राबविण्यात आले.

पुढे याच इंग्लंडमध्ये पुरोगामी चळवळींनी कायद्यांमध्ये सुधारणा घडवून आणून स्त्रियांचे अनेक हक्क मान्य केले. १८५६ साली इंग्लंडमध्ये लग्नानंतर स्त्रीला मालमत्तेचा हक्क कायद्याने मिळाला. तोपर्यंत लग्न झालेल्या स्त्रीला नागरिक हक्क काहीही नव्हते. आपल्या प्राप्तीवर तिचा हक्क नाही. तिला आपले राहण्याचे ठिकाण निवडता येणे शक्य नव्हते. साक्षीदार म्हणून उभे राहता येत नसे. कागदपत्रावर सही करता येत नसे. नवऱ्याचा अचानक मृत्यू घडला तर स्त्रीची सर्व मालमत्ता सरकारजमा होत असे. या परिस्थितीत स्त्रीला मतदानाचा हक्क मागणे दुरापास्त होते. इंग्लंडमध्ये संसदीय लोकशाही सुरू झाली होती; परंतु स्त्रीला त्यामध्ये स्थान नव्हते. १८६० साली इंग्लिश विचारवंत जॉन स्टुअर्ट मिल व त्याची पत्नी श्रीमती मिल यांनी स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळाला पाहिजे म्हणून प्रचारकार्य हाती घेतले; पण लिबरल व कॉन्झर्वेटिव्ह या दोन्ही पक्षांचा स्त्रीमताला विरोध होता. या प्रश्नावर संघटित व्हायला स्त्रियांनी सुरुवात केली. मताचा हक्क मिळविण्यासाठी मोर्चे, मंत्र्यांच्या गाठीभेटी, पार्लमेंटमध्ये विधेयक आणणे असे अनेक कार्यक्रम घेतले; पण काही उपयोग झाला नाही. १९०३ साली कॉन्खर्स्ट कुटुंबाने याबाबत पुढाकार घेतला. 'स्त्रियांची सामाजिक आणि राजकीय संघटना' स्थापना झाली. त्यांनी स्त्रीमताधिकार चळवळीला लढाऊ कार्यक्रम दिला. हीच चळवळ सफ्राजेट मुव्हमेंट म्हणून प्रसिद्ध आहे. हरतऱ्हेच्या युक्त्या-प्रयुक्त्या करून स्त्रीहक्कवादी स्त्रिया मंत्र्यांच्या सभेत शिरकाव करून घेत व सभा उधळून लावत. मतांच्या हक्कांसाठी या स्त्रियांनी पोलिसी दडपशाहीला तोडीस तोड उत्तर दिले. पार्लमेंटच्या काचा फोडल्या. घरे जाळली. फुलबागा तुडविल्या. लाठीहल्ल्याला तोंड दिले. काहींनी तर प्राणार्पणही केले; परंतु दरवर्षी पार्ल-

मेंटमध्ये स्त्रीमतदानाधिकाराचे विधेयक येऊन टिंगल-हेटाळणीच्या वातावरणात, पुरेशी चर्चा न होता फेटाळले जायचे. १९१४ साली पहिल्या महायुद्धाला सुरुवात झाली. युद्धामध्ये स्त्रियांनी समाजोपयोगी कामामध्ये मोठा वाटा उचलला. त्यामुळे त्यांच्या मागण्या फार काळपर्यंत थोपवून धरणे अशक्य झाले. १९१८ साली अल्प-प्रमाणावर स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळाला. त्यानंतर जवळजवळ दहा वर्षांनी १९२८ साली इंग्लंडमध्ये स्त्रियांना संपूर्ण मतदानाचा हक्क मिळाला आणि समाजाचा नागरिक म्हणून स्त्री ओळखली जाऊ लागली. तिला वेगळे घटक-अस्तित्व लाभले.

अमेरिकेतसुद्धा स्त्रियांनी मतदान हक्काच्या चळवळीचा पाया रोवला. निग्रो गुलामगिरीच्या उच्चाटनाच्या चळवळीत त्यांनी पुढाकार घेतला होता. १८४८ साली सेनेका फॉल्स येथे प्रथमच स्त्रियांची परिषद भरली. या परिषदेस २५० स्त्रीप्रतिनिधी हजर होत्या. १९२० साली अमेरिकन स्त्रियांना संपूर्ण मतदानाचा हक्क मिळाला त्यानंतर १९३० साली ऑस्ट्रेलियातील स्त्रियांचा क्रमांक लागतो. सगळ्यात आश्चर्याची गोष्ट म्हणजे फ्रान्ससारख्या देशात दुसऱ्या महायुद्धानंतर १९४५ साली स्त्रियांच्या मतदानाचा कायदा पास झाला. अर्थात मतदानाचा अधिकार मिळाल्यामुळे स्त्रीमुक्ती झाली नाही. किंबहुना ती अपेक्षा नव्हतीच; पण स्त्रीमुक्ती चळवळीतील ते महत्त्वाचे पाऊल निश्चित होते. या चळवळीत भाग घेतल्यामुळे कित्येक स्त्रियांना धैर्य मिळाले. स्त्रिया बंधने झुगारून बाहेर आल्या. स्त्रीमुक्ती म्हणजे काय या विचारांना सुरुवात झाली.

भांडवलशाही हक्कांच्या पलीकडे जाऊन संपूर्ण स्त्रीमुक्तीकडे वाटचाल करण्याची गरज मात्र प्रथम रशियामध्ये वाटू लागली. झारच्या अमलाखालील रशिया हा मागासलेला, जुनाट मतांचा समाज होता. तेथे पार्लमेंट यावे, जनतेला लोकशाही अधिकार मिळावे म्हणून बरेच दिवस चळवळी चालू होत्या. मात्र तेथील भांडवलदारवर्ग अतिशय दुबळा होता. त्यामुळे भांडवलशाही लोकशाही हक्क मागण्यासाठी सुद्धा कामगारवर्ग व त्याचे नेते यांनीच पुढाकार घेतला होता. त्यामुळेच केवळ भांडवलशाही लोकशाहीचे मर्यादित उद्दिष्ट न ठेवता तेथील सोशल डेमोक्रॅटिक पार्टीने समाजवादाचा कार्यक्रम डोळ्यासमोर ठेवला होता. त्यामुळेच रशियामध्ये जी स्त्रियांची चळवळ उभारली गेली व ज्या स्त्रिया राजकारणात ओढल्या गेल्या त्यांनीही भांडवली मतदानहक्काच्या पुढचे पाऊल टाकले होते. समाजवादी लढ्याशीच आपली चळवळ जोडली होती. कामगारांच्या संघटना बांधणे, कामगारांमध्ये पत्रके वाटणे, अभ्यासमंडळे चालविणे अशा अनेक कार्यक्रमांतून स्त्रिया पुढे येत होत्या. १९१७ साली फेब्रुवारीत जेव्हा प्रत्यक्ष क्रांती झाली, त्या दिवशी तर स्त्रियांच्याच पुढाकाराचे निमित्त घडले. पहिले महायुद्ध सुरू होते. अन्नधान्याची टंचाई होती आणि ब्रेडसाठी

लांबच लांब रांगा लावाव्या लागत असत. अशाच एका रांगेमध्ये उभ्या असलेल्या बायका संतप्त झाल्या आणि त्यांनी घोषणा द्यायला सुरुवात केली. त्यांच्यावर हल्ला करण्यासाठी पोलिसांची तुकडी आली. ही बातमी समजल्याबरोबर कारखाने बंद करून कामगार बाहेर रस्त्यावर आले आणि भराभर संप झाले. यादवी युद्धाला सुरुवात झाली.

चीनमधील क्रांतिकारी स्त्री

चीनमधील स्त्रीचळवळीचा इतिहासही अतिशय तेजस्वी आहे. १९११ साली तेथे मर्यादित प्रमाणात भांडवलशाही क्रांती झाली व जनतेला काही प्रमाणात लोकशाही अधिकार मिळाले. सन्-यत्-सेन या पुढाऱ्याच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन झाले. या सुमारापासूनच येथील चळवळीत दोन भाग पडलेले दिसतात. एक सुधारणावादी स्त्रियांची चळवळ आणि दुसरी समाजवादी स्त्रियांची चळवळ. समाजवादी स्त्रियांनी कामगारांच्यात काम करायला व स्त्रीकामगारांना संघटित करायला सुरुवात केली होती. केवळ स्त्रियांना मालमत्तेच्या अधिकाराचे व मतदानाचे हक्क मिळून त्यांची गुलामी संपणार नाही, याची त्यांना जाणीव होती. पुढे गनिमी पद्धतीने युद्ध करून तेथील कम्युनिस्ट पक्षाने बराचसा विभाग चिनी राज्ययंत्रणेपासून मुक्त केला. या मुक्त विभागातील बहुसंख्य स्त्रिया मागासलेल्या होत्या. चीनमध्ये आधुनिक यंत्रावर आधारित उत्पादनाला फारशी सुरुवात झाली नव्हती. ग्रामीण भाग बराच मोठा होता. जमीनदारी-पद्धत खूपच मोठ्या प्रमाणावर होती. त्यामुळे जुन्या चालीरीती, अंधश्रद्धा यांचा प्रभाव फार होता. स्त्रियांचे पाय लहानपणापासून बांधून ठेवले जात. तिचा रंग खराब होईल याची भीती दाखविली जाई. या मुक्त विभागातील स्त्रियांमध्ये मात्र जागृती करण्याचा अतिशय जोरदार प्रयत्न झाला. कारण स्त्रियांच्या पाठिंब्याशिवाय त्या भागामध्ये कम्युनिस्ट पक्षाचे अस्तित्व टिकून राहणे शक्य नव्हते. मुख्य म्हणजे बरेच तरुण शेतकरी सैन्यात सामील झाले होते. त्यांच्या जागी शेतात जाऊन काम करून धान्य पिकविणे आवश्यक होते. तसेच सूत काढणे, कापड विणणे, सैन्याला कापडाचा पुरवठा करणे. एवढेच नव्हे तर वेळप्रसंगी आपल्या गावावर हल्ला झाला तर गावाचे संरक्षण करणे अशा अनेक जबाबदाऱ्या स्त्रियांना उचलाव्या लागल्या. चार भिंतींच्या आत राहून दुबळी झालेली, सासू सासऱ्यांच्या आज्ञेत राहणारी स्त्री हे आव्हान झेलायला बाहेर पडली. बाहेर पडता पडताच रूढींच्या, जुन्या धर्माच्या बेड्या आपोआप तोडल्या गेल्या. गावोगावी स्त्रियांच्या संघटना स्थापन झाल्या. सासऱ्याच्या हातचा मार खाऊन कंटाळलेल्या स्त्रिया संघटनेकडे येऊन तक्रारी करीत. मग सामुदायिकरीत्या घरावर मोर्चा काढून सासऱ्याला समज दिली जाई. याच स्त्रियांच्या संघटनांनी तरुण-तरुणींना एकत्र बोलावून ओळखी

करून देऊन आवडीच्या तरुणाशी विवाह करण्याचे स्वातंत्र्य दिले. संघटनांच्यातर्फे हुंडा न देता अशा प्रकारचे विवाह लावले जात. अशा प्रकारे अगदी मूलभूत प्रश्न घेऊन तेथील स्त्रियांनी क्रांतिकारी परिवर्तन घडवून आणले, आणि क्रांतीमध्ये सक्रीय भाग घेतला. जुन्या बंधनातून आणि दास्यातून मुक्त होण्याची आशा बाळगतानाच तिच्या अंगातील क्रांतिकारी शक्तीचे तिला व समाजाला दर्शन झाले. चीनमध्ये आज जो समाजपरिवर्तनाचा महान प्रयोग चालू आहे त्यामध्ये बराच वाटा स्त्रियांचा आहे.

व्हिएटनामी स्त्रीचे तेजस्वी रूप

चिनी स्त्रीच्याही पुढे एक पाऊल व्हिएटनामी स्त्रीचे पडलेले आहे. तीस वर्षे सतत व्हिएटनाम एका बलाढ्य साम्राज्यशाहीशी टक्कर देत होता आणि १ मे १९७५ रोजी संपूर्ण व्हिएटनाम स्वतंत्र झाला. १५० बिलीयन डॉलर्स इतका खर्च अमेरिकेने करूनसुद्धा व्हिएटनामचा मुक्तिलढा थांबला नाही. या सतत आणि चिवट परिश्रमांमध्ये व्हिएटनामी स्त्रीचा फारच मोठा वाटा आहे. सरंजामशाही संस्कारात वाढलेली स्त्री साम्राज्यशाही विरोधी आंदोलन सुरू झाल्याबरोबर खांद्यावर बंदूक घेऊन लढण्यासाठी बाहेर पडली. उत्तर व्हिएटनामी लोकांनी दक्षिण व्हिएटनामच्या मुक्तीसाठी स्वतःला संघटित केले आणि मुक्तिसैन्य स्थापन झाले. दक्षिण व्हिएटनाममध्ये २,३०,००० स्त्रिया गनिमी सेनेमध्ये काम करत होत्या. आघाडींच्या फळ्यांना रसद पुरविण्याची जबाबदारी स्त्रियांनीच उचलली होती.

व्हिएटनामच्या मुक्तिसंग्रामात स्त्रियांनी काय केले आणि या प्रयत्नातून स्वतःची मुक्ती कशी करून घेतली, हे खरोखरच पाहण्यासारखे आहे. संकटाच्या प्रसंगातून स्त्रीला आपल्या अंगातील कौशल्याचा, बुद्धीचा प्रत्यय येत जातो. मग कागदावरचे हक्क मागायची गरजही भासत नाही. सतत तीस वर्षे युद्ध चालू होते. हजारो टन दारूगोळ्यांचा अग्निवर्षाव सतत होत होता. वघता वघता डोळ्यांसमोर कोवळी-कोवळी मुले जळून जात होती. इमारती कोसळत होत्या आणि तरी देखील सर्व नित्याचे व्यवहार, कारखान्यातील माल, शेती सर्व काही तसेच चालू होते. व्हिएटनामी स्त्री मुक्तिफौजेत सामील होऊ इच्छिणाऱ्या नवऱ्याला पाठिंबा देत होती आणि त्याच्या बदल्यात कारखान्यात यंत्रावर काम करायला जात होती. पाठीवर मूल, खांद्यावर बंदूक आणि हाताने शेतामध्ये भाताची लावणी करणारी व्हिएटनामी स्त्री आपण अनेक चित्रांतून पाहिली आहे. चिमुकल्या बांध्याची नाजूकशी दिसणारी ही स्त्री आतून क्रांतीने पेटलेली होती. ह्या क्रांतिकार्यात भाग घेताघेताच या स्त्रियांनी आपल्या पूर्वीच्या बंदीवान जिण्याचा त्याग केला. त्याही स्त्रिया आपल्यासारख्याच रूढींनी आणि चालीरीतींनी बांधल्या गेल्या होत्या. सूर्यप्रकाशापासून वंचित होत्या. याच

स्त्रियांचे एक गाणे फार बोलके आहे–

आम्ही मनापासून द्वेष करतो
माजघरातील या बंदीवान जिण्याचा
गुलामीची रात्र संपण्याची
खूप दिवस वाट पाहिली,
सासरचा जाच एवढा तीव्र होता...
आई बाबा दादा
विकून टाकू नका मला
जमीनदाराच्या कर्जापोटी,
हवे तर
माझा गळा दाबून मला संपवा,
उठा स्त्रियांनो, मैत्रिणींनो
उचला बंदुका भांडवलशाही उलथवण्यासाठी
समान हक्कांसाठी.

या स्त्रियांनी स्त्रीशिक्षणासाठी केलेले काही प्रयत्न अतिशय परिणामकारक आहेत. स्त्रीला खूप काम करावे लागते. त्यातून युद्ध चालू. शाळेत जायला तिला कुठचा वेळ ? अशा वेळी म्हशींच्या पाठीवर मुळाक्षरे गिरविली गेली. शेतात काम करता करता तिने अक्षरे पाठ करावीत, वाचायला शिकावे हा उद्देश होता. तसेच उत्तर व्हिएटनाममध्ये राज्यसत्ता कामगार-शेतकऱ्यांच्या हातात आली होती. त्यांच्या रोजच्या गरजेचाच माल कारखान्यांमध्ये निर्माण होत होता. आपला माल खपविण्यासाठी भांडवलदारांना जाहिरातीचे फलक लावावे लागतात. ह्या जाहिरातींच्या फलकांऐवजी गावामध्ये मूळाक्षरांचे व सोप्या सुभाषितांचे फलक लावण्यात आले होते. कामाला जाता-येता ही अक्षरे सहज नजरेस पडावीत असा हेतू होता. सिनेमागृहामध्ये आत शिरण्यापूर्वी दरवाजावरच सुभाषिताचा फलक लावलेला असे. तो वाचता येईल त्यानेच आत जायचे, अशा तऱ्हेचे नियम करण्यात आले होते. आणि आश्चर्य म्हणजे या सर्व प्रयत्नाचा परिणाम होऊन वर्ष-दोन वर्षांच्या आत सर्व स्त्रिया साक्षर झाल्या आणि कित्येकदा चित्रपटगृहात बायकोला आत जायला परवानगी मिळे व नवरा फलक वाचू न शकल्याने बाहेर राही, अशीही उदाहरणे घडली.

याचबरोबर स्त्रियांच्या संघटनांनी स्त्रियांना उत्पादनात भाग घेता यावा म्हणून ठिकठिकाणी उपाहारगृहे चालविली, शिशुसंगोपनकेंद्रे चालविली, पाळणाघरे चालविली व स्त्रियांना रोजच्या रामरगाड्यातून मुक्त केले. संध्याकाळी स्त्रियांसाठी अभ्यास-

वर्ग चालविले गेले आणि यातूनच व्हिएटनामी स्त्रीला आत्मविश्वास आला. एक नवी स्त्री घडत गेली. ठिकठिकाणी शेतांवर स्त्रिया प्रमुख म्हणून निवडून येऊ लागल्या. आज व्हिएटनामी स्त्री चैतन्याने सळसळणारी, निर्भय अशी स्वतंत्र व्यक्ती, देशाची जबाबदार नागरिक म्हणूनच आपल्यासमोर उभी राहते.

पाश्चात्य देशांतील स्त्री-मुक्ती चळवळीचा आढावा

पाश्चात्य देशांतील आजची स्त्री मुक्ती चळवळ साधारणपणे १९६५ नंतर सुरू झाली असे म्हणता येईल. सर्वांत प्रथम विद्यार्थिनींमध्ये असंतोष दिसून आला. अमेरिकेमध्ये व्हिएतनाम युद्धविरोधी, वंशभेदविरोधी चळवळी चालू होत्या. युरोप मध्येही विद्यार्थी चळवळी आकार घेत होत्या. तेव्हा त्यांच्या लक्षात येऊ लागले की समाजपरिवर्तनाच्या गप्पा करीत त्याचे सहकारी त्यांना खऱ्या समानतेने न वागविता 'पाल्य' म्हणून दुय्यम दर्जाने वागवीत होते. स्त्रियांनी कॉफी करावी, पुरुषांनी भाषणे लिहावीत. पुरुषांनी पुढारीपण करावे, स्त्रियांनी पडद्यामागची कामे करावीत. या परिस्थितीविरुद्ध स्त्रियांनी बंड केले आणि मित्र गटातून बाहेर पडून स्त्रिया छोटे छोटे गट बांधू लागल्या. त्या सर्वजणी समाजपरिवर्तनाचे राजकारण मानणाऱ्या होत्या. मात्र मिश्र गटात राहून समाजपरिवर्तनामध्ये आवश्यक असलेले स्त्री-पुरुष संबंधाचे प्रश्न उठविता येतील याची त्यांना खात्री वाटेना.

स्त्रियांच्या स्वायत्त गटामध्ये स्त्रियांनी स्वतःच्या जीवनातील दैनंदिन अनुभव तपासून पाठवायला सुरुवात केली. कौटुंबिक अनुभव तसेच कामाच्या ठिकाणचे अनुभव. आणि त्यातून पुरुषप्रधानता जीवनाच्या अनेक क्षेत्रांमध्ये पसरलेली असल्याचे लक्षात येऊ लागले. जाहिराती, चित्रपट, सौंदर्य स्पर्धा यातून स्त्रीशरीराकडे उपभोग्य वस्तू म्हणून पहाण्याचे संस्कार होतातच. परंतु स्त्रीची लैंगिकता इतरही अनेक सूक्ष्म पद्धतीने वापरली जात असते. अगदी पती-पत्नीच्या लैंगिक संबंधातही मूळ असमानतेचा आविष्कार होत असतो. आणि पत्नीवर पुष्कळदा जबरदस्ती होत असते. अशाच प्रकारची सूक्ष्म दडपणे नोकरीच्या ठिकाणीही वापरली जात असतात. या चर्चांतून एक मुख्य निष्कर्ष त्यांनी काढला तो असा की : 'वैयक्तिक जीवनही राजकारणाचा भाग असते कारण तेथेही पुरुषांकडून स्त्रियांवर दडपणूक होत असते आणि स्त्रियांना संघर्ष करावा लागतो.'

हे तत्व त्या अवस्थेमध्ये फार क्रांतीकारी ठरले कारण त्यामुळे स्त्रियांचा संघर्ष केवळ काम द्या, पाळणाघरे द्या वगैरे मागण्या सरकारकडे मागणे एवढ्यापुरता मर्यादित न रहाता तो रोजच्या दैनंदिन आयुष्यातही आणला गेला. स्त्रियांना व्यक्तिमत्व विकासाला जर वाव हवा असेल तर ज्याप्रमाणे सरकारने आवश्यक सोयीसवलती. निर्माण करणे आवश्यक आहे त्याप्रमाणेच त्यांच्या कुटुंबातून-वडील, भाऊ, नवरा, मुले यांचेकडूनही सहकार्य मिळणे आवश्यक आहे हे स्त्रियांच्या लक्षात आले. लैंगिक

श्रमविभागणी तोडण्याची आवश्यकता पुन्हा एकदा प्रखरतेने जाणवली. केवळ आर्थिक स्वातंत्र्य मिळून चालणार नाही, घरातील कामही कमी झाले पाहिजे, पुरुषाचे दडपण कमी झाले पाहिजे या गोष्टीकडे लक्ष वळले. हे बदल जरी प्रत्येक स्त्रीने आपापल्या कुटुंबात व्यक्तिगत पातळीवर घडवून आणण्याचे असले तरी तिला धैर्य मिळावे म्हणून संघटनेची आवश्यकता, अनुभवांच्या देवाण-घेवाणीची आवश्यकता आहे असे लक्षात आले आणि अनेक नव्या आघाड्यांवर चळवळीचे काम सुरू झाले.

स्त्रियांवरील अत्याचार हा विषय प्रमुख लक्ष बनला. बलात्कार विरोधी केंद्रे, मारहाण झालेल्या स्त्रियांसाठी आधार केंद्रे, अश्लील वाङ्मयातील हिंसेविरुद्ध मोहीम वगैरे माध्यमांतून या प्रश्नांची जाणीव वाढविली गेली. बळी पडलेल्या स्त्रियांना काही प्रमाणात मदत करण्याचे प्रयत्न होऊ लागले.

गर्भपातविरोधी अतिशय कडक कायदे अनेक पाश्चात्य देशांमध्ये अस्तित्वात होते. स्वत्वाची जाणीव जशी वाढू लागली तशी स्वतःच्या शरीरावर स्वतःचा अधिकार हे तत्व पुढे येऊ लागले आणि गर्भपात कायदेशीर करण्याच्या मागणीला जोर चढला. ब्रिटनमध्ये तर ट्रेड युनियन चळवळीला ही मागणी घ्यावी लागली व स्त्री-पुरुष कामगारांनी १९७९ साली काढलेला प्रचंड मोर्चा हा एक महत्वाचा टप्पा ठरला.

सध्या अनेक स्त्रियांचे गट जागतिक शांततेच्या चळवळीत मोठ्या प्रमाणात भाग घेत आहेत. आणि महत्वाची गोष्ट म्हणजे, आपल्या मुलांच्या भवितव्याची काळजी करणाऱ्या 'माता' एवढीच मर्यादित भूमिका घेऊन या स्त्रिया चळवळीत सामील झालेल्या नाहीत. स्त्रीकडे 'माता' या भूमिकेतून बघणे सनातन परंपरेला धरून आहे. परंतु या स्त्रिया कोणत्याही प्रकारच्या हिंसेला आमचा विरोध आहे असे सांगून, घराघरातून घडणारी मारहाण व देशादेशांच्या अंतर्गत शस्त्रास्त्र स्पर्धा आणि त्यामुळे होणारे आक्रमक भावनांचे पोषण यांच्यामध्ये नाते लावू इच्छितात. आज जागतिक शांततेमध्ये भाग घेणाऱ्या मंडळींमध्ये अमेरिका व रशिया या महासत्तांना दोष देण्याची स्पर्धा चाललेली आढळते. अशावेळी सर्व प्रकारच्या हिंसेला विरोध करत, हा विरोध अणुयुद्धापर्यंत नेऊन पोचविण्याची मूलभूत भूमिका या स्त्रिया घेत आहेत हे महत्वाचे आहे. इंग्लंडमध्ये ग्रीनहॅम या अण्वस्त्रांच्या तळाला, ३०,००० स्त्रिया एक महिना वेढा देऊन बसल्या होत्या. अशा तऱ्हेने स्त्रिया जागतिक राजकारणातही महत्वपूर्ण कामगिरी बजावत आहेत.

या चळवळीतूनच ठिकठिकाणी, स्त्रियांच्या प्रश्नांचा मूलभूत पद्धतीने अभ्यास करून सैद्धांतिक पातळीवर सामाजिक शास्त्रांमध्ये भर घालण्यासाठी वुमेन्स स्टडीज डिपार्टमेंट्स स्थापन होत आहेत. पहिल्या प्रथम स्त्रिया इतिहासामध्ये जिवंत होत

आहेत. केवळ पुरुषासारखा पराक्रम गाजविला म्हणून नव्हे तर स्त्रिया म्हणून जगत असतांना त्यांनी केलेली कामगिरी, लावलेले शोध, त्याचा एकूण समाजकारणावर झालेला परिणाम वगैरे गोष्टीबद्दल संशोधन सुरू झाले आहे. रस्त्यावरील चळवळीला सैद्धांतिक जोड मिळाली तर चळवळ अधिक खोलवर जाण्याची व टिकून रहाण्याची शक्यता असते. या पार्श्वभूमीवर हे प्रयत्न महत्वाचे आहेत.

त्यामानाने समाजवादी देशात मात्र स्त्री-मुक्ती चळवळ सध्या फारशी जाणवत नाही. तेथे स्त्रियांना बऱ्याच सोयी सवलती मिळाल्या आहेत, आर्थिक स्वातंत्र्य आहे. वेश्याव्यवसायाचे बऱ्याच अंशी उच्चाटन झाले आहे. शिक्षणाची प्रगती होते आहे. क्यूबासारख्या देशाने फॅमिलीकोड सारखा कायदा करून घरगुती कामामध्ये पुरुषांचा सहभाग वाढविण्याचा प्रयत्न चालविला आहे. असे असूनही अजून घरगुती काम, मुलांची जबाबदारी प्रामुख्याने स्त्रियांवर दिसून येते. राजकीय पदावर स्त्रिया मोठ्या प्रमाणात आढळत नाहीत. मात्र जगभरच्या चळवळीचे परिणाम तेथेही होत असावेत असे मानायला जागा आहे.

REFBK-0024494

